
फेब्रुवारी • ६२





५० न.पै.

माणूस
मराठी मासिकपत्र

संपादक
श्री. ग. माजगांवकर

पत्रव्यवहाराचा पत्ता
संपादक, व्यवस्थापक
'माणूस', मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

वार्षिक वर्गणी : पांच रुपये
किरकोळ अंक : पन्नास नये पैसे

~ सूचना ~

१) प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

२) पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढले जाते.

३) या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

वर्ष पहिलें : अंक नववा
फेब्रुवारी १९६२



## स्वरूपदर्शन

**सामाजिक अंतरंग**

गोमंतकांचें मानस — निरीक्षक

**कथाकाव्य**

आयेषा — सौ. मालती तेंडुलकर

**कृषि-औद्योगिक भारत**

प्रदर्शन की जत्रा — आनंद माधव
सहकारी शेती अनिवार्य कां? — विलास पाटील
आपलें एंजिन — जयाजी आवाजी वाघ

**रंगभूमी–क्रीडा–चित्रपट**

प्रेमा तुझा रंग कसा? (नाटचचर्चा) — वसंत कानेटकर व भालबा केळकर
राजाभाऊ परांजपे — शरद तळवलकर
एम्. सी. सी. चा भारत दौरा — विद्याधर

**अवघाची संसार, नवें वाचन, इत्यादि उपयुक्त सदरें**

**मुखपृष्ठ**

गिरिकुहरीं हा जागृत हरि — दत्ता महाबळेश्वरकर
प्रतिभा फोटो स्टुडियो

र. नं. ८६६२ ) विना सहकार नहि उद्धार ( र. ता. ७-३-१९४४

सोसायटीच्या सभासदांना कर्ज देणें, शेतीच्या विकासासाठी सभासदांना खतें, सल्फेट व मिश्रखतें पुरविणें, शेतकऱ्यांना डिझेल, ऑईल व क्रूडाईल पुरविणें, शेतीची उपयुक्त अवजारें भाड्याने देणें, लहान ग्रामीण उद्योगधंदेवाईकांना कर्ज पुरविणें इत्यादी कार्यें करणारी 'अ' वर्गातील......

# रुई विविध कार्यकारी सेवा सहकारी

## सोसायटी लिमिटेड

### मु. पो. रुई, ता. कोपरगांव

★ सभासदसंख्या १९५ ★ शेअर भांडवल ९४,०१० ★ रिझर्व व इतर फंड ३९,९५९ ★

★ इतर संस्थेत गुंतविलेलें शेअर भांडवल ४३,२५० ★ खेळतें भांडवल ४,६६,१८५ ★

**संस्थेचें स्वतःचे गोडाऊन ⊠ वाहतुकीसाठी संस्थेचा मालट्रक**

गांवांतील ऊंसाचें क्षेत्र ११०० एकर ★ सोसायटीच्या ७६ सभासदांनी 'गणेश सहकारी साखर कारखान्याचे' प्रत्येकीं १००० रु. प्रमाणे १९६ शेअर्स खरेदी केले आहेत ★

### संचालक मंडळ

श्री. विठ्ठलराव माधवराव वाबळे (चेअरमन)

श्री. इन्द्रभान कचरदास भनसाळी (व्हा. चेअरमन)

श्री. बाबुराव किसनराव कडू
श्री. कचरु कृष्णाजी रुकारे
श्री. संपत पर्वत वाबळे
श्री. साहेबराव पांडुरंग गायकवाड
श्री. खंडेराव धोंडिबा पठारे
श्री. शंकर पाटीलबा वाघचौरे (सेक्रेटरी)

-- अभिराष्ट्रेण वर्धताम् --




# गिरिंकुहरिंहा 'जागृत' हरी

आगामी निवडणुकांसंबंधीं जें कांहीं लिखाण आजवर प्रसिद्ध झालें त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, देशांतील जातीयता कमी होण्याऐवजी या निवडणुकांत तिला अधिकच खतपाणी पुरविलें जात आहे.

महाराष्ट्रांत तरी हें अनपेक्षित होतें. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत महाराष्ट्रांतील जातीयता 'संपली' असा सर्वांचा आजवर समज होता, पण वस्तुस्थिति वेगळीच प्रत्ययास आली. सत्ताधारी पक्षानें तर जातीयतेचा आधार ठायींठायीं घेतलाच, पण विरोधी पक्षीयहि जातीय भावनांपासून अलिप्त राहूं शकले नाहीत.

स्वदेशी, कारखानदारीची वाढ, सुधारलेली शेती, थोडक्यांत म्हणजे देशांतर्गत साधन संपत्तीच्या संयोजनावर आधारलेली खरीखुरी औद्योगिक प्रगति हाच जातीयतेवरील एकमेव तोडगा आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यावर या प्रगतीला आरंभ व्हावा अशी आपली अपेक्षा होती, पण ब्रिटिशांनी येथील अर्थव्यवस्थेला वसाहतीचें स्वरूप दिलें, तेंच आज बहुतांशीं कायम आहे.

नफेबाज व्यापारी-भांडवलदार परकीयांच्या ज्ञानविज्ञानाचा व कार्यकौशल्याचा आधार घेऊन येथे कारखाने उभारतात— ही देशाची औद्योगिक प्रगति ठरूं शकत नाही. यामुळे आपलें नैसर्गिक व मानवी साधन—साहित्य गतिमान होणार नाही. उत्पादन वाढलें तरी औद्योगिक क्रांतीचा ठोस पाया देशांत घातला जाणार नाही. पारतंत्र्यकाळांतील आपलें आर्थिक व सामाजिक परावलंबित्व कायम राहील; जुन्या रूढि व संकेत, जातीयतेसारख्या संकुचित भावना यांतून आपण मुक्त होऊं शकणार नाहीं.

देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यामुळे 'गिरिकुहरीं निद्रित' असणारा 'हरी' आता जागृत झाला आहे हें निश्चित. पण अद्याप तो 'गुरुतर शिला' भेदण्याच्या आपल्या स्वाभाविक प्रतापास उद्युक्त झालेला नाहीं हेंहि तितकेंच खरें.

**अशा 'अर्धनिद्रा-जागृत' हरीला पूर्ण जागा करणें, परावलंबी आर्थिक वसाहतीचें स्वावलंबी सुराज्यांत रूपांतर करणें हें आज देशासमोरील प्रमुख ऐतिहासिक कार्य आहे.**

सत्ताधारी काँग्रेसपक्षाला या कार्याची जाणीव आहे, परंतु त्यासाठी 'राष्ट्रवाद, लोकशाही व समाजवाद' या तत्त्वाधारें पक्षाची शिस्तबद्ध संघटना उभी करण्यांत काँग्रेसला अपयश आल्याने तिच्या ध्येयधोरणांत व प्रत्यक्ष कृतींत अंतर पडत गेलें. त्यामुळे देशांत आर्थिक असंतोषाची वाढ झाली; काँग्रेस संघटनेंत फुटीरता, जातीय गटबाजी यांना उधाण आलें.

काँग्रेस-संघटनेची पुनर्घटना झाली, राष्ट्रनिष्ठा, लोकशाही, समाजवाद या तत्त्वांवर तिची ठाम उभारणी झाली तर पुढील पांच-दहा वर्षांत देशाचें योग्य नेतृत्व ती करूं शकले नाही तर या तत्त्वांवर उभा असणारा इतर कोणताहि पक्ष अधिकारावर येणें इष्ट आहे.

यांपैकी कांहीहि घडलें नाही तर देश डाव्या अगर उजव्या स्वरूपाच्या एकांतिक विचारसरणीच्या आहारीं जाण्याचा धोका आहे; आणि ही परिस्थिति ओढवलीच तर मग निवडणुका, मतदान, लोकशाही या शब्दांचे आजचे अर्थच बदलले जातील.

ही वेळ येणार नाही अशी आपण आशा करूं या.

संपादकीय—

# गोमंतकाचें मानस

" पैसे या त्यां च्या तंत्रानें कारभार चालला तर तो सर्व कारभार हास्यास्पद ठरेल आणि आम्हा गो वे क रां ना आगींतून उठून खाईत पडल्यासारखें होईल. "

जें दादा सुखटणकर बोलले तेंच आज प्रत्येक माणूस मनातल्या मनांत बोलतो आहे ?

## निरीक्षक

गोमंतकांत प्रवेश केल्यानंतर जो पहिला गोमंतकीय मला अगदी कडकडून मिठी मारून भेटला तो पहिलें वाक्य हें बोलला की, " गोवा मुक्त झाल्यानंतर पहिलें ' जनमनगण ' मीं म्हटलें ! " म्हापसेच्या वाटेवर ही भेट झाली आणि ' राष्ट्रगीत '-गायनाचा पहिला मान मिळाला, म्हणून ऊर भरून गेलेला तो गोमंतकीय म्हणजे ' सुरेश हळदणकर. ' सुरेश हळदणकर सुमारे आठ वर्षांनी गोव्यांत आले होते आणि गोव्याने पोर्तुगीज वसाहतीचें वस्त्र पार फाडून टाकलें असतां आपण गोव्यांतच असावें हा योगायोग त्यांना विलक्षण आनंददायी वाटत होता. त्या आनंदाच्या भरांत सुरेश हळदणकर आपलें मोठेंपण विसरून आमच्याशीं बोलत होते आणि त्यानंतर मी गोमंतकांत पांच दिवसांच्या अल्पावधींत जीं पांचपन्नास माणसें निरखून पाहिलीं तीं सारीं आपलें " मीपण " विसरून वागतांना दिसलीं. स्वातंत्र्याच्या दर्शनाने होणारा हा वृत्तिपालट मागे भारताला स्वातंत्र्य मिळालें तेव्हा माझ्या नजरेने टिपला होता. त्याच वृत्तिपालटाचा पुनः प्रत्यय गोमंतकांतील वास्तव्यांत आल्याने माझेंहि मन भरून आलें. या भरल्या मनापोटीच ' गोमंतकांतील माणसां 'चे धागेदोरे उलगडून पाहण्याची इच्छा माझ्याठायीं प्रबळ झाली.

पण ' पहिला ' गोमंतकीय मला वेळगांवांत भटला होता. या गोमंतकीयाने माझें मन वेधलें याचें कारण असें की, बोलतां बोलतां ' मायनिंग इज ए कर्स ' (गोव्यांत खाणी सांपडल्या हा गोवेकरांना शाप होय) असे उद्गार त्याने काढले या गोमंतकीयाचें नांव आहे, बाबूराव विठ्ठल नाईक.

बाबूराव नाईक हे आझाद गोमंतक दलाचे एक प्रमुख आधारस्तंभ होत. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी (१९२८ सालीं) त्यांनी गोव्यांत हरताळ पाडण्याच्या कार्यांत उडी घेतली आणि तेव्हापासून गेलीं ३३ वर्षे गोमंतकाच्या विकासाचा ध्यास त्यांनी घेतलेला आहे. सुमारे चार वर्षे बाबूरावांनी पणजी येथून ' प्रकाश ' नांवाचें अर्धसाप्ताहिक चालविलें. १९३७ सालीं गोव्याच्या गव्हर्नर जनरलने ' प्रकाश 'चें प्रकाशन थांबविलें. सारांश हा की, गोव्याच्या लोकजीवनाशीं समरस झालेल्या पन्नाशीच्या घरांतील विवेकी माणसाला ' खाणी म्हणजे शाप होय ' असें वाटतें. कारण काय ? तर गोव्यांतील निर्द्वंद्व, शीतल जीवन खाणींच्या संपर्कानें द्वंद्वमय आणि दाहक रूप धारण करूं लागलें आहे. गोमंतकीय जीवनांत संघर्ष नसावा, पूर्वापार चालत आलेली सहिष्णुता वर्धमान पावावी, एवढीच बाबूरावांची इच्छा आहे. आणि अशी इच्छा बाळगणारे गोमंतकीय संख्येने बहुमतांत येतील. कृषिसंलग्न संथ जीवनाची ओढ हें गोमंतकीयांचें प्रातिनिधिक वेड आहे आणि एक साम्यवादी कार्यकर्त्यांचा गट सोडला, तर गोमंतकांत आज कोणालाही कुठल्याहि प्रकारची दुही नको आहे, समाजहितासाठीहि त्यांना दुही नकोच वाटते. कींबहुना कोणतेंहि सामाजिक द्वंद्व न खेळतां समाजहित साधतां यतें असा त्यांचा दावा आहे. बाबूराव नाईक मला एकदा म्हणाले, " खुद्द भारताने स्वीकाराव्या अशा अनेक गोष्टी आमच्या पूर्वजांनी केलेल्या आहेत. "

### गोव्यांतील ' कम्युनिदादिश '

–आणि आपल्या या विधानाच्या पुष्टचर्थ त्यांनीं एक पत्रव्यवहार मला दाखविला. श्री. बाबूराव नाईक यानी १८ सप्टेंबर १९५७ रोजीं भारताचे पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू यांना इंग्रजींतून एक पत्र पाठविलें. त्यांत नाईक म्हणतात, " देशांतील अन्न-समस्या फक्त जमिनीच्या सामूहिक मालकीनेच सुटूं शकेल असें आचार्य विनोबा सांगतात., पण हें तत्त्व विनोबा नव्याने सांगत आहेत, असें नव्हे कारण, याच तत्त्वावर आधारलेले ग्रामसमाज गोव्यांत आपल्याला आजहि सापडतील, इतकेंच नव्हे तर आमच्या धारणेशीं जुळणारें लोकशाही तत्त्व या विचाराच्या मुळाशीं आहे. या ग्रामसमाजाचें पुनरुज्जीवन व्हावें, अशी माझी तीव्र इच्छा आहे " आणि या पत्रासोबत बाबूरावांनी गोव्यांतील ' कम्युनिदादिश 'ची सविस्तर माहिती देणारें एक निवेदन नेहरूजींकडे पाठविलें. नेहरूजींनी नाईकांना कळविलें, " मी आपलें पत्र नियोजन मंडळाकडे पाठवींत आहें. "

—तीन-साडेतीन वर्षें झाली; अद्याप नियोजन मंडळाकडून बाबूरावांना कोणत्याहि प्रकारचा खलिता आलेला नाही. खलिता येईल अशी आशाहि बाबूरावांना नाही, पण भारताने ' ' कम्युनिदादिश 'चा स्वीकार करावा ' अशी भावना बाबूरावांच्या मनांत पक्कें ठाण मांडून बसली आहे !

' कम्युनिदादिश 'ची परंपरा पोर्तुगीज कालापूर्वीची आहे आणि पहिला पोर्तुगीज गव्हर्नर जनरल अल्बुकर्क याच्या मनावर या परंपरेचा प्रभाव पडल्यामुळे त्याने आपल्या सरकारला ही परंपरा कायम टिकविण्याची शिफारस त्या काळांत केली. ती शिफारस मान्य झाली आणि आजतागायत पोर्तुगीज शासनयंत्रांत ' कम्युनिदादिश शासनांचें वेगळें खातें ठेवण्यांत आलेलें आहे, पण ही परंपरा यापुढे टिकवून धरली जाणार नाही, अशी साधार भीति गोवेकरांना वाटते आहे. साधार

म्हणूनच की काय गोव्यांतील ग्राम समाजच आता मोडकळीस आलेले आहेत. तरीहि साम्यवादी कार्यकर्त्यांसह सर्व गोवेकर गोव्याचें वैशिष्टय म्हणून आजहि 'कम्युनिदादिश'कडेच बोट दाखवितात.

### सामान्य माणसाची पिळवणूक

बेळगांवांत भेटलेला 'दुसरा' गोवेकर म्हणजे दिवाकर काकोडकर. पोर्तुगीज सरकारने त्यांना १९४९ मध्ये राजकीय चळवळ केल्याच्या आरोपावरून अटक केली आणि एक वर्ष गोव्यांतील आग्वाद जेलमध्ये ठेवून नंतर आफ्रिकेपासूर ४०० मैलांवर असलेल्या काबुवेर्द या अटलांटिक महासागरांतील पोर्तुगीज बेटावर कैदेंत ठेवलें. त्यांची सुटका १९५८ सालीं झाली. हे गृहस्थ साम्यवादी विचाराचे आहेत आणि 'गोव्यांत कूळ कायदा तातडीने लागू केला पाहिजे' असा आग्रह धरणारे आहेत. गोमंतकीय जीवनांतील संघर्षाचीं सारीं बीजें त्यांना ज्ञात आहेत आणि गोव्यांतील सामान्य माणसाची पिळवणूक थांबविण्याचा यत्न करणें हें ध्येय त्यांनी आपल्या डोळ्यांपुढे ठेवलें आहे. 'संघर्ष अपरिहार्य होय' अशी त्यांची धारणा आहे. गोव्यांतील खाणींविषयीं त्यांना आस्था आहे, पण तरीहि '१९५५ ते ६० या काळांत आर्थिक नाकेबंदी असतांनाहि भारतांतून दहा हजार कामगार, भारतीय जकात अधिकाऱ्यांनी बुद्धिपुरस्सर कानाडोळा केल्यामुळे गोव्यांत चोरून नेण्यांत आले' असा उघड आरोप करून आधीच भारत सरकारच्या 'काळ्या यादीं'त मोडणाऱ्या भांडवलदारांना एक टोला मारण्याची जागरूकता त्यांचे ठायीं आहे.

बाबूराव नाईक आणि दिवाकर काकोडकर म्हणजे गोमंतकीय जीवनांतील दोन एकांतिक प्रतीकें होत. या दोन प्रतीकांचे मिश्र आविष्कार मात्र जागोजाग आढळतात. डॉ. पुंडलिक गायतोंडे यांच्या रूपानें या मिश्र आविष्काराचा चांगलाच प्रत्यय मला आला. 'गोमंतकांतील माणसांना तुम्ही ओळखत नाही' अशी आक्रमक प्रस्तावना करून मगच ते माझ्याशीं बोलूं लागले! (ही भेटदेखील बेळगांवातच झाली.) आपलें जुनें जीवन फार चांगलें आहे आणि नवें जीवन हि आम्हाला हवें आहे. अशा परस्परविरोधी भावनांची चिरयुति गोवेकरांच्या मनांत झालेली आहे, असेंच अखेरीस वाटूं लागतें. अशा प्रकारच्या चिरयुतीला प्रादेशिक पार्श्वभूमि तर कारण नाही ना ?

### जुन्या-नव्याचा बेमालुम मिलाफ

कारण, गोमंतकांत पांच दिवस शक्य तितका वेळ निव्वळ भटकण्यांत आणि संभाषणांतच घालविल्यामुळे तेथील एका प्रकाराने माझें मन आकर्षित केलेलें आहे. गोव्यांत निर्जल प्रदेश हुडकून सापडणार नाही. सभोवार हिरवेपणाचें साम्राज्य. माडांनी आणि काजूच्या झाडांनी समस्त प्रदेश व्यापून टाकलेला आणि लहानमोठ्या नद्यांनी संपूर्ण गोमंतक सजल करून सोडलेला आहे. या सुजला आणि सुफला भूमीच्या स्पर्शाने वायुदेवता अहर्निश प्रसन्न चित्ताने वावरणारी. निसर्गाच्या या प्रसन्न सान्निध्याने माणसांची मनेंहि सदैव ताजींतवानीं राहिलीं तर नवल नाही. इतकेंच नव्हेतर, या निसर्गसंपन्नतेमुळे गोमंतकीय जीवनाला संथप्रवाही वळण लागलेलें आहे, पण त्याचबरोबर भूमार्ग आणि जलमार्ग यांचें आधुनिक धर्तीचे जाळें त्या १३०० चौरस मैलांच्या मानवी कानाच्या आकाराच्या इवल्याशा प्रदेशांत सर्वत्र विणलें गेलेलें आहे. आणि अरुंद भूमार्गांची ठेवण लक्षांत घेऊन लहान प्रवासी बसेसची बांधणी करून वाहतुकीचा प्रश्न सोडविण्याची तत्परताहि गोवेकरांनी दाखविलेली आहे. 'मुक्त प्रवेशा'मुळे स्वस्त किंमतींत मोटारीहि उपलब्ध, सारांश. वाहतुकीच्या अत्याधुनिक साधनांची आवक मोठ्या प्रमाणांत गोव्यांत झालेली आहे. पणजी हें अवघें वीस हजार वस्तीचें गांव, पण स्वच्छ आणि सुंदर मार्ग व त्यावरून मिनिटामिनिटाला रंग, रूप आणि वेग या तीनहि बाबींत परस्परांशीं स्पर्धा करीत धावणाऱ्या मोटारींची रीघ या दोन्ही दृष्टींनी पणजी हें छोटेखानी शहर आपल्याहून शतपटीने विशाल रूप धारण करणाऱ्या मुंबापुरीशीं लीलया तुल्यबल ठरेल. संथप्रवाही निसर्ग आणि द्रुतप्रवाही भौतिक सुखसाधना यांचा बेमालूम मिलाफ गोमंतकीय प्रदेशांत झालेला आहे.

या मिलाफाचा एक परिणाम म्हणून किंवा कांही ऐतिहासिक विकासक्रम म्हणून म्हणा, सामान्य गोवेकर फार सावधचित्त


दूरध्वनि क्र. १०३ श्रीरामपूर ] जय सहकार [ तार-छत्रपती-राहुरी.

## दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.

## श्रीशिवाजीनगर, ता. राहुरी, जि. अहमदनगर.

स्थापना-१९५४ ★ सभासदसंख्या-१७९२

कारखान्याचा चतुर्थ ऊंस गळित हंगाम यशस्वीरित्या पार पडला असून हा पांचवा हंगाम दि. ४-१०-१९६१ पासून सुरू झाला आहे. राहुरी सहकारी साखर कारखान्याने साखर उत्पादनांत केलेली प्रगति खालील आकड्यांवरुन दिसून येईल.

| हंगाम | एकूण गळित टन | एकूण साखर पोती |
|---|---|---|
| १९५७-५८ | १,२५,५९४ | १,२७,०४९ |
| १९५८-५९ | १,२३,१५८ | १,४६,३५४ |
| १९५९-६० | १,५६,१७१ | १,८६,५६४ |
| १९६०-६१ | १,०९७,५७ | २,२६,२९५ पावणे तीन भरतीचीं |
| १९६१-६२ | | |
| दि. २०-१-६२ पर्यंत | ९८,९८९ | १,११,३०५ |

पां. दा. पवार — मॅनेजिंग डायरेक्टर

बी. बी. तनपुरे — चेअरमन

भाढळतो. तो प्रमळ आहे, पण भोळसट नाही; तो आतिथ्यशील आहे, पण बेहिशोबी नाहीं. कदाचित गोव्यांतील बुद्धिमंतांची साय म्हणतां येईल असा वर्ग आपलें नशीब काढण्यासाठी गोव्याबाहेर गेल्यामुळे आणि सामान्यतः चतुर या सदरांत मोडणारे अशिक्षित तरुणहि पैसा मिळविण्यासाठी भारतांत येऊन राहिल्यामुळे प्रामुख्याने दुय्यम प्रतीच्या सर्वसामान्य नागरिकांवरच गोव्यांतील कम्युनिदादिशापासून सचिवालयापर्यंतचे सर्व व्यवहार सुरळीत चालविण्याची जबाबदारी गेलीं सुमारे ५०-६० वर्षे येऊन पडलेली आहे. बहुधा या स्वानुभवानेच सर्वसामान्य गोवेकर शहाणा झालेला असावा. कारण कांहीहि असो, सर्वसामान्य गोवेकर फार सावधचित्त वाटला. खरें म्हणजे, मानवी स्वभावाचीं सर्व बरींवाईट रूपें गोवेकरांमध्येहि असणारच, नव्हे तशा कांही रूपें पहावयासहि मिळालीं, तरीहि सावधपणाचा ठसा उमटून जावा, इतकें वेगळें व्यक्तित्व गोवेकर माणसाने घडविलें आहे.

पणजी हें शहर मात्र सर्वसामान्य गोव्याहून भिन्न वाटलें. निसर्गाचें साधर्म्य सोडलें तर गोवेकर जीवनांत तें शहर चपखल बसत नाही. पणजींतील मदिरा भक्तांच्या दर्शनाने 'परमेश्वरा येथे लवकर दारूबंदी आण' असा टाहो फोडण्याची इच्छा माझ्यासारख्या दारूबंदीच्या विराट 'विश्वरूप दर्शनाने' भांबावून गेलेल्या 'निरीक्षका' लाहि झाली, येवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे, पण म्हापसें आणि मडगांव या दोन शहरांच्या दर्शनाने मात्र मन प्रसन्न झालें. या दोन्ही ठिकाणीं कृत्रिमपणाचा साज न चढवलेलीं माणसेंच मला भेटलीं. हिंदूंनी जसें आपलें मनोगत बोलून दाखविलें तसेंच ख्रिश्चनांनीहि. कोणताच आडपडदा नव्हता. मडगांव येथे कांही कारणाने पोलिस चौकीवर थोडा कांही वेळ थांबण्याचा योग आला. ( दिवस होता २४ डिसेंबरचा ) तेवढ्यांत तेथे एक ख्रिश्चन माणूस आला आणि पोलिस अधिकाऱ्याला रागारागाने सांगू लागला, "आम्हाला आज रात्रीं 'मास' करूं नका असा आदेश एका शिपायाने आमच्यावर बंदूक रोखून दिला आहे. आपण माझी तक्रार नोंदवून घ्या."

### ख्रिश्चनांची निराधार भीति

त्यावर त्या भारतीय पोलिस अधिकाऱ्याने आपला खाकी बुशशर्ट अक्षरशः कंबरेपासून वर उचलला आणि त्या ख्रिश्चन माणसाला उद्देशून तो म्हणाला, "हें पहा माझ्याजवळ कांही हत्यार आहे का ? नाही ना ? मग मी तुम्हाला आता सांगतों आहें की, तुम्ही खुशाल 'मास' साजरा करा. कोणालाहि अडथळा होणार नाही. तुम्हाला ख्रिसमस आनंदाचा जावो." आणि एवढें बोलून तो थांबला. तो ख्रिश्चन माणूसहि न बोलतां परत फिरला !

—आणि एका ख्रिश्चन फादरने 'आमच्यावर अन्याय होईल की काय अशी भीति आम्हाला जरूर वाटते' असें अगदी स्पष्टपणें सांगून टाकलें.


पण ख्रिश्चनांवर अन्याय करावा असें गोव्यांतील कोणाहि हिंदूला वाटत नाही. पणजीला जातांना वाटेंत म्हापस्यानजीक एका ठिकाणीं आमचें वाहन वाहतुकींतील अडथळ्यामुळे अडून पडलें, तेव्हा वाहनांतून खाली उतरून भोवतालच्या लोकांशीं गप्पा करीत असतांना एक सामान्य शेतकरी


शेती व औद्योगिक विकासाकरितां महाराष्ट्र सरकारनें तगाईवर
मंजूर केलेलें ५ हॉर्सपावरचें टिकाऊ व उत्कृष्ट

जवाहर

★ व्हर्टिकल डिझेल एंजिन्स ★

● सिंगल सिलींडर ● १५०० फेरे ● फोर स्ट्रोक्स् ● कोल्ड स्टार्ट ● वॉटर कूल्ड ● डिझेल अगर कॅमल केरोसिनवर चालणारें एंजिन ●



एंजिनचें सुटे भाग स्टॅंडर्ड साईझचे व सर्वत्र मिळतात.

एजंन्टस् व विक्रेते :

अहमदनगर तालुका : मे. गोवर्धनदास मनमोहनदास, नगर

पुणें जिल्हा : मे. सर्धन इंजिनिअर्स, पुणें

★ उत्पादक : विजय इंजिनियरिंग अॅण्ड मेकॅनिकल वर्क्स ★

श्रीरामपूर, जि. अहमदनगर

म्हणाला, ' म्लेंच्छ आमच्या वाटेस जात नाहीत आणि आम्ही त्यांच्या वाटेस जात नाही ' पणजीमध्ये एक संसारी बाई म्हणाल्या, ' आमचे देव तसे त्यांचे देव. देवाच्या दर्शनांत आडवे पडण्यांत काय अर्थ ?' दुसऱ्या एक हिंदुबाई म्हणाल्या. ' देवदर्शनाला जायचीदेखील भीति अलीकडे वाटत असे. कोण धटिंगण आडवा येईल त्याचा नेमच राहिला नव्हता. तसें तर आम्ही ख्रिश्चनांना करणार नाही ना ? मग त्यांना एवढी भीति कसली वाटते ?'

एका हिंदुबाईने स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद व्यक्त करतांना ' आता माझ्या भाचीसाठी दरवर्षी ३५ रुपये भरावे लागणार नाहीत ' असें जेव्हा सांगितलें तेव्हा 'भारतीय' मनाचें घरगुती दर्शन मला झालें. त्या बाईची भाची गोव्याबाहेर ' भारतां'त जन्मली होती. एकतर त्या मुलीचें पोर्तुगीज नागरिकत्व पत्करा नाही तर कर भरा, या कचाटींत ती बाई सापडली, तेव्हा दरवर्षी ३५ रुपयांचा कर भरण्याचें तिने पत्करलें ! पणजी येथे एका घरांत दोन दिवस राहण्याचा योग मला आला. त्या घरांतील मराठी तिसऱ्या वर्गांत शिकणाऱ्या मुलाला ' तुझीं पुस्तकें पाहूं ' असें म्हटलें, तेव्हा त्यानें माझ्यापुढे ' मराठी वाचनभारत ' टाकले. त्यांत गांधी नेहरूंचे फोटो पाहून मला आश्चर्य वाटलें. तेव्हा तो मुलगा म्हणाला, 'अहो शाळेंत पुस्तक नेलें की मास्तर हे असे फोटो व धडे फाडून टाकतात. म्हणून मीं हें पुस्तक कधी शाळेंत नेलेच नाही !' आपण केवढा गनिमी कावा लढविला, हें तो मोठ्या अभिमानाने सांगत होता.

## दादा सुखटणकरांचे प्रातिनिधिक बोल

पण गोमंतकांतील ज्या एका माणसाने माझ्या मनावर कायमचा कब्जा केला आहे, त्या माणसाचें नांव सांगितल्याशिवाय मला समाधान होणार नाही. त्या माणसाचें नांव आहे, विठ्ठल उर्फ दादा सुखटणकर. सुखटणकरांची उभी हयात सरकारी नोकरींत गेली आणि गोव्याचे पोर्तुगीज गव्हर्नर जनरल श्री. डिसिल्व्हा यांचें कोकणीचे शिक्षक या नात्यानें त्यांची उच्च सरकारी वर्तुळांत अगदी १६ डिसेंबर म्हणजे भारतीय सेनेने गोव्यांत प्रवेश करण्यापूर्वी अवघे दोन दिवसपर्यंत, दररोज ऊठबस होती. दादा सुखटणकर अत्यंत व्यासंगी, पण तितकेच नम्र आहेत. पोर्तुगीज संस्कृतीच्या संस्कारांवर त्यांचा पिंड पोसलेला आहे. इंग्रजी शिक्षणाचा लाभ झालेली पहिली भारतीय पिढी मिलस्पेन्सरविषयी जसा नितांत आदर बाळगून होती तसाच आदर दादा सुखटणकरांना पोर्तुगाल रिपब्लीकचा पहिला अध्यक्ष अंतोनिओ जुझे आलिमदो या उदारमतवादी पोर्तुगीज विचारवंताविषयी आजहि वाटतो आहे, पण तेहि म्हणाले, " पोर्तुगीजांना हिंदूंविषयी मनापासून द्वेष होता. डिसिल्व्हा हा वागायला फार चांगला. पण भारताचा संबंध आला की, तो चवताळून उठे. "

आणि याच दादा सुखटणकरांनी मला आवर्जून सांगितलें, " आम्हाला ख्रिश्चनांच्यापेक्षा वरिष्ठ स्थान नको आहे. आम्हाला फक्त त्यांच्या बरोबरीने जगतां आलें पाहिजे. येथ एक संगीत संस्था आहे. त्या संस्थेंत भारतीय संगीताला स्थानच नाही. युरोपियन संगीत राहूं द्या, पण त्याचबरोबर भारतीय संगीतहि असूं द्या "

गोवा मुक्त झाला, दादा सुखटणकरांना गहिंवरून आलें. सद्गदित अंतःकरणाने ते मला म्हणाले, " नवी राजवट कशी असेल ? सरकारी नोकरांच्या नीतिमत्तेवरच अखेर कारभाराचें यशापयश अवलंबून असतें. नव्या राजवटीने आपल्या संबंधांत येणाऱ्या प्रत्येकाचा हेतु व भूतकाल पाहून आपलें धोरण व निर्णय ठरवावे. पैसेवाल्यांच्या तंत्राने कारभार चालला तर तो सर्व कारभार हास्यास्पद ठरेल आणि आम्हा गोवेकरांना आगींतून उठून खाईत पडल्यासारखें होईल. "

आणि दादा सुखटणकर जें बोलले तेंच आज प्रत्येक गोमंतकीय माणूस मनांतल्या मनांत बोलतो आहे !

—००—


साईबाबांच्या प्रसादासाठी

★ राजूर पेढे ★

खरेदी करा

मा. :– बाजीराव नाना शिंदे

शिर्डी, ता. कोपरगांव

**समाज प्रबोधन संस्था**

**१२४२ सदाशिव पेठ पुणें २.**

| | | |
|---|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न | दे. अ. दाभोलकर | १·४० |
| लोकशाहीचा कारभार | सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना | ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र | पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय | उषा मोहिनी | २·६० |
| राजकीय पक्षांसाठीं आचार संहिता (संकलित निबंध) | | २·०० |
| भारतीय शेती : आर्थिक बाजू | स. ह. देशपांडे | (छापत आहे) |
| वैज्ञानिक विचार–पद्धति | अ. भि. शहा | |
| स्वतंत्र भारतांतील लोकशाही वाटचाल | चिकित्सक | |
| व्यक्तिमत्वाची आधुनिक कल्पना | ग. वि. केतकर | |





# य. गो. जोशी

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. य. गो. जोशी यांना नुकतेंच एकसष्ठावें वर्ष लागलें आणि एकसष्टी समारंभ थाटानें पार पडला.

आयुष्यांतील या महत्त्वाच्या घटनेच्या सुमारास जोशीबुवांनी साहित्यांतल्या एका नव्या क्षेत्रांत पदार्पण केलें. लेखनक्षेत्रांत आजपर्यंत त्यांनी जें यश मिळवलें त्याचा कळस ते या नव्या क्षेत्रांत गाठणार असें वाटतें.

जोशीबुवांनी ज्ञानेश्वरीच्या गद्य भाषांतरास सुरुवात केली आणि त्यांच्याच 'प्रसाद' मासिकांतून तें क्रमशः येण्यास आरंभहि झाला. वारकरी पंथीयांच्याच दृष्टिनें नव्हे, तर ज्ञानेश्वरीप्रिय असलेल्या सर्व मराठी जनतेच्या दृष्टीने ही घटना कांहीतरी वेगळी अशीच धरावी लागेल. ज्ञानेश्वरीचीं भाषांतरें आधी झालीं नाहीत असें नाही, पण एका सिद्धहस्त लेखकाच्या रसाळ लेखणींतून आणि वारकरी संप्रदायाला वाहिलेल्या 'प्रसाद' सारख्या मासिकांतून हा गद्य अनुवाद देणं यांतच त्याचं निराळेपण आहे.

जोशीबुवांनी अनुवाद करतांना कांहीं स्वतःचें त्यांत घातलें आहे. एका पूर्वजन्मांत आपण नेवास्याला ज्ञानेश्वरांच्याच तोंडची ज्ञानेश्वरी ऐकत आहोंत अशा कथाभागानं त्यांनी सुरुवात केली आहे. ज्ञानेश्वर मंदिरांत आले कसे, बसले कसे, मुक्ताबाई कशी दिसली–नि निवृत्तिनाथ कसे वाटले इत्यादि भाग अर्थातच मूळ ज्ञानेश्वरींत नाही. तसेंच कांहीं ठिकाणीं अनुवादाचा ओघ साधण्यास जोशीबुवांनी कांही भाग मुळांत नसलेल्या दृष्टांतांनी स्पष्ट केला आहे.

हा अनुवाद किती सुबोध नि सरळ झाला आहे याचें प्रत्यंतर त्यांना आलेल्या असंख्य पत्रांवरून येतें. वानगीदाखल त्यांतील कांही उतारे पाहा—

"ज्ञानेश्वरी हें आहे तरी काय ? एवढं त्याचं वर्णन केलं जातं–भाषा सौंदर्याचि, शब्दलाघवाची मुक्तकंठानें स्तुति केली जाते–ही ज्ञानेश्वरी आपल्याला कधीच का वाचतां येणार नाही ? असं नेहमी वाटे, पण आपल्या प्रसाद मासिकानं ती पुरी करून" इ.

हा एका शिकलेल्या बाईच्या पत्रांतील उतारा आहे. दुसरा उताराहि पाहा —

"सर्व मराठी माणसांप्रमाणे आम्हीहि 'ज्ञानेश्वरी' ही योगिराणा ज्ञानदेव यांनी लिहिली आहे व ती फार रसाळ आहे असें म्हणत असू, परंतु त्यांतील आर्ष भाषेमुळे तिची नित्य नियमाने पूजा करण्यापलीकडे आमची मजल आतापर्यंत गेली नाही. आपण लिहिलेल्या ज्ञानेश्वरीनं आमची दृष्टि साफ झाली. ती कठिण आहे हा समज एकदम दूर झाला. आपल्या ज्ञानेश्वरीने मूळ ज्ञानेश्वरीचें दालन खुलें करून आंतील ऐश्वर्याचा उपभोग घेण्याची संधि प्राप्त करून दिली—"

अशीं तीनशें एक पत्रें जोशीबुवांना आलीं आहेत. पत्र लेखकांत साक्षर वारकऱ्यांपासून ते पदवीधर वारकऱ्यांपर्यंतचे सर्व लोक आहेत. आतापर्यंत वारकरी पंथांतील विद्वानांनी ज्ञानेश्वरीचा अर्थ सांगतांना टीकेंत सांगितला. वारकरी संप्रदायांत जे पंथ आहेत त्यांच्या त्यांच्या दृष्टिकोनाला धरून या टीका किंवा अर्थ असल्यानं आपला पक्ष मांडण्याचा आविर्भावच त्यांत जास्त होता व मूळ 'आर्ष' ज्ञानेश्वरी सर्वसामान्यांपर्यंत जावी ही भावना त्यांत नव्हती. त्यामुळे एवढ्या टीका प्रसिद्ध होऊनहि ज्ञानेश्वरी बहुसंख्य मराठी वाचकांस गूढच राहिली होती आणि या गूढतेमुळेच अंधश्रद्धा नि बुवाबाजी यांना वाव राहिला होता.

## प्रवृत्तिवाद वाढीस लागेल

जोशीबुवांच्या सुलभ अनुवादाचें महत्त्व त्यामुळे आहे. हजारो लोक आता ज्ञानेश्वरीचें समजून पठण करतील. त्यांचें शब्दज्ञान तर वाढेलच, पण वाचनाची गोडी लागेल. आणि **ज्ञानेश्वरीवरोबर हळू हळू इतर विषयहि वाचावेसे त्यांना वाटतील. ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ आपल्याला समजतो. हें पाहून त्यांचा आत्मविश्वास वाढेल.** दुसऱ्याच्या दृष्टीकोनांतून एखादा ग्रंथ समजावून घेण्याचा यत्न करणें आणि तो स्वतः समजून वाचणें यांतला फरक त्यांना कळेल. अशा ज्ञानेश्वरीच्या वाचनांत त्यांचा स्वतःचा दृष्टिकोन तयार होईल किंवा वाढेल. स्वतः कांही विचार करावा असें वाटेल आणि आपल्या आयुष्यांतील अनुभवांमधून त्याचें पठण करतांना एक निराळी प्रचीति येईल प्रवृत्तिवाद वाढीस लागेल.

वारकरी पंथ हा आज कोंडलेल्या पाण्यासारखा झाला आहे. ज्ञानेश्वर किंवा तुकाराम यांच्या काळीं जो एक प्रबळ आत्मविश्वास, आवेश किंवा खणखणाट होता तो आता राहिलेला नाही. त्याला बरेचसें कारण 'ज्ञानेश्वरी'च्या बाबतींत झालेलें 'ग्रंथप्रामाण्य' हें आहे. जोशीबुवांनी ग्रंथ सोपा करण्यास जी भर घातली ती ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांत घालून आपला अधिकार त्यांनी ओलांडला किंवा मर्यादा सांडली हा आरोप त्यांच्यावर केला जात आहे. हें ग्रंथप्रामाण्याचें चिन्ह आहे. परंतु आरोपांना न भितां जोशीबुवांनी अनुवाद केला आणि प्रसिद्ध केला याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

अशी कल्पना करा की, खेड्यांतील घरांत जोशीबुवांचा अनुवाद वाचला जात आहे. शेतमजुरापासून तों बायाबापड्यांपर्यंत अगदी समजून आनंदानं ते ऐकत आहेत. इथेच जेव्हां मूळची ज्ञानेश्वरी वाचली जाई तेव्हां फक्त शब्द वाचले जात, अर्थ वाचला जात नसे. केवळ श्रद्धेनें लोक बसून रहात, आता तसें होण्याचें कारण नाहीं. ज्ञानेश्वरी सर्वांना मुक्तकर्णानें लुटतां येईल.

श्री. य. गो. जोशी यांना एकसष्टावें वर्ष लागलें. त्यांना असेंच आणखी आरोग्यपूर्ण दिर्घायुष्य लाभो. आपण लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या अनुवादाचीं सुंदर फळें त्यांना पाहायला मिळोत ही इच्छा.

———

*"आयेषा, थांब ! थांब !" खान धावत विहिरींच्या कांठावर आला. पण तोंपर्यंत आंत चौथऱ्या-वर उभ्या असलेल्या खोजाच्या तलवारीने आयेषेचें शीर धडा-पासून वेगळें केलें होतें.*

**सौ. मालती तेंडूलकर**




**ती**नशे वर्षापूर्वीची ती रात्र होती. वैशाख नुकताच संपला होता. दुपारच्या वेळीं वळवाच्या पावसाची सर पडून गेल्यामुळे रात्रीच्या हवेंत मधून मधून शीतलतेचा भास होत होता. मध्यरात्र उलटत चालली होती. राजधानीच्या-विजापूरच्या राजमार्गावरची वर्दळ मात्र कमी झालेली नव्हती. उलट ती जास्त वाढली होती. ठिकठिकाणीं लोकांचे थवे जमून हलक्या आवाजांत कुजबुजत होते. बादशाही सेवक रस्त्यांतून जात असतां एकाद्या ओळखीच्या माणसाशीं दृष्टादृष्ट झाली तरी ओळख न देतां हलक्या पावलाने पुढे निघून जाई. इतर मंडळी एकामेकाकडे बघून दबल्या ओठांनी हास्य दाखवत व किंचित् मान डोलावत. राजधानीच्या राजमार्गावरचीं मेवामिठाई, कापडचोपड, दागदागिने वगैरेंचीं दुकानें बंद होतीं, पण आंत तेवत असलेल्या दिव्याची तिरीप त्यांच्या बंद फळ्यांच्या फटींतून रस्त्यावर दिसत होती. पानपट्टीचीं दुकानें मात्र उघडीं होतीं. त्यांचा विक्रा खूब चलला होता, पण नेहमी-प्रमाणें पानपट्ट्या खाऊन विनोदाने गप्पा मारणाऱ्या रंगेल मंडळींचा तांडा दुकाना-भोवती उभा नव्हता. प्रत्येकजण मुकाटपणें पानपट्टी घेई. पानाचा विडा गालांत भरून पैसे देण्यासाठी आपला हात जाकिटाच्या खिशांत घाली, इतक्यांत पानपट्टीवाला त्याच्या कानाशीं लागे, त्याची कानगोष्ट स्पष्ट कळावी म्हणून गिऱ्हाइकहि एक तंगडी उंचावून त्याची बातमी ऐके, मुकाटपणें खिशांतून पैसे काढी, त्याच्या समोरील तबकांत ते टाकून तेथून हळूच काढता पाय घेई.

त्या पानवाल्याशेजारीच एका फुलवाल्या माळणीचें दुकान होतें. ती विजापूरच्या राजदरबारांत फुलें पुरवी. तिच्याजवळ मोगरा, गुलाब, चाफा, बकुळ इत्यादि सुगंधी पुष्पांच्या अस्सल जाती असत. या पुष्पांची नयनमनोहर गुंफण साधण्यामध्यें या फुलवालीचा हातखंडा असे. दुपारभर सर्वांना फुलें पोचतीं करून सांज झाली की, ती राजरस्त्यावरील आपलें दुकान सुगंधमय सुंदर फुलांची आरास करून उघडें ठेवी. खास गिऱ्हाइकांसाठी आंतल्या दालनांत बसण्याची सोय होती. आंतील भव्य आरश्यांमुळे ठिकठिकाणीं मांडून ठेवलेल्या आंतील आकर्षक पुष्पराशी द्विगुणित होत असत व अत्तरांच्या दिव्याच्या प्रकाशांत तें दालन नंदनवनाचा भास निर्माण करी. फुलवालीचें दुकान उघडलें की, निरनिराळ्या मधमाश्यांबरोबरच लोकांची झुंबड दुकानावर पडे व अर्ध्या तासाच्या आत तिचीं फुलें संपून जात. आज नित्याप्रमाणे फुलवालीने दुकान उघडलें. तिन्हीसांज झाली होती. दरबारी पखालवाला गुलाबपाण्याचा सडा रस्त्यावर शिंपून गेला होता. रस्त्यावरच्या गुलाबपाण्याच्या सुगंधामध्ये फुलवालीच्या फुलांचा संमिश्र सुगंध एकदम मिसळला आणि नंदनवनाचा आभास निर्माण झाला.

फुलवाली आपली रेशमी ओढणी तोंडावरून किंचित् मागे सारून फुलांच्या राशीजवळ उभी राहिली. दुकान उघडलें गेलें, पण कुणी गिऱ्हाईक दुकानाजवळ फिरकेना. फक्त आपले पंख दिव्याच्या उजेडांत चमकावत मधश्याशा मात्र त्या पुष्पराशीभोवती पिंगा घालूं लागल्या. फुलवालीने एकदा त्यांच्याकडे पाहिलें. आपली काळीभोर भुवई किंचित् वक्र करीत तिने रस्त्यावर दृष्टिक्षेप केला. रस्त्यावरून जाणारे-येणारे पुष्कळ होते. त्यांच्यामध्ये तिचीं नेहमीचीं गिऱ्हाइकेंपण होतीं; पण कुणी तिच्या दुकानाकडे वळेना. तिने तोंडावर ओढणी ओढली आणि ती दुकानाच्या सज्जाजवळ आली. वाकून वाकून जाणाऱ्या-येणाऱ्याचा तिने कानोसा घेतला, पण कुणी तिच्याकडे दृष्टि टाकेनात. रस्त्यावरचें वातावरण चमत्कारिक झालें होतें. तिने ओढणीचा पदर मागे सारला आणि कुणी सलगीचें गिऱ्हाइक दिसतें का म्हणून आपल्या शोधक दृष्टीने ती पाहूं लागली. तिच्या चतुर दृष्टीने हेरलें की, आजचा रंग कांही न्यारा आहे.

समोरच्या कापड दुकानाशीं उभा असलेला सय्यदखां तिला पाहतांच चोरपावलांनी तिच्या बाजूला वळला आणि त्याने तिला डोळ्याने खूण केली. फुलवालीने राजमार्गावरच्या इतर दुकानांकडे पाहिलें. दुकानें उघडीं होतीं, पण नेहमीचा दिव्यांचा झगझगाट तेथें दिसत नव्हता तर मंद तेजाच्या समया शांतपणें प्रकाश देत होत्या, दुकानांत-मालक दिसत नव्हते. एकादा दुसरा नोकर अंग चोरून उभा होता. कांही दुकानें तर बंद होऊं लागलीं होतीं. फुलवाली मंदगतीने आपल्या दुकानांत शिरली. आंत शिरतां शिरतां सहजगत्या तिने दाराची फळी आंत ओढली. तिचें दुकान बंद झालें. त्या बंद दुकानाच्या आसऱ्याला लोकांचा घोळका

जमला. द्वाराच्या फटींतून येणारा फुलांचा सुगंध त्यांच्याभोवती लपेटला गेला. सय्यदखां दुकानाच्या मागच्या बाजूने आंत शिरला.

मध्यरात्र उलटली तरी राजधानीचा नूर असाच होता. अशा वेळीं राजधानीच्या तटाबाहेर दूर असलेल्या खानाच्या वाड्याच्या पिछाडीच्या गच्चीवर एक सौंदर्यसंपन्न युवती राजधानीकडे टक लावून पाहत होती. तिच्या डोक्यावर तारांगण तळपत होतं. आसमंतांत एक प्रकारची निःस्तब्ध शांतता नांदत होती. खानाच्या भव्य वाड्याच्या परिसरांत निजानीज झाली होती. पहारेकऱ्यांच्या पावलांच्या आवाजानें व बगीच्यांतील वृक्षराजीच्या पानांतून वागडणाऱ्या वाऱ्याच्या सळसळीनें ती शांतता जराशी चाळवली जात होती. राजधानीच्या तटाबाहेर त्या तरुणीला कसलीहि हालचाल दिसत नव्हती. आकाश निरभ्र असल्यामुळे व गच्ची बरीच उंच असल्यामुळे त्या तरुणीच्या नजरेची फेक राजधानीच्या तटापर्यंत पोंचत होती. राजधानीच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या गोल घुमटाचा घुमट पूर्वेच्या आकाशामध्ये एखाद्या तपस्व्याप्रमाणें भासत होता. त्या तरुणीची–आयेषेची नजर त्या जगद्विख्यात घुमटावर खिळली.

गोल घुमट हा विजापूरकरांच्या सत्तेच्या अहंकाराचा प्रतीक होता. मोगल बादशहाला–दिल्लीश्वराला –– गोलघुमटाची प्रतिकृति उभारतां आली नव्हती. त्यामुळे तुल्यबल राजसत्तेचा हा कमीपणा विजापूरच्या अदिलशहाचा अहंकाराचा विषय झाला होता, पण गोलघुमटाला भव्यतेबरोबर प्रीतीची रम्यताहि लपेटली गेली होती. त्यामुळेच आयेषेची नजर गोलघुमटावर खिळतांच ती प्रीतीच्या कल्पनारम्यतेमध्ये गुंग झाली. अशी ती कितीतरी वेळ उभी होती. कुणीतरी तिच्या पाठीमागे येऊन बराच वेळ उभें राहिलें, पण तिला शुद्ध नव्हती.

'प्यारी—' हळुवारपणें साद आली.

केव्हढ्यांदा आयेषा दचकली! ज्याची ती आलोचन वाट पाहत होती तोच पाठीशीं उभा होता.

खानाने हात पसरले. आयेषा त्याच्या बाहुपाशांत घुसली. आपलें मस्तक तिने खानाच्या रुंद छातीवर विसावलें. खानाने तिचे केस कुरवाळले. नाजुक लतेचा वटवृक्षाला विळखा पडला.

'प्यारी आयेषा, अजुनी तूं जागी! पहाटेच्या गार वाऱ्यामध्ये उघड्या आकाशाखाली खडी?'

'हां जी हुजूर! आपली वाट पाहत होतें. चैन पडेना तेव्हा गच्चीवर आलें, शांत वाटावं म्हणून! आज बादशहाकडे एवढी रात उलटेपर्यंत काय होतं?' खानाच्या विशाल खांद्यावर आपला गाल घाशीत आयेषाने विचारलें.

'हां! महत्त्वाचें काम होतें. फारच महत्त्वाचें काम होतें. खान पुटपुटतच जवळच्या संगमरवरी आसनावर बसला. आयेषा त्याला बिलगून उभी राहिली.

'बादशहापेक्षा बडीसाहेबा फारच अस्वस्थ आहे. त्यांची तब्येत एकदम पडली आहे.' विमनस्कपणें खान बोलत होता.

'काय झालं आहे त्यांना? काय कमी आहे त्यांना?' आयेषेने अधीरपणें विचारलें.

'अदिलशाही साम्राज्याला भयंकर धोका आहे. घरचे लोकच सुरुंग लावायला निघाले आहेत. बडी साहेबांची तब्येत नरम झाली तर नवल नाही. मला सहन होईना त्यांची तळमळ!' खानाने सुस्कारा सोडला. 'आज आमच्या खास सभेमध्ये त्यांनी कळवळून प्रत्येकाची विनवणी केली. अदिलशाही वांचवा, वांचवा म्हणून! आम्हाला आज्ञा करण्याऐवजी त्यांनी आमची मनधरणी केली. ही लाचारी मला पाहवली नाही. आयेषा, मी खडा झालों. गरजलों एकदम की, त्या काफराची गर्दन मारून मालीकच्या पायाशीं आणीन, नाहीतर स्वतःची गर्दन मारून घेईन.' बोलतां बोलतां खानाचा आवाज चढला.

आयेषेने आपल्या नाजुक हातांनी त्याचें तोंड बंद केलें.

'छे–छे– काय हें बोलणें! जगांतील पराक्रमी सत्तेच्या पराक्रमी सरदाराची सत्ता स्वतःच्या गर्दनीवर असत नाही बरं!' आयेषेने विनोद करण्याचा प्रयत्न केला. आपल्या बाहुपाशाचा विळखा त्याच्या गळ्यांत घातला, पण तिचा स्वर कातर झाला होता, शरीराला कंप सुटला होता.

खानाने तिच्या पाठीवर हात फिरवला– 'वेडी कुठची! एवढी घाबरलीस? पण राजकारण हें तुझ्यासारख्या प्रेमसुंदरीला कसं समजणं शक्य आहे? पण प्यारी आमचें जीवन फक्त पराक्रमासाठी असतं–राजकारणासाठी असतं–राजकारणाचे डाव खेळत असतां प्रेमाच्या कोमल भावनांचे पाश सूर्योदयाच्या वेळच्या धुक्याप्रमाणे कुठच्याकुठे विरून जातात! ती पहा पूर्व दिशा उजळूं लागली. जा तूं आता! थोडी विश्रांति घे. मलाहि सकाळच्या दरबारासाठी राजधानींत जायचं आहे!' खानान तिला दूर करीत म्हटलें.

पण आयेषा त्याला अधिकच बिलगली. तिला कुरवाळीत खान म्हणाला; 'आयेषा' बिबी, कशासाठी तूं माझ्यावर हें प्रेम करत्येस? काय पाहिलंस माझ्यामध्ये तूं! पण अल्लाचा असा एक कायदा आहे की, परस्परविरोधी वस्तूंमध्येच फार घनिष्ट आकर्षण असतें. तसं तुझं–माझं आहे. मी एवढा दांडगा मनुष्य तर तूं एक नाजुक फूल! पंचवीस वर्षांच्या ज्वानीची तूं पोर, तर पन्नाशी उलटून गेलेला मी एक म्हातारा! कशासाठी–कशासाठी माझ्यावर तूं हें नितांत प्रेम करतेस?' आयेषेचे दोन्ही दंड धरून खानाने तिला समोर उभें केलें.

"हुजूर काय हा प्रश्न? प्रीतीच्या दृष्टीला असले भेद कधी रुजू झाले आहेत का? आपण युद्धाच्या गोष्टी बोलतां, स्वतःची किंवा दुसऱ्याची गर्दन मारण्याची भाषा आपणाला आनंद देते, उन्माद देते, पण–पण नुसती ती भाषा ऐकतांच माझें अंग शहारून निघतें. प्रेममय अल्लाच्या राज्यांत ही अघोर भाषा कशी निर्माण झाली? आपल्याशिवाय या जगांत मी कशी जगूं मालीक?"
आयेषेचा कंठ दाटून आला. तिच्या चेहऱ्यावर तिच्या हृदयाचें प्रतिबिंब दृग्गोचर होत होतें. तिच्या काळ्याभोर डोळ्यांतील भाव खानाच्या हृदयाला हालवून गेले. प्रीतीपेक्षा वात्सल्यानेच खानाने तिची हनुवटी वर उचलली.

'आयेषा, लक्षांत ठेव. कांही झालं तरी मी तुला अंतर देणार नाही. सर्व बाजूंनी आपण विजोड आहोंत, पण अल्लाच्या इच्छेने एकत्र आलों आहोंत. एकमेकांची ओळख आपल्याला पटली आहे. आपलें प्रेम आपण पारखलें आहे. खुदाच्या पायापाशीं आपलें स्थान आहे. त्या ठिकाणीं आपण गेलों, की, आपली विजोडता नाहीशी होणार आहे. आपलें खरें मीलन होणार आहे. पुढच्या

काळांत कांही घटना भराभर घडणार आहेत. कांहीं प्रसंग आला तरी लक्षांत ठेव या अफझलखानाचें तुझ्यावर निस्सीम प्रेम आहे. जा आता ! ' खान उठून उभा राहिला. त्याने आवेगाने आयेपाच्या मस्तकाचें चुंबन घेतलें. ' जा ! '

आयेपाने गुडघे टेकून खानाला अभिवादन केलें अन् मंद पावलांनी ती तेथून निघाली. तिच्या पाठमोऱ्या कमनीय आकृतीवर व गुलाबी ओढणीवर उगवत्या अरुणाच्या लालसर छटा पसरल्या. पहाटेच्या मंदमधुर थंडीमध्ये आयेपेच्या पाठमोऱ्या आकृतीकडे खान निश्चल नजरेने पाहत राहिला. जिन्याच्या तोंडाशीं पोहचतांच आयेपेने मागे वळून पाहिलें. ती हसली. तिच्या तोंडावर अरुणाचा प्रकाश पसरला. आयेपाच्या स्वर्गीय सौंदर्याचा आस्वाद लुटण्यासाठीच जणु तो पुढे सरसावत आहे असा भास झाला. तिचें तें निर्व्याज, सौंदर्यसंपन्न मुखमंडल पाहून खान दिपल्यासारखा झाला. आयेपेला हसून प्रत्युत्तर देण्याचें भानहि त्याला राहिलें नाही. आयेपेने तोंड फिरवलें अन् ती निघून गेली.

खानाची तंद्री मात्र उतरली नाही. तिच्या त्या प्रेमपूर्ण सौंदर्यदर्शनाने त्याच्यासमोर एक समस्या उभी केली. आपण येथून गेल्यावर आयेपेचें काय? त्याच्या मनांत एक कल्पना चमकली. त्याने अस्वस्थपणें इकडे तिकडे पाहिलें. क्षितिजावर डोकावणाऱ्या बालसूर्यबिंबाकडे त्याची नजर वळली. त्याची मुद्रा निश्चयी झाली. तो मागे फिरला आणि दुसऱ्या दरवाजाने झपाझप् खाली उतरला.

अफझुलखानाने विडा उचलला. सारें विजापूर हादरलें. आदिलशहाची राजधानी एकदम जिवंत झाली. आदल्या दिवसापासून दबलेलें वातावरण उत्साही बनलें. राजमार्गावरील दुकानांतून हालचाली सुरू झाल्या. राजदरबारामध्ये सरदार अफझुलखानाने शिवाजीला ठार मारण्याचा विडा उचलला ही बातमी विजेच्या वेगाने राजधानीभर पसरली. आपणच मोठी जिद्द जिंकली अशा थाटांत प्रत्येक जण वावरूं लागला. राजमार्गावर गुलाबपाण्याचा सडा घातला गेला. रस्त्यावर ठिकठिकाणीं गुलाल पेरला गेला. नाद संगीताचे स्वर ठिकठिकाणाहून निघूं लागले. नवीन कापडचोपड, दागदागिने घेण्यासाठी गिऱ्हाईक दुकानांतून गर्दी करूं लागलें. फुलवालीच्या दुकानावर निरोपावर निरोप येऊं लागले. बसल्या जागीं, तालामध्ये मांडी हलवीत पानपट्टीवाला झपाट्याने विडे तयार करूं लागला. चोवीस तासापूर्वी अदिलशाहीचें भवितव्य चिंतेच्या घनदाट बादळांत गिरक्या खात होतें. बडी साहेबीण व्याकुळ झाली होती. जोराने श्वास घेतला तर तिच्या तब्येतीला धक्का लागेल अशी भीति प्रत्येकाला वाटत होती, पण आता अफझुलखानाने शिवाजीला ठार मारण्याचा विडा उचलून तिला निर्धास्त केलें होतें. बडीसाहेबीण आनंदाने खूप झाली. सारी राजधानी आनंदली.

शहाजीराजाच्या मुलाने, शिवाजीने आदिलशाहीविरुद्ध कारवाई चालू केली होती. आदिलशाहीचा पुणे–मावळ भाग त्याने स्वतःच्या ताब्यांत घेतला. आदिलशाहीशीं स्वामिनिष्ठ असलेल्या जावळीच्या चंद्राराव मोरेला कैद करून ठार केलें. नवे किल्ले बांधले. आजतागायतच्या इतिहासांत अशी घटना कधी घडली नव्हती. शिवाजीचें पारिपत्य जर वेळेवर झालें नाही तर आदिलशाही खतम होणार होती. या विचाराने तरुण आदिलशहा व त्याची राजमाता बडी साहेबीण हवालदील झाली. सारें विजापूर उदास बनलें. सारे व्यवहार थंडावले. आपल्या विश्वासू सरदारांना एकत्र बोलावून तिने एक खास बैठक भरवली होती. या खास बैठकीमध्ये अनेक घालून पाडून बोलणीं, वादविवाद झाले. मध्यरात्र उलटून गेली तरी बैठक संपली नव्हती. परीक्षेचा निकाल ऐकण्यासाठी एखादा विद्यार्थी आपला जीव एकवटून, श्वास कोंडून राहतो त्याप्रमाणे या बैठकीचा निकाल ऐकण्यासाठी विजापूरचे प्रजाजन साशंक बोट पाहत होते. पहाटेला बैठक संपली, पण बाहेर निकाल कळला नाही, पण सकाळींच दरबार असल्याची वार्ता समजतांच शहर हालूं लागलें. राजरस्त्यावरून सरदारांच्या पालख्यां, गाड्या जातांना दिसल्या. कांहीजण घोड्यांवरूनहि गेले. बरेच प्रजाजन उत्सुकतेपायी आतील किल्ल्याच्या दरबार महालापर्यंत प्रवेश मिळवण्याची खटपट करूं लागले. थोड्यां अवधींत अफझुलखानाच्या प्रतिज्ञेची वार्ता शहरभर पसरली. बडी साहेबिणीने खानाला खाश्या स्वाऱ्यांबरोबर खान्याला ठेवून घेतलें. राजमार्ग शृंगारण्याच्या आज्ञा सुटल्या, कारण त्या मार्गाने बडीसायबीण खानाला स्वतःच्या खास गाडीतून त्याच्या वाड्याकडे पोहचविणार होती.

राजमार्ग शृंगारण्याची एकच धांदल उडाली होती. प्रत्येकाने उत्तम कपडे चढवले होते. मौल्यवान् दागदागिने घातले होते. विनोदाचे संवाद बोलण्याला ऊत आला होता. हास्याचे फवारे चोहोकडे उडत होते. आज अफझुलखान प्रत्येकाचा देव बनला होता.

राजशाही गाडी रस्त्यांतून जाऊं लागली. आबालवृद्ध जमिनीला डोकें लावून कुर्निसात करूं लागला. फुलवालीच्या दुकानासमोर गाडीला जाण्यासाठी फुलांचा गालीचा पसरण्यांत आला होता. ठिकठिकाणच्या इमारतीच्या सज्जांतून स्त्रीसौन्दर्य ओढण्या बाजूला सारून अफझुलखानाची दृष्टिभेट घेण्यासाठीं नाचत होतें. खानाची छाती अभिमानाने फुगली होती. राजमातेशेजारी बसून राजमार्गाने सर्वांचे मुजरे घेत जाण्याचें भाग्य त्याला लाभलें होतें. अहंकाराचा दर्प त्याच्या नसानसांतून ओसंडत होता, पण त्याच्या चेहऱ्यावर एक सूक्ष्म विषादाची छटा कळत नकळत झळकत होती. हळूहळू राजशाही गाडी राजमार्ग संपवून त्याच्या वाड्याच्या रोखाने निघाली.

अफझुलखानाच्या वाड्यामध्ये एकच धांदल चालली होती. राजमाता खानाच्या वाड्याला भेट देणार होती. हा मान फार मोलाचा होता. कसल्याहि कारणाने आदिलशहाच्या राजस्त्रिया दुसऱ्याच्या निवासस्थानीं जात नसत. फक्त राजघराण्याशा संबंधित लोकांना

स्वादिष्ट मिठाईके लिये !
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदीरके पास, मार्केट रोड, पूना २.

तो मान मिळे. अफझुलखान हा एक भटाऱ्याचा मुलगा होता, पण आपल्या शक्तीने व राजकारणपटुत्वाने त्याने वैभव तर कमवलें होतेंच, पण आज राजसन्मानहि त्याला मिळत होता. एका गांवाएवढा त्याचा वाडा होता. त्याच्या जनानखान्यामध्यें त्याच्या चौसष्ट बेगमा होत्या. कांहीं त्यांच्या सौंदर्यासाठी निवडल्या गेल्या होत्या, कांहीं राजकारणासाठी जोडल्या गेल्या होत्या, तर कांहीं युद्धाच्या लुटींत पळवल्या गेल्या होत्या. आयेषेची कथा वेगळी होती. एका दरोडेखोरांच्या टोळीच्या तावडींतून खानाने तिचीं सुटका केली होती. तिच्या नातलगांचा ठावठिकाणा नव्हता. खानाच्या आश्रयाला ती राहिली आणि तिची निःस्सीम भक्ति पाहून खानाने तिच्याशीं निका लावला होता.

राजमातेचें स्वागत खानाच्या मोठ्या बेगमेने गुडघे टेकून व जमिनीचीं चुंबनें घेऊन केलें. खानाचे पुत्र राजमातेची पिकदाणी आणि पानाचें तबक घेऊन उभे होते. खानाचा राजविलासी दिवाणखाना आज पावन झाला होता. खानाच्या इतर बेगमा कोपऱ्या–कोपऱ्यांतून, झरोक्यांतून, सज्जांतून राजमातेच्या दर्शनासाठी सारखी धडपड करीत होत्या. दासदासींची धावपळ चालू होती.

आयेषा मात्र या गडबडींत दिसत नव्हती. स्वतःच्या महालाच्या एका खिडकींतून समोरच्या वृक्षाकडे पाहत ती संथ उभी होती. एक मोठा गोंगाट झाला. राजमातेचा ललकार झाला. राजशाही गाडी राजधानीच्या मार्गाने निघाली. आयेषा शुद्धीवर आली. दिवसभरच्या गडबडींतून खान आता मोकळा झाला असेल, तो आपणाला भेटायला येईल, या जाणिवेने ती आरशासमोर उभी राहिली. आपल्या विलोभनीय प्रतिबिंबाकडे तिने नजर टाकली आणि महालांत टांगलेल्या झुल्यावर ती बसली, परंतु खान तिच्या महालाकडे आला नाही. एवढंच नव्हे तर पुढे कित्येक दिवस तो तिच्या दृष्टीलाहि पडला नाही. आयेषेचा जीव बेचैन झाला. तिनें खानाची भेट घेण्याची खटपट करून पाहिली, पण तिला यश आलें नाही. एकदा खान बाहेरून आल्याचें कळतांच दासीच्या हातांतून मद्याची सुरई घेऊन ती स्वतः खान बसलेल्या महालांत गेली. खानाने तिच्याकडे पाहिलें. स्मित केलें. ती धावतच खानाकडे निघाली, पण खानाने जवळ असलेली तलवार उचलली व कामासाठी बाहेर जातों असें म्हणत तो निघून गेला. आयेषा हतबुद्ध झाली.

शिवाजीवर स्वारीला जाण्याच्या तयारीमध्ये खान गढून गेला होता. आयेषाला आपल्या एकलेपणाची जाणीव भाजून काढूं लागली. खानाचा स्वारीवर निघण्याचा दिवस ठरला.

नव्या महिन्याचा चांद पाहून प्रचंड सेनेनिशी खान शिवाजीवर स्वारी करण्यास निघणार होता. खानाच्या वाड्यामध्ये कांहीतरी विलक्षण खळबळ उडाली होती. कुणाच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. भीतीचें वातावरण निर्माण झालें होतें. बगीच्यांतील एका चबुतऱ्यावर गादी गालिच्याची बैठक घातली होती. त्यावर लोडाला टेकून खान बसला होता. पानाचें तबक जवळ होतें. सोन्याची सुरई मद्याने भरलेली होती. दुसऱ्या एका सुरईमध्ये वाळयाने सुवासिक केलेलें पाणी भरलेलें होतें.

जनानखान्यावरचा खोजा त्याच्या मोठ्या बेगमेच्या महालांत गेला. बगीच्यामध्ये येऊन भेटण्याची खानाची आज्ञा त्याने तिला सांगितली. मोठी बेगम खानापुढे येऊन उभी राहिली. खानाने उठून तिचें स्वागत केलें.

'बेगमसाहेबा, मी एक दिव्य करण्याचा विडा उचलला आहें. त्या कामगिरीवर मी निघणार आहें तुमचा निरोप घेण्याची माझी इच्छा आहे' असें बोलून त्याने जवळच्या सुरईंतील पाणी एका पेल्यांत ओतलें व तो पेला तिच्यापुढे केला. तिने तें पाणी पिऊन टाकलें; शेजारच्या तबकांतील विडा तिच्या तोंडांत घातला तिला आलिंगन दिलें आणि खोजाबरोबर जाण्यास तिला खूण केली. खोजा तिला वाड्याकडे घेऊन गेला नाही. दुसऱ्या खोजाबरोबर बगीच्याच्या टोंकाकडे जाण्यास तिला त्याने विनंती केली व तो माघारी फिरला. दुसऱ्या बेगमेला त्याने तसेंच पाचारण केलें असा क्रम सारखा चालला होता. खानाच्या बेगमांना पाचारण येई. त्या वाड्याबाहेर पडत, पण त्यांतील एकहि बेगम परत वाड्यांत येत नसे.

सूर्य पश्चिमेकडे कलला होता. खान फार अस्वस्थ दिसत होता. तो अस्वस्थपणें येरझाऱ्या घालत होता. खोजे एकाद्या यांत्रिक पुतळ्याप्रमाणे आपलें कर्तव्य बजावत होते. त्याचा मुख्य खोजा वाड्यांतून बगीच्यामध्यें आला तो एकटाच आला. खानाने वर दृष्टि करून पाहिलें. आपल्या घोगऱ्या आवाजाने खोजा उत्तरला–

'कसूर माफ करावी हुजूर, पण मेहर बेगमसाहेबा महालांत नाहीत.'

'कुठे गेल्या त्या ? सर्व वाड्याचा शोध घेतलास ?' खानाने विचारलें.

'हां जी हुजूर ! कदाचित् त्या इकडे आल्या असतील म्हणून इकडे आलों.'

'जा जा शोध घे त्यांचा. साऱ्या दासदासींना वाड्याचा कोपरान् कोपरा शोधायला सांग आणि त्यांचा शोध लागला नाही तर–तर छोट्या बेगम साहेबांना आण.' खानाने आज्ञा दिली.

तो करीत असलेलें कृत्य आता त्याच्या मनाचा ताबा घेत होतें. सर्व दिवसभराचा ताण त्याला जाणवूं लागला होता. त्याच्या हृदयांतील विलक्षण खळबळ त्याचें रक्त जाळूं लागली होती. दर क्षणीं त्याचा ताबा जाऊं पाहत होता. जोरजोराने मोठ्याने ओरडावें असें त्याला वाटूं लागलें. डोक्याचे केस उपटून काढावे असें त्याला वाटूं लागलें. कुणीतरी चारी बाजूने आपल्याला काळ्या कपड्यांत लपेटत आहे असें भासूं लागलें.

'कधी येणार हा खोजा ! बेवकूफ, या समशेरीने करतों त्याचा शिरच्छेद !' खान स्वतःशींच पण मोठ्याने बोलला. इतक्यांत समोरच्या वाटीकेंतून आयेषा त्याच्याकडे पळत येत असलेली त्याला दिसली.

खानाच्या संतप्त मनःस्थितीला विसावा मिळाला. खानाला समोर पाहतांच आपली पोपटी रंगाची ओढणी तिने सावरली. खानापुढे गुडघे टेकून ती बोलली–

'तुम्हीं बोलवलंत मला हुजूर ? फार दिवसांनी आपली भेट घडत आहे.' आपले मनोहर डोळे खानाच्या मुखावर तिने रोखले.

'आयेषा, हो ! मीं बोलावलं तुला. तुझा निरोप घेण्यासाठी मी बोलावलं आहें तुला. मी स्वारीवर जात आहें. शिवाजीच्या हातून मी जिवंत परत येईन ही मला आशा नाही.' खानाचा स्वर कंपित झाला. आयेषेने खानाला मिठी घातली.

'नाही ! नाही, हुजूर ! असें कधी घडणार नाही. आज अमावास्येला असं नका बोलूं.' आयेषा काकुळतीने म्हणाली.

'आयेषा, माझ्या सर्व बेगमांचा मीं निरोप घेतला आहें. तुझ्यावर माझा जीव आहे म्हणून सगळयांच्या शेवटं बोलावलं मीं तुला. शांत चित्ताने, घट्ट मनाने ऐक. मी जिवंत परत येणार नाहीं. मो माझ्या पराक्रमाची शिकस्त करीन. मी माझ्या मुत्सद्दे‌गिरीची शिकस्त करीन. मी माझ्या कुटिलपणाची शिकस्त करीन. मी माझ्या कारस्थानांची शिकस्त करीन, पण माझा आत्मा मला सांगतो आहे; मी पुन्हा माघारीं येणार नाहीं.' खान थांबला. आपल्या कुशीमध्ये त्याने आयेषेला धरली होती. आयेषा हुंदके देऊन रडत होती.

"रडूं नकोस अशी ! या वेळीं तुझ्या डोळयांतील अश्रू मला दाखवूं नकोस. पूस डोळे ! मला तुझा अखेरचा निरोप घेऊं दे." खानाने आवंढा गिळला. आपल्या हाताने तिचे डोळे पुसले.

सुरईतील पाणी पेल्यांत ओततांना त्याचा हात कांपत होता. आयेषेने पेला ओठाला लावला. पाणी प्याल्यावर प्रसन्न मुद्रेने तिने त्याच्याकडे पाहिलें.

तबकांतील विडा त्याने उचलला आणि आपल्या हाताने तिच्या तोंडांत घातला. हळुवारपणें त्याने तिच्या गालावरून हात फिरवला. तिच्या गळयावर त्याचा हात गेला. चटका बसल्याप्रमाणे त्याने हात बाजूला घेतला ! आयेषेने विस्मयाने त्याच्याकडे पाहिलें. खानाने आवेगाने तिला आलिंगन दिलें, कितीतरी वेळ तो तिला पुन्हा पुन्हा आलिंगन देत होता.

"चल पोचवतों मी तुला !" दोघेंहि जाण्यास निघालीं. तिच्या पायांतील नूपुरांचा नाजुक ध्वनि त्या शांत बागेमध्ये त्याला भीषण भासूं लागला. सूर्य क्षितिजावर टेकला होता. त्याचे मावळते किरण वृक्षांच्या शेंडयावर नाचत होते. आयेषेच्या खांद्यावर हात टेकून खान चालत होता.

खान एकदम थबकला. पाठीमागून येणाऱ्या खोजाला पाहून तो म्हणाला–

'जा प्यारी आयेषा, जा तूं याच्याबरोबर. आपल्या मीलनाचा योग अल्लाच्या पायाशीं लवकरच येईल.' खानाने तिचें दीर्घ चुंबन घेतलें व तिच्यापासून झटक्याने तो मागे फिरला.

आयेषा त्याच्याकडे पाहात उभी राहिली. दुसऱ्या क्षणीं तिने तोंड फिरवलें व खोजाबरोबर खानाने दाखवलेल्या दिशेकडे तिने पावलें वळवलीं. खान थबकला. आयेषेच्या पाठमोऱ्या आकृतीकडे व्याकुळतेने त्याने पाहिलें. तिला थांबवण्यासाठी खानाने आपले हात पुढे केले आणि तो त्वरेने तिच्या मागोमाग निघाला.

सूर्याने क्षितिजापलीकडे उडी घेतली होती. आकाशभर लालभडक रंग पसरला होता. चपलगती आयेषा बागेंतील त्या एकीकडच्या विहिरीजवळ येऊन पोहचली. त्या विहिरीची बांधणी विलासी पद्धतीची होती. पाण्याच्या भोवती प्रशस्त चौथरा होता. बाजूला दगडी कमानी असून उन्हाळयामध्ये खानाचें वास्तव्य या कमानीजवळच्या दालनांत असे.

आयेषा विहिरीच्या पायऱ्यांजवळ पोहचली. आपल्या अल्लड गतीने पायऱ्या उतरून जाण्यासाठी ती पाऊल उचलणार इतक्यांत त्या विहिरीच्या स्वरूपावर तिची नजर पडली. त्या विहिरीचें पाणी लालभडक मेंदी कालवल्याप्रमाणे झालें होतें. साऱ्या चौथऱ्यावर रक्ताचा सडा सांडला होता. ठिकठिकाणीं रक्ताचे ओघळ वेडेवाकडे वाहात येऊन पाण्याला मिळाले होते. आकाशांतील लाल रंग पृथ्वीवरच्या या रंगपंचमीला उजाळा देणाचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे असे भासत होतें


आयेषा थबकली. ओठांतून बाहेर पडणाऱ्या किंकाळीला तिने दाबून धरलें. विहिरींतील दृश्य बघून भीतीच्या पाकोळचा तिच्या डोळयांतून उडून गेल्या. एक क्षण मागल्या पावली पळावें असें तिला वाटलें, पण तें एकच क्षण. ती स्थिर उभी राहिली. तिच्या समोरच्या भयंकर दृश्याचा अर्थ ती उमगली. तिचें धैर्य तिच्या अंगात संचारलें. तिच्या प्रेमाची ती परीक्षा होती. तिने अभावितपणें मागे वळून पाहिलें. थोडया अंतरावर खान हात पसरून उभा होता. तो जागच्या जागीं खिळल्याप्रमाणे उभा होता. रक्तपाताच्या कल्पनेने लतेप्रमाणे थरथर कांपणारी आयेषा आता रक्ताच्या चिखलांत मृत्यूचें स्वागत करण्यासाठी सहजगतीने उभी होती. आयेषेचें हें धैर्य पाहतांच खानाला अचंबा वाटला. शिरिषकुसुमाचें रूपांतर वज्रामध्ये झालें. ही जादू कशी झाली ? खान तिच्याकडे टक लावून पाहत होता. दरक्षणीं त्याला वाटत होतें की, आपल्या पसरलेल्या बाहुपाशांत आयेषा आश्रय घेणार. पण––

आयेषेने एक कटाक्ष खानाकडे टाकला. दोघांची दृष्टादृष्ट झाली. विद्युत्वेगाने आयेषा विहिरीच्या पायऱ्या उतरली. खानाची छाती फाटली. आयेषेच्या कटाक्षाने खानाला अल्लाची ओळख दिली.

"आयेषा, थांब ! थांब !" खान धावत विहिरीच्या कांठावर आला, पण तोंपर्यंत आंत चौथऱ्यावर उभ्या असलेल्या खोजाच्या तलवारीनें, आयेषेचें शीर धडापासून वेगळें केलें होतें. बाहेरचा काळोख विहिरीमध्ये दाटीवाटीने घुसूं लागला होता. कर्दनकाळ खानाच्या तोंडून किंकाळी बाहेर पडली. त्याने जमिनीवर बैठक मारली. डोक्याचे केस तोडीत तो ओक्साबोक्शी रडूं लागला !

या घटनेला तीनशे वर्षे लोटलीं, पण आजहि विजापूर शहराच्या पश्चिम बाजूला चार मैलांवर अफझुलखानाच्या पडक्या वाडयाचे अवशेष आहेत. त्याच्या अमानुषी अत्याचाराची साक्ष देणारी विहीर मात्र बरीच शाबूत स्थितीमध्ये तेथे आहे. त्या विहिरीमध्ये पाणी आहे, पण आज त्या पाण्याचा रंग निवळलेला आहे. या भीषण कृत्याला साक्षी असलेल्या विहिरीच्या भिंती तशाच उभ्या आहेत. विहिरीच्या बाहेर खानाच्या ६३ बेगमांचीं थडगीं ओळीने आहेत. त्यांपैकी आयेषेची कबर अमुकच म्हणून दाखवतां येणार नाही. तिच्या स्वर्गीय आत्मयज्ञाची साक्ष आसपासच्या वास्तू आणि निसर्ग याशिवाय कोण देणार ?

———



# प्रदर्शन की जत्रा?

आनंद माधव

**प्रदर्शनांत साधारणपणें दोन प्रकारचे लोक येतात. एक ' थाटवाले ' आणि दुसरे 'चाटवाले.' प्रदर्शन सामान्य भारतीय नागरिकांसाठी आहे; पण वर्चस्व मात्र इंग्रजीचें. देशी कारखानदारांच्या मंडपांमध्ये शुकशुकाट. रशिया, अमेरिका यांच्या मंडपांपुढे प्रेक्षकांच्या रांगा. प्रदर्शनाचा मूळ हेतु मात्र भारताच्या औद्योगिक प्रगतीच्या वाटचालीचें दर्शन. देशी कारखानदारांचे परदेशी ' यजमान '......
या कांही वाक्यांवरुनच या लेखांतील प्रतिपादन इतरांपेक्षां वेगळें आहे हें ध्यानांत येतें. दिल्लीच्या औद्योगिक प्रदर्शनावर आजवर आपण अनेक परिचयात्मक लेख पाहिलेत. हा एक ' आत्मनिरीक्षणात्मक ' लेख पाहा.**

दिल्ली हें आपलें राजधानीचें शहर. लोकसभा व राज्यसभा यांच्या अस्तित्वामुळे व थोर पुढाऱ्यांच्या वास्तव्यामुळे असेल कदाचित् राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीचें दिल्ली हें एक महत्त्वाचें केन्द्र बनलें आहे. उद्योगमंत्रालय, केंद्र सरकारचीं इतर महत्त्वाचीं खातीं आणि विदेशांचे राजकीय आणि व्यापारी प्रतिनिधि मुख्यत: दिल्लींतच असल्याने देशांतील उद्योगधंदेवाल्या लोकांचा या ना त्या कारणानें दिल्लींत कायम राबता असतो. विशेषत: थंडीच्या हंगामांत परदेशी प्रवासीहि दिल्लीमध्ये प्रतिवर्षी मोठ्या संख्येने येत असतात.

या सर्व कारणांमुळे सोईचें पडत असेल म्हणून म्हणा अगर आणखी कांही कारणें असल्यामुळे दिल्लीमध्ये आजकाल लहान-मोठीं आणि वेगवेगळ्या प्रकारचीं प्रदर्शनें सारखीं भरत असतात. मोठें औद्योगिक प्रदर्शन असेल, तर तें दिल्लींतच असायचें असा जणूं दंडक पडूं पाहात आहे आणि दिल्लींत असलीं मोठीं प्रदर्शनें कोठे भरायचीं हेंहि ठरलेलेंच असतें. पुराणा किल्ल्यापासून हार्डिज ब्रिजपर्यंतच्या भागाला आता ' नुमाइश मैदान ' असेंच लोक म्हणूं लागले आहेत. चालू प्रदर्शन संपलें की, आता त्या मैदानावर एक कायमचें प्रदर्शन करण्याची कल्पनाहि सरकारने मंजूर केली आहे.

मोठें प्रदर्शन म्हणजे दिल्लींतल्या लहान-मोठ्या कंत्राटदारांना व व्यापाऱ्यांना, सुतार, गवंडी, इलेक्ट्रिशियन या हुन्नरांना; चित्रकार, मूर्तिकार फोटोग्राफर या कलाकारांना आणि रिक्षा-टॅक्सीवाल्यांना एक पर्वणीच वाटते. सर्व सामान्य नागरिक मात्र अटकळ बांधतात की, आता बसमधून आणखी गर्दी होणार, उगीचच (पुन्हा कमी न होणारे) पदार्थांचे भाव वाढणार, घरीं १-२ पाहुणे येणार आणि सगळे लोक जातात म्हणून एकदा-दोनदा तरी प्रदर्शन पाहायला जावें लागणार!

## प्रदर्शनांची उभारणी

या मोठाल्या प्रदर्शनांची आखणी कशी काय करतात याबद्दल मला मोठें कुतूहल होतें आणि म्हणून दिनांक १४ नोव्हेंबरला यंदाच्या प्रदर्शनाचें उद्घाटन व्हायचें जाहीर झालें होतें, तरी ८-१५ दिवस अगोदरपासून प्रदर्शनाच्या आवारांतून फेरफटका मारण्यास मीं सुरुवात केली. जसजसा उद्घाटनाचा दिवस जवळ येऊं लागतो, तसतसा या उभारणीच्या कामाला जोश (टेम्पो) येतो. अक्षरश: रात्रंदिवस कामें चालू होतात. गवंडी, सुतार आणि मजूर मिळवायचे आणि त्यांना दुसरा कुणी स्टॉलवाला पळवून नेत नाहीना यावर लक्ष ठेवायचें हेंच काम होऊन बसतें. प्रदर्शनाकरतां मंडप ( पॅव्हिलिअन ) उभारायचा म्हणजे त्याची शिल्पाकृति ( आर्किटेक्चर ) चमत्कृतिकारक, निदान नेहेमीपेक्षा कांहीं वेगळी पाहिजे असा तज्ञ लोकांचा दंडक असावा अशी मला शंका येते. कधी प्रवेशद्वार वाकडेंतिकडें करतील, कधी एखादी भिंत तिरकस उभी करतील, कधी मध्येच एखादें सुळक्यासारखें कांहीतरी उंच गेलेलें असेल. असें करण्यामध्ये निव्वळ नावीन्यापेक्षा, त्या मंडपांतल्या प्रदर्शनीय वस्तूंशीं अगर प्रदर्शनीय विषयाशीं सहजी संबंध दर्शविणारें मंडपाचें

स्वल्प असावें असें तुम्हा-आम्हाला वाटेल, पण आर्किटेक्ट नांवाच्या तज्ञांचें मत यापेक्षा वेगळें असतें. असा माझा अनुभव आहे. एक-दोन ठिकाणीं मुद्दाम थांबून विचार करण्याचा मीं प्रयत्न केला की, या विशिष्ट आकाराच्या इमारतीचा काय अर्थ असावा! एके ठिकाणीं मीं इंजिनिअरसारख्या दिसणाऱ्या माणसाला विचारलेंसुद्धा; तो म्हणाला, 'याला म्हणतात



**'याला म्हणतात आधुनिक आर्किटेक्ट!'**

आधुनिक आर्किटेक्ट. याच्यामध्ये पौर्वात्य आणि पाश्चात्य शिल्पकल्पनांचा मिलाफ आहे. याच्यामध्ये कलावंताची भरारी आहे आणि अद्ययावत् शास्त्रीय सिद्धांतांची बैठक आहे —' माझ्या एवढेंच लक्षांत आलें की, आपल्यासारख्याला सहजी समजण्यासारखें हें प्रकरण नाही.

एक गोष्ट मात्र माझ्या लक्षांत आली की, हे दिल्लींतले, प्रदर्शनांत वेगवेगळ्या क्षेत्रांत कामें करणारे कारागीर मोठे झटपट रंगारी असतात. नेहमीच्या परिस्थितींत एखादें बारीकसें खोपटें बांधायला आपल्याला अगर सरकारलाहि अनंत अडचणी येतात. आज सिमेंट नाही म्हणून काम थांबलें, उद्या लोखंड मिळत नाही; सर्व इमारत बांधून झाली तर रंगारी सांपडत नाही आणि विजेचें साधें फिटिंग करायलाहि इलेक्ट्रिशिअन दिवसन् दिवस घालवतो, पण इथे पाहावें तर आज ज्या आवारांत सर्वत्र विस्कळितपणा असेल, तिथे ४-८ दिवसांत एक सुंदर शिल्प रंगरंगोटी करून दिव्यांच्या झगमगाटांत एखाद्या लग्नसमारंभांतल्या मंडपासारखें नटून थटून साजरें झालेलें दिसेल. आज ज्या रस्त्यावरून धूळ नकोशी होत आहे, ते ४-५ दिवसांत डांबरी होऊन त्यांच्या कडेला सुरेख हिरवळीचे गालीचे पसरलेले दिसतील. दिल्लींत हिरवळींना तोटा नाही. यमुनेच्या सुपीक गाळाच्या त्या जमिनींत कोठेहि पाणी मुरलें की, लगेच हिरवी लव उगवते. पण म्हणून एका ठिकाणची वाढलेली हिरवळ दुसरीकडे ठेवली जात असेल यावर माझा विश्वास बसला नसता, पण प्रदर्शनाच्या आवारांत हेंहि दृश्य दिसलें. एका ट्रकमध्ये शिगोशीग वाढलेली हिरवळ भरली होती आणि एका मंडपाच्या आवारांत, जशा आपण अंगणांत फरशा बसवतों, तशी ही हिरवळ बसविण्याचें काम चालू होतें. २-३ दिवसांत पाहिलें तर त्या आवाराला सुरेखशी हिरवळ शोभा देत होती.

या सर्व कामाला लागतो फक्त पैसा. तो मंडप मांडणाऱ्याजवळ असला की, प्रदर्शनांत कांही कमी नाही. साध्या साध्या कामाला एवढे पैसे कसे असें जर तुम्हीं विचारलेंतच तर तुम्हाला साधें आणि सरळ उत्तर मिळतें की, "हें प्रदर्शन आहे, इथे एवढे पैसे पडायचेच."

१४ नोव्हेंबरला प्रदर्शनाचें अधिकृत उद्घाटन झालें आणि प्रदर्शनाच्या आवारांत आता माणसांच्या झुंडीच्या झुंडी दिसूं लागल्या. संध्याकाळच्या वेळीं लक्षावधि दिव्यांनी झगमगणारें तें आवार पाहून एखाद्या जादूनगरीचा किंवा मयपुरीचा भास होऊं लागला. उंच मनोऱ्यांवरून सुरेल संगीताचे स्वर प्रेक्षकांचीं मनें रिझवूं लागले. कोपऱ्या कोपऱ्यांवर कारंजीं उडूं लागलीं, खाद्यपेयें विकणाऱ्या उपहारगृहांचीं पालें लागलीं, चौकाचौकांतून व प्रवेशद्वारांवर आधुनिक चित्रकलेचे व मूर्तिकलेचे नमुने उभारले गेले आणि एखादे नवीन पिक्चर रिलीज (सिनेमाचें उद्घाटन) झाल्यावर जसें, दिग्दर्शक, भांडवलदारांपासून, कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या डोक्यावरचें ओझें उतरतें, तसें स्टॉल्स्च्या उभारणींत गुंतलेल्या सर्व तंत्रज्ञांचें आणि कारागिरांचें झालें. मग सिनेक्षेत्रांतल्या माणसांप्रमाणेच ते एकमेकांना विचारूं लागले "काय, कसा काय वाटतो आमचा (शो) स्टॉल तुम्हाला?"

प्रचंड, रेखीव, कलापूर्ण, आकर्षक आणि लखलखीत असें प्रदर्शन तर उभारलें गेलें; सरकारी खात्यांचा, कारखान्यांचा खाजगी औद्योगिक संस्थांचा आणि कांही परराष्ट्रांचाहि या प्रदर्शनाच्या उभारणीसाठी अमाप पैसा खर्च झाला; प्रदर्शनांतून हिंडतां हिंडतां माझ्या मनांत विचार येई कशाकरतां हा एवढा खटाटोप? कशाकरतां हा प्रचंड खर्च? काय उद्देश आहे याचा? काय साधलें जात आहे यामधून?

## प्रदर्शनामागील 'हेतु' कोणता?

रविवारीं आणि सुट्टीच्या वारीं तर प्रेक्षकांची एकच गर्दी उसळूं लागली. मला कळलें एका रविवारीं तर जवळ जवळ एक लाख लोकांनी प्रदर्शन पाहिलें! कोण लोक येतात हें प्रदर्शन पाहायला? काय करतात इथं येऊन? न राहवून मीं एका जाणकार दिल्लीकर मित्राला विचारलेंसुद्धा; तो म्हणाला, 'प्रदर्शनांत साधारणपणें दोन प्रकारचे लोक येतात. एक 'थाटवाले' आणि दुसरे 'चाटवाले'. प्रदर्शन पाहणाऱ्यांमध्ये या दोन गटांची संख्या शे. ९० हून जास्त असेल.'

थाटवाले लोकांची जोडी मोठी पाहण्यासारखी असते. (ही मंडळी बहुशः जोडीनेच येतात). उंची वस्त्रें परिधान करून आणि थटून, आपल्या कपड्यांना कुणाचा स्पर्श तर होत नाहीना आणि सर्वांचें आपल्या थाटामाटाकडे लक्ष जातें आहे की नाही याची काळजी करीत मोठ्या संथपणें सर्व आवार (बाहेर बाहेरून) फिरणें आणि शेवटीं प्रदर्शन मोठें चांगलें आहे असें म्हणून घरीं जाणें हा यांचा सर्वसाधारण कार्यक्रम असतो.

'चाटवाल्या' मंडळींची तऱ्हा अगदी दुसऱ्या टोकाची असते. (ही मंडळी १०-५ च्या तरी गटांत येतात.) मोठा आवाज, गोंगाट, आणि धांवपळ करीत, बायकापोरांचें लेंढार सांभाळत हे लोक सर्व मंडप फिरतात. प्रत्येक ठिकाणीं 'ये क्या है बाबूजी' करीत करीत मुख्यतः ठिकठिकाणीं वांटलीं जाणारीं परिपत्रकें, जाहिराती, कॅलेंडरें वगैरे मोठ्या हौसेने गोळा करतात आणि शेवटीं एखाद्या चाट हाऊसमध्ये (भेळ-पाणीपुरी, दहीवडा, यांचीं दुकानें) जाऊन आपल्या जत्रा वृत्तीचें

(फेस्टिव्हल मूड) पारणें फेडतात. प्रदर्शनाला मुळी ते जत्राच समजतात.



**प्रदर्शनाला मुळी ते जत्राच समजतात.**

" प्रदर्शन फार मोठं आहे! प्रदर्शन फार प्रेक्षणीय आहे ! " असे उद्गार सगळीकडे ऐकूं येऊं लागले. प्रदर्शन पाहून गेलेला प्रत्येक प्रेक्षक प्रदर्शनाचें भव्य आणि रमणीय स्वरूप पाहून भारावून गेलेला दिसला. एका प्रेक्षकाला मीं मुद्दाम विचारलें की, प्रदर्शन भव्य आणि प्रेक्षणीय आहे या तुमच्या मताशीं मी सहमत आहें, पण हें औद्योगिक प्रदर्शन पाहून तुम्हाला भारतांतल्या उद्योगधंद्यांबद्दल कांही विशेष माहिती मिळाली का ?

" खरं सागायचं म्हणजे तुमच्या या उद्योग-विद्योगाबद्दल फारसं आपल्याला कांही कळत नाही " तो म्हणाला." पण एकंदरीने हिंदुस्थानांत फार झपाट्याने उद्योगधंदे निघत आहेत आणि हळूहळू आपण चांगलीच प्रगति करीत आहोंत असें वाटतें. "

प्रदर्शन पाहून आल्यानंतर वास्तविक पाहतां आमच्या औद्योगीकरणांतील प्रगतीची स्वाभिमानपूर्वक जाणीव व्हावयास हवी आणि ती बहुसंख्य प्रेक्षकांमध्ये होत असेल तर एवढ्या मोठ्या खटाटोपाचें बरेंचसें फलित मिळालें असेंच मी म्हणेन, पण प्रदर्शनाच्या दर्शनाने ही जाणीव फार क्षीणपणें होते. एक तर पाहणारे लोक वरवरच्या भपक्याने भारावून जाणारे आणि प्रदर्शनाची मांडणीहि प्राधान्य भपक्याला आणि वर्ण्यविषय दुय्यम अशा प्रकारची अनेक ठिकाणीं दिसली. याचें मुख्य कारण असें की, प्रदर्शनाचा नेमका हेतु आखणी आणि योजना करतांना दृष्टीसमोर ठेवला गेलेला नाही.

खाजगी औद्योगिक कारखान्यांनी मंडप मांडतांना कंपनीची स्थापना कशी झाली इथपासून इतिहास कथन न करतां आमच्या कारखान्याच्या कष्टामुळे, कौशल्यामुळे आणि विविध उत्पादनामुळे देशाचें औद्योगीकरण कसें भरभराटीला येत आहे, देशाचा किती तऱ्हांनी फायदा होत आहे याचें प्रभावीपणें कथन केलें असतें तर प्रेक्षकांच्या ध्यानांत त्या कंपन्याचें नांव न घोळतां तिच्या कार्यामुळे होणारी देशाची प्रगति लक्षांत राहिली असती !

## इंग्रजीचें वर्चस्व कां ?

देशाच्या औद्योगिक प्रगतीचें सर्वसामान्यपणें सिंहावलोकन आणि दर्शन हाच या प्रचंड प्रदर्शनाचा प्रधान उद्देश गृहीत धरला तरी अनेक प्रश्नांचीं उत्तरें मिळत नाहीत.

हें दर्शन देशांतला सर्वसामान्य नागरिक घेणार, निदान त्याने तें घ्यावें अशी अपेक्षा असणार. हा आमचा सर्वसामान्य भारतीय नागरिक अजूनहि फारसा इंग्रजी जाणणारा झालेला नाही, ही गोष्ट मान्य करायलाच हवी. मग हें प्रदर्शन जवळजवळ पूर्णपणें इंग्रजी भाषेंतून कां ? एके ठिकाणीं मला एक दृश्य दिसलें आणि खरं सांगायचं म्हणजे मनांत कुठेतरी गलबलल्यासारखें वाटलें.

एक जपानी दांपत्य प्रदर्शन पाहात हिंडत होतें. त्यांच्याबरोबर एक शीख तरुण दुभाष्याचें काम करीत होता. एका देशी कंपनीच्या मंडपामध्ये एक पंजाबी युवक त्या शिखाला इंग्रजी भाषेंतून वर्णन सांगत होता. आणि दुभाषी तें जपानी भाषेंतून पाहुण्यांसाठी बोलत होता. हिंदी कां नाही ? इंग्रजी कां ? मी म्हणतों दोघांनाहि निदान पंजाबी येत होती ? पंजाबी कां नाही ! त्या जपान्यांना तर इंग्रजी समजत नव्हती ! पण अशा तऱ्हेचा विचार मनांत येणं म्हणजेसुद्धा कोतेपणा समजला जाऊं लागला आहे. मग प्रदर्शनांत इंग्रजीचा जवळजवळ अट्टाहास दिसला तर नवल वाटायला नको. निरनिराळ्या राज्यांचे मंडप प्रदर्शनांत आहेत. त्यांनी त्यांनी तरी आपापल्या राज्यभाषेंतून मंडप कां नाही सजवले ? ही कल्पना तरी अजून आपल्याला आवडते की नाही कुणास ठाऊक!

" दिल्लींतला सर्वसामान्य नागरिक थोडेंफार इंग्रजी जाणणारा आहे. " असें एक धारिष्टाचें विधान एके ठिकाणीं माझ्या तोंडावर फेकण्यांत आलें. मी आपला गप्प बसलों.

मनांत विचार आला, इंग्रजीचा उलगडा झाला, पण प्रदर्शन पाहण्याची दिल्लीच्याच नागरिकांना एवढी वारंवार सक्ती कां ? एक नाही दोन नाही. १९५५ नंतरचें या स्वरूपाचें हें पांचवें प्रदर्शन दिल्लींतच भरतें आहे. मुंबई, कलकत्ता, मद्रास, हैद्राबाद अशासारख्या विविध प्रांतांतील भारतीय नागरिकांसमोर आपण आपली औद्योगिक प्रगति कां मांडीत नाही ?


**व्ही. जोशी अँण्ड को.**

**ब्लॉक मेकर्स**

अँड

**आर्ट प्रिंटर्स**

शनिपार नजीक, गोखडे बोळ, पुणें २

**– पांढरे डाग –**

अनेक बक्षिसें व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किं. ६ रु. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं


★ **नकली वैद्यांपासून सावध राहावें** ★

**वैद्य– बी. आर. बोरकर**

आयुर्वेद भुवन,

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

प्रदर्शनांत येणारा प्रत्येक प्रेक्षक प्रथम अमेरिका आणि रशिया यांच्या मंडपांपुढें




**प्रदर्शनांत येणारा प्रत्येक इसम रशिया-अमेरिका यांच्या मंडपांपुढे रांगा लावतो.**

रांगा लावतो. त्यामुळे देशी कारखानदारांच्या मंडपांमधून त्या मानाने पुष्कळच शुकशुकाट असतो. देशांतल्या प्रमुख अशा सर्व औद्योगिक घराण्यांनी या प्रदर्शनांत भरपूर पैसे खर्च करून मोठाले मंडप उभारले आहेत. यांच्या दर्शनाने हीं औद्योगिक घराणीं किती वेगवेगळ्या क्षेत्रांत हातपाय पसरून स्वतःचीं औद्योगिक संस्थानें (Industrial Kingdom) वाढवीत आहेत याची जाणीव होते कोणताहि. प्रमुख उद्योग घ्या, देशांतल्या आघाडीवरल्या ४-५ औद्योगिक घराण्यांचा त्याच्याशीं संबंध पोहोंचलेला आहे असेंच आपणास आढळेल.

उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण आणि विकेंद्रीकरण या गोष्टी विचारवंत लोक बोलत असतां त्यांचें कोणत्या दिशेने 'केन्द्रीकरण' होत चाललें आहे याचा अभ्यास करणाऱ्यांनी या प्रदर्शनांतल्या देशी कंपन्यांचे मंडप जरूर पाहिले पाहिजेत.

## ही आमची प्रगति कशी ?

हे मंडप पाहात असतांना आणखी एका गोष्टीची कटु जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. गेल्या १०-१२ वर्षांत यांत्रिक

# मासलेवाईक 'आहेर'

प्रदर्शनाचें यशापयश व त्यावरून आपल्या औद्योगिक वाटचालीचें मोजेमाप ठरवितांना आम्ही सन्मानपूर्वक बोलाविलेले हे परदेशी तज्ज्ञ आपल्याविषयी काय म्हणतात तेंहि पाहून ठेवा.

मि. जॉन. एफ् स्टॅनले हे शास्त्रज्ञ ४० ब्रिटिश शास्त्रज्ञांच्या एका डेलिगेशन (सदिच्छा मंडळ) बरोबर गेल्या वर्षी भारतांत आले होते. भारतीय मानक संस्थेमध्ये (Indian Standard-Institute) झालेल्या कसल्याश्या परिसंवादांत त्यांनी भाग घेतला आणि नंतर या मंडळींनी दहा दिवसांत ३००० मैलांचा प्रवास करून आधुनिक भारताचीं अनेक तीर्थक्षेत्रें पाहिलीं. या यात्रेनंतर मायदेशीं परत गेल्यावर तिथल्या एका मसिकांत त्यांनी "A Visit to India" हा छोटासा लेख लिहिला. [ Soap, Perfumery and Cosmetice; Feb. 1961; Page 165 ]

या लेखांत भारतांतील औद्योगिकरणाबद्दल स्टॅनले महाशय काय लिहितात तें मुळांतूनच वाचलें पाहिजे.

"One is forced to the conclusion that in India they can make **anything** (जाड ठसा मुळांत) no matter how complicated technically, provided, certain conditions are fullfilled namely that :

a) You give them the money to build and equip a factory.

b) You give them the technical personnel to teach them the knowhow and

c) You give them a design to copy.

आशय असा-हे भारतीय कितीहि क्लिष्ट अशी कोणतीहि तांत्रिक प्रगति करूं शकतात, फक्त त्यांना तुम्ही कारखाना बांधण्यासाठी आणि यंत्रसामुग्री उभारण्यासाठी पैसा दिला पाहिजेत आणि हुबेहुब नक्कल करण्यासाठी आराखडा दिला पाहिजे.

आपल्या 'प्रचंड' औद्योगिक प्रगतीची एवढी मिस्किल टवाळी आपण आजवर कुठे वाचली आहे काय ?

★ ★ ★

रासायनिक, धातुविषयक, शेतीविषयक; असे सर्व क्षेत्रांतील उद्योग आपल्या देशांत झपाट्याने वाढत आहेत यात शंका घेण्याचें कारणच नाही. पण मन खट्टू अशासाठी होतें कीं, एखाद्या साध्या जंतुनाशकापासून तों थेट मोठ्या यांत्रिक साधनांच्या निर्मितीपर्यंत प्रत्येक निर्मितींत आपल्याला कोणत्या तरी परदेशी कंपनीचें साहाय्य जणु कांही टाळतांच येत नाही असें वाटलें. विशेष हें की, ' अमुक एका निर्मितीत आम्हीं अमक्या अमक्या जग-प्रसिद्ध कंपनीच्या हाताला हात लावला ' असं मोठं आवर्जून सांगण्यांत आपल्याला अभिमान वाटतो सर्व देशी कंपन्यांनी प्रदर्शनांत काय मांडले असेल तर ' अमक्याशीं हातमिळवणी करून अमुक पदार्थाचा कार-खाना काढला ! तमक्याशीं सोयरीक करून हें करणार आहोंत.' ही परदेशी उसन-वारी. याच चालीवर एकेका देशी कंपनीने पांच परदेशी ' यजमान ' केल्याचीं उदाहरणें सुद्धा कांही कमी नाहीत.

प्रश्न असा आहे, यामध्ये अभिमानाने सांगण्यासारखें कांही आहे का ? वाटली तर थोडीशी खंतच वाटायला हवी. परक्यांच्या सहकार्याशिवाय आम्ही हें करूं शकत नाही असाच विदारक अर्थ यांतून निघत नाही का ? धनाची मदत, आपत्कालांतली किंवा झटपट प्रगति करायची आहे म्हणून घेतलेली परकीय आर्थिक मदतहि एकवेळ मी क्षम्य मानतों, पण साध्यासुध्या गोष्टींतसुद्धा आपणास परक्यांची तांत्रिक मदत कां लागावी ? आमच्या राष्ट्रीय संशोधन शाळा, परदेशांत जाऊन शिक्षण घेऊन आलेले इंजिनिअर्स, शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांचा हा एक प्रकारचा अपमान आहे असें आपणास कां वाटूं नये ?

## कांहीं चांगले अपवाद

कांही विशिष्ट हेतूने प्रभावीपणें या प्रदर्शनांत कांहीच मांडण्यांत आलेलें नाही असा या विवेचनाचा अर्थ नव्हे. अनेक चांगल्या गोष्टीहि हें प्रदर्शन पाहणाऱ्याला समाधान देतात. तांत्रिक प्रदर्शन मांडण्याचें म्हणून एक तंत्र आपल्याकडे हळूहळू पण निश्चितपणें रूप घेत आहे. तांत्रिक बारकावे आणि क्लिष्ट शास्त्रीय विषय चटकन् नजरेंत भरतील या पद्धतीने आणि सोप्या भाषेमध्ये अनेक ठिकाणीं विवरण केलेलें आढळलें.

' भारतीय निर्यात ' हा मंडप आपल्या देशाच्या विविध निर्यात व्यापाराची कल्पना आणून देणारा म्हणून फार महत्त्वाचा आहे. आपणहि जगाच्या बाजारांत कुणीतरी आहोंत ही आत्मविश्वासाची आणि अभि-मानाची भावना या मंडपाच्या दर्शनाने वाढीला लागण्यास हरकत नसावी.

एका मंडपामध्ये देशांतल्या छोट्या मोठ्या कारखानदारांना फार चांगल्या पद्धतीने आवा-हन केलेलें आढळलें. इंडियन टेलिफोन इंड-स्ट्रीजच्या स्टॉलमध्ये, टेलिफोनच्या निर्मिती-मध्ये आपण सध्या आयात करीत असलेल्या छोट्या–मोठ्या भागांचें प्रदर्शन एकत्रितपणें मांडलें होतें. दर्शनीय प्रेक्षकांना विचारलें होतें, आपण कारखानदार असाल तर या वस्तूंपैकी कोणतीहि वस्तु तयार करून आम्हास आणि पर्यायाने देशास मदत करूं शकतां ? अशा तऱ्हेच्या आवाहनांतून जुन्या कारखानदारांना नवी दृष्टि निर्माण झाल्या-शिवाय राहणार नाही. कांही नवीन उद्योगहि यांतून निर्माण होणें शक्य आहे.

## तुम्ही महाराष्ट्रीय दिसतां !


परदेशांच्या वैभवशाली मंडपांचे उल्लेख मीं मुद्दामच टाळले आहेत. त्यांची माहिती आतापर्यंत अनेक लेखांमधून आपण वाचलीच असेल, पण थोड्या चिकित्सक बुद्धीने आपण प्रदर्शनांतून हिंडूं लागलांत तर पदोपदी तुम्हांस अडखळल्यासारखें होतें. प्रश्नांचीं उत्तरें देणारे अडचणींत पडल्यासारखे बोलूं लाग-तात. एका मंडपामध्ये मी असाच विविध प्रश्न विचारून माहिती मिळवूं लागलों, तेव्हा उत्तरें देणारा तरुण मनुष्य न राहवून मला म्हणाला –' एवढे बारीकसारीक प्रश्न विचा-रतां, तुम्ही बहुतेक महाराष्ट्रीय दिसतां ? ' मीं लगेच ताडलें की, हें ओळखणारा माणूसहि मराठीच असला पाहिजे. शेवटीं थोड्या गप्पासप्पा झाल्यावर त्याने मला प्रेमळ सल्ला दिला की, ' इथे दिल्लींत, असें प्रत्येक गोष्टीला कां व कसें विचारीत बसलांत तर तुमची फारच पंचाईत होईल !'

★ ★ ★

## मृगजळाचीं तळीं झालीं तर

साऱ्याच मृगजळांच
तळीं झालीं तर,
हरणांची जात–
पांगळी होईल.
सारींच स्वप्नें,
खरीं झालीं तर–
माणूस
नुसता निद्राधीन होईल.
निराशा आशेची जननी आहे,
प्रकाशाची जन्मदा रजनी आहे,
भास आहेत,
म्हणूनच–
श्वास आहेत.
व्यथा नसतील तर,
जीवनाची कथा कंटाळवाणी होईल.
शिखराचें नांव यश आहे
पण,
पाया आहे, तें अपयश आहे.
वास्तु तरी काय ?
भिंतींनीं मोजलेलें आकाश आहे.
विश्वाचा ग्रंथकार—
फार उदार आहे.
कथेंतल्या पात्रांवर—
त्याची सारी मदार आहे.
पात्रांच्या करणीमागे
त्याची लेखणी जाईल.
पांगळीं हरणें,
पेंगणारी माणसें,
यांच्यांत ' खेळ ' होणार नाही
दोघांच्याही चरित्रांतील
चमत्कार नाहीसा होईल.
आहे तीच रहाटी युक्त आहे;
कर्ता कलेंतून मुक्त आहे;
म्हणून कथेला गति आहे;
ती वाढत राहील.

—ग. दि. माडगूळकर



### मानव कल्याणासाठीं विज्ञानाची उपासना करणारा....

# थॉमस अल्वा एडिसन

भारतांत आपण आज यंत्रयुगाचें स्वप्न पाहत आहोंत. अमेरिकेंत ज्याने हें स्वप्न साकार केलें त्या संशोधकाच्या तपश्चर्येची व कार्यपद्धतीची ही ओळख त्याच्या ११४ व्या जन्मदिनानिमित्त येथे सादर केलेली आहे.

**राम नी. अभ्यंकर**

### ११०० शोधांचीं पेटंटस्

एडिसनने लावलेल्या असंख्य शोधांपैकी अगदी ठळक असे शोध घेतले तरी त्यांची संख्या कांही शेकड्यांनी मोजावी लागेल. त्याने सुमारे ११०० शोधांची पेटंटस् घेतलीं होतीं ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे ह्या अपूर्व संशोधकाची अखंडपणें कार्य करण्याची ताकद सहज ध्यानांत येईल. अविश्रांत श्रम, सततोद्योग हा एडिसनचा एक स्वभावविशेषच बनून गेला होता. फोनोग्राफ, विजेचे दिवे, मूक व बोलके चित्रपट, कार्बन टेनिफोन, ट्रॅन्समिटर, विजेवर चालणारी रेल्वे इत्यादी शोधांमुळे त्याचें नांव सर्वतोमुखीं झालें असल्यास नवल नाही. केवळ वर सांगितलेल्या शोधांमुळे त्याची गणना जगांतील प्रथम श्रेणीच्या संशोधकांत सहजच होऊं शकेल, पण मिळालेल्या यशाने हुरळून न जातां आपलें हें मानवतावादी संशोधन चालूच ठेवावयाचें असा एडिसनचा बाणा असल्याने जगांतील पहिला ध्वनिक्षेपक (लाऊडस्पीकर) डुप्लिकेटिंग मशिन, मेगॅफोन, चुंबकीय तत्त्वावर आधारलेले विजेचे ब्रेक्स, बॅटरी इत्यादि दैनंदिन जीवनांत हरघडी उपयोगी पडणारे शोध त्याने लावले. परंतु ह्या सर्वांपेक्षाहि महत्त्वाची अशी जर कोणती गोष्ट एडिसनने केली असेल तर ती ही की, आपल्या ह्या संशोधनाचें सातत्य कायम राहावें म्हणून त्याने स्थापन केलेली संशोधनशाळा. ह्या अद्यावत संशोधन शाळेमुळे अनेक गरजू संशोधकांना नवीन कार्यक्षेत्र उपलब्ध होऊं शकलें व त्यांच्य अमूर्त कल्पनांना मूर्त स्वरूप प्राप्त करून देणें शक्य झालें.

एडिसनने आपल्या संशोधनांत एक विशिष्ट पद्धत अवलंबिली होती. आपलें ध्येय कोणतें तें निश्चित केल्याशिवाय तो कोणत्याच संशोधनास सुरुवात करीत नसे, बुद्धिवान माणसानें प्रेरणा या स्फूर्तीची वाट पाहत कार्य लांबणीवर टाकण्याचे तो विरुद्ध होता. " बुद्धिमत्ता किंवा कल्पकता म्हणजे काय ? तर ९८ टक्के कष्ट व केवळ २ टक्के स्फूर्ति" असें तो वारंवार बोलून दाखवत असे. अपयश आल्यास निरुत्साहाने खचून न जातां तो दुप्पट उत्साहाने कामाला लागत असे.

एडिसन केवळ एकोणीस वर्षांचा झाला तेव्हा त्याने एक नवा शोध लावला. अमेरिकेच्या लोकसभेंत (कॉंग्रेस) मतें नोंदविण्यासाठी त्याने एक यंत्र तयार केलें, परंतु अधिकारीवर्गाने त्याकडे विशेष लक्ष दिलें नाही. एका सभासदाने एडिसनला ह्या बाबतींत सांगितलें,' तरुण माणसा ! तूं ही गोष्ट विसरलास की, प्रत्येक सभासदाला आपण कोणत्या बाजूने मत दिलें त्याची बिनचूक नोंद होणें आवडणार नाही !' ह्या सल्ल्यामुळे एडिसन आयुष्यांतील एक चांगला धडा शिकला. तो हा की, उगीच वाटेल त्या शोधाच्या पाठीमागे लागण्यापेक्षा आज कोणत्या शोधाला आर्थिकदृष्ट्या

मागणी आहे हें आधी ठरवावयास पाहिजे. अशा तऱ्हेने एकदा कार्य-पद्धति व ध्येय निश्चित केल्यावर एडिसन पद्धतशीरपणें शेकडो प्रयोग हातीं घेऊं शकला.


११ फेब्रुवारी १८४७ मध्ये ओहिओ संस्थानांतील मिलान ह्या गांवीं एडिसनचा जन्म झाला. त्याचे वडलांचा धान्य व लाकडांचा व्यापार होता. खाऊनपिऊन सुखी अशा कुटुंबांत जन्म झाल्याने त्याचें बालपण आनंदांत गेलें. तो जेमतेम तीन महिने शाळेंत गेला असेल; नंतर त्याचे आईने घरींच स्वतः त्याला शिकवावयाला सुरुवात केली. पहिल्याने एडिसनला गणित विषय कठिण वाटत असे, पण रसायन शास्त्राबद्दल त्याला जास्त गोडी वाटूं लागली. आपले घरांत त्याने एक छोटीशी प्रयोगशाळा काढली. स्वावलंबानाने जीवन जगायचें अशी त्याची मानीषा असल्याने फावल्या वेळांत आगगाडींतून वृत्त-पत्रें व मिठाई विकून तो पैसे मिळवीत असे. ह्या पैशाचा विनियोग तो पुस्तकें विकत घेण्यासाठी किंवा आपली प्रयोगशाळा वाढविण्या-कडे करीत असे.

कांही दिवस त्याने 'टेलिग्राफ ऑपरेटर' म्हणूनहि काम केलें. त्या वेळेस त्याने तेथील यंत्रामध्ये बऱ्याच लहानसहान सुधारणा करून दाखविल्या. सुधारलेल्या प्रकारचा एक टाइपरायटरहि त्याने स्वतः तयार केला.

### प्रत्येक संधि 'राबवण्याची' वृत्ति

आलेली संधि कधीहि वाया जाऊं द्यावयाची नाही अशा धोरणाने एडिसन नेहमी वागत असे, एकदा तो आगगाडींत वर्तमानपत्रें विकत असतांना एक श्रीमंत गृहस्थ डब्यांत येऊन बसला. त्या गृहस्थाला स्वस्थपणें आराम करावयाचा असल्याने एडिसनच्या ओरडण्यामुळे त्याची झोपमोड होऊं लागली. शेवटीं त्या गृहस्थाने एडिसनला त्याचे जवळचीं सर्व वर्तमानपत्रें बाहेर फेकून द्यावयास सांगितलें व त्याबद्दल भरपूर मोबदलाहि देऊं केला. 'बरें सावज हातीं सापडलें' असा विचार करून एडिसनने दुसऱ्या डब्यांत ठेवलेला जुन्या मासि-कांचा व वृत्तपत्तांचा भला मोठा गठ्ठा नेला; तेव्हढा सगळा गठ्ठाहि त्या गृहस्थाने बाहेर फेकून दिला. एडिसनजवळील सर्व वृत्तपत्रें संपे-पर्यन्त हा प्रकार चालूच होता शेवटीं तो गृहस्थ कंटाळून म्हणाला, '.संपली का तुझ्याजवळची रद्दी ?' 'होय साहेब, आता माझ्याजवळ फक्त एक बॅग शिल्लक आहे?' एडिसन अदबीने म्हणाला. "मग ती पण बाहेर फेकून दे." श्रीमंत गृहस्थ गरजले. अशा तऱ्हेने एडिसनने ह्या क्षुल्लक प्रसंगापासून अक्कलहुशारीने बरेच पैसे विनासायास मिळविले. विद्युत्शक्तिसंबंधाने त्याचें जें संशोधन चालू होतें त्यासाठी आवश्यक ती सामुग्री विकत घेणें त्यामुळे त्याला शक्य झालें. थोड्याच दिवसांत त्याने स्वतःची संशोधनशाळा सुरू केली. त्याचे हाताखाली ५० लोक काम करत असत. ह्या छोटयाशा शाळे-चेंच पुढे एका जगप्रसिद्ध संशोधनशाळेंत रूपान्तर झालें.

सन १८७७ मध्ये विजेच्या दिव्यासंबंधीच्या संशोधनास त्याने सुरुवात केली. निर्वात पोकळीमध्ये प्रखर उष्णतेवर दीर्घकाल जळूं शकेल अशी 'फिलामेन्ट' तयार करण्यासाठी त्याने हजारो प्रयोग करून पाहिले. संशोधनास वेळ कमी मिळेल म्हणून तो रात्रीं



थॉमस अल्वा एडिसन

झोपसुद्धा पुरेशी घेत नसे. 'फिलामेन्ट' तयार करण्यासाठी लागणारी सामुग्री जमविण्यासाठी त्याला फार प्रयास पडले. जगांतील सर्व देशांतून आपल्याला पाहिजे अशी धातू मिळेल किंवा काय याचा त्याने शोध चालविला. अशा तऱ्हेने दोन वर्षे अविश्रांत मेहनत केल्यावर त्याने कापसाच्या धाग्याचें एक 'फिलॅमेन्ट' तयार केलें, परंतु आता कळ दाबून विजेचा दिवा सुरू होणार इतक्यांत वाऱ्याचे झुळकेमुळे तें ठिसूळ 'फिलॅमेन्ट' तुटून गेलें. इतक्या दिवसांच्या श्रमावर पाणी पडलें. शेवटीं २१ आक्टोबर १८८९ ह्या दिवशीं एडिसनचे तपश्चर्येस यश येऊन कापसाचे धाग्याचा 'फिलॅमेन्ट' असलेला दिवा त्याने यशस्वी करून दाखविला. हा दिवा सतत ४० तास जळत होता व हा चमत्कार पाहण्यास हजारो लोक येऊन गेले. आणखी कांही दिवसांनी एडिसनने बांबूपासून एक 'फिलॅमेन्ट' तयार केलें. विजेचे बल्ब मोठ्या प्रमाणावर तयार करण्यासाठी त्याने स्वतःचा कारखाना सुरू केला. त्यांत १५० कामगार कामावर होते. आज अमेरिकेंत विजेचे दिवे करणारे तीन प्रमुख कारखाने असून त्यांत ३०,००० कामगार नोकरीला आहेत.

विजेच्या दिव्यासंबंधीचें संशोधन चालू असतांनाच 'एडिसन इफेक्ट'या क्रांतिकारक तत्त्वाचा त्याने शोध लावला. निर्वात पोकळीमध्ये 'फिलॅमेंट' व बाह्य आवरण ह्यामध्यें प्रवाह एकाच दिशेने वाहतो हें तें तत्त्व होय. सुमारे दोन तपांपर्यंत ह्या तत्त्वा-बद्दल कोणालाहि आस्था वाटली नाही, परंतु त्यानंतर ह्या तत्त्वावर

(पृष्ठ २२ पहा)

# सहकारी शेती अनिवार्य कां ?

( लेखांक पहिला )

सहकारी शेती म्हणजे मालकीहक्काचें संपूर्ण विसर्जन असा समज करून विरोधक सहकारी शेतीला विरोध करीत असतात. सहकारी शेतीसंबंधीचें ' वास्तव ज्ञान ' बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी समर्थकांकडून पद्धतशीर प्रयत्न होत नाहीत. एकांगी विरोध व दुबळा प्रचार, अशा स्थितींत शेतीव्यवस्थेच्या पुनर्रचनेचा आपला कार्यक्रम केवळ कागदावरच अडकून राहिला तर त्यांत नवल कसलें ? सहकारी शेतीसंबंधीचा एक निकोप दृष्टिकोन श्री. पाटील यांनी या लेखांत मांडलेला आहे. १९६१ मधील पुणें विद्यापीठाच्या निबंधस्पर्धेत शंभर रुपयांचें पहिलें पारितोषिक या लेखाला देण्यांत आलें आहे.



विलास पाटील

## सहकारी शेती येण्यापूर्वी...

आपला देश कृषिप्रधान आहे पण आपल्या शेतीचें मागासलेपणहि सर्वज्ञात आहे. आपल्या देशांतील ७० टक्के लोक वा ६ कोटी कुटुंबें या व्यवसायांत गुंतलीं आहेत. त्यामुळे शेतीवर फार मोठया लोकसंख्येचा भार आहे मागासलेपणाचें हें एक प्रमुख कारण आहे. पण आणखीहि अनेक आहेत. शेतीची अति लहान लहान तुकडयांत झालेली विभागणी, आधुनिक यंत्र, तंत्र व मंत्र यांचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांची आर्थिक असमर्थता, बीं–बियाणें, खतें यांचा पुरवठा, मालावरील पक्केपणाची प्रक्रिया, त्याची किफायतशीर विक्री, गुदामाची व्यवस्था इत्यादि अनेक गोष्टींचा अभाव हीं तीं कारणें होत. या सर्व कारणांच्या उच्चाटनासाठी कॉंग्रेसने सेवासहकारी सोसायटयांची वाढ करण्याचें ठरविलें आहे, पण माझ्या मतें ह्या सोसायटयांनी खालील दिशेनेंहि काम करावयास हरकत नाही. शेतीची दैनंदिन देखरेख व कसवणुकीची जबाबदारी ही खाजगी कुटुंबावर सोपवून नवीन सुधारणा करण्यासाठी प्रायोगिक शेती, नव्या अवजारांचें उत्पादन व पुरवठा, मातीचा कस हुडकण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेलें जमिनीचें परीक्षण, बंडिंगची कामें इत्यादि गोष्टीहि सोसायटयांमार्फत मोठया प्रमाणावर करावयास पाहिजेत. ह्या सोसायटया लवकर स्थापन झाल्या पाहिजेत व अशा संस्थांची आज ६ लाख खेडयांतून आवश्यकता आहे. ह्या संस्थांचें जाळें देशभर पसरून कार्यक्षमतेने काम केल्यास सहकारी शेतीच्या पुढील विकासाची भूमि तयार होईल.

## उत्पादक यंत्रणेंत बदल हवा

पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, सेवा सहकारी सोसायटयांनी कितीहि कार्यक्षम काम केलें, तरी कसवणुकीचें क्षेत्र जिथें मुळांतच लहान आहे, तेथे अशा संस्थांचा पूर्ण फायदा घेणें शेवटीं अशक्य होतें. उत्पादनवाढ ही शेवटीं अधिक कार्यक्षम उत्पादक-यंत्रणा स्वीकारण्यानेच होते. आधुनिक यंत्रें आणि अवजारें, शास्त्रीय पद्धतीने बनविलेलीं खतें, मशागतीची शास्त्रशुद्ध पद्धत यांसारख्या आधुनिक सुधारणांचा फायदा घ्यावयाचा व उत्पादन वाढवावयाचें म्हटलें तर कसवणुकीचें छोटें क्षेत्र आड येतें.

## भूमिव्यवस्थेचें भेसूर चित्र

आपल्या देशांतील कसवणुकीचें परिमाण किती लहान आहे व अशा तुकडयाची मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या किती मोठी आहे हें खालील आकडयांवरून आपणांस दिसून येतें प्रत्येक राज्यांत जवळ जवळ १७.७२ टक्के शेतें ५ एकरांपेक्षा कमी क्षेत्रफळाचीं, १३.१४ टक्के शेतें ५ ते १० एकरांची व १०.२९ टक्के शेतें १०ते१५ एकर क्षेत्रफळाचीं आहेत. उत्तर प्रदेशांत ५६ टक्के शेतें २ एकराखालचीं, २५ टक्के शेतें २ ते ५ एकराखालचीं आहेत. केरळ राज्यांत ५६ टक्के शेतें १ वा कमी एकर क्षेत्रफळाचीं, २१ टक्के शेतें, १ ते २॥ एकर क्षेत्रफळाचीं व ११.३ टक्के शेतें २॥ ते ५ एकर क्षेत्रफळाचीं आहेत. जमिनीच्या अति लहान तुकडयांवर जगणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मात्र फार मोठी आहे. बंगाल, बिहार व उत्तर प्रदेश सोडून उरलेल्या १० राज्यांत १५ एकरांपेक्षा कमी क्षेत्रफळाची शेती करणाऱ्या खातेदारांची संख्या ७४.५६ टक्के आहे, पण त्यांच्याकडील जमीन मात्र ३५.३५ टक्के आहे. याउलट ज्यांच्याकडे ३० ३० एकरांपेक्षा जास्त जमीन आहे अशा खातेदारांची संख्या १०.७२ टक्के आहे, पण त्यांच्याकडील जमीन मात्र ४१.४७ टक्के आहे. वरील आकडेवारीवरून विषमतेचें चित्र किती भेसूर आहे हें दिसून येईल.

भारतांतील शेती किती छोटया तुकडयांत विभागली आहे, हें लक्षांत घेतलें की, तिच्या एकत्रीकरणाच्या गरजेचें महत्व पटतें.

या गरजेंतूनच सहकारी शेतीच्या कल्पनेचा उगम झालेला आहे. शेतीसाठी जशी कमाल धारणा ठरवावी लागते तशी किमान धारणाहि ठरवावी लागते हें विसरून चालणार नाही. किंबहुना, कमाल धारणेचा विचार समानतेच्या प्रेरणेंतून जन्मला असला तर किमान धारणेचा विचार उत्पादनवाढीच्या गरजेंतून प्रसृत झाला आहे, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

## एकाच पद्धतीची व्यवस्था नको

दर-एकरीं दरडोई उत्पादनवाढ करण्यासाठी छोटया छोटया अनेक तुकडयांचें एकत्रीकरण करण्यासाठी सहकाराच्या व्यतिरिक्त दुसरा मार्ग प्रभावी नाही. शेतकऱ्याला त्याच्या जमिनीबद्दल आत्मीयता वाटते ही गोष्ट खरीच व त्यासाठी तो आपल्या जमिनीवरचा हक्क सोडावयाला तयार होणार नाही हेंहि खरें, पण प्रश्न असा आहे कीं, **शेतकऱ्यांना जमीन गमवावयाला सांगतो आहे कोण? सहकारी व सामुदायिक सक्तीची शेती यांत कांहींच फरक नाहीं असा चुकीचा समज करून विरोधक सहकारी शेतीस विरोध करीत आहेत. सहकारी सोसायटया** प्रामुख्याने चार प्रकारच्या असतात व फक्त त्यांतील चौथ्या प्रकारांत स्वामित्वाचा लोप होतो आणि मजुरीव्यतिरिक्त कांही मि त नाही, पण उरलेल्या तीन प्रकारांत मजुरीव्यतिरिक्त खंड व निव्वळ नफ्यांतील प्रमाणशीर हिस्साहि शेतकऱ्यास मिळतो. दुसरें असें की, भारतांत शेतीची पद्धति प्रांतोप्रांतीं वेगळी आहे. इतकेंच नव्हे तर प्रत्येक प्रांतांत जिल्हानिहाय भेद आढळतात. अशा परिस्थितींत देशभर एकाच प्रकारची शेतीपद्धति लादून चालणार नाही. जेथे तेथे सोईस्कर असा प्रकार निवडला की, विरोधास कारण उरत नाही.

## सहकारी शेतीचे चार प्रकार

सहकारी शेती सोसायटयांचे प्रामुख्याने चार प्रकार आहेत.

(१) सोसायटीची सामुदायिक अशी कांहीहि मालमत्ता नसते. शेतीचीं कांही कामें सहकाराने करण्याइतपतच सहकाराचें तत्त्व असतें. मालकी खाजगी स्वरूपाची असते, केलेल्या कामाबद्दल मजुरी, अवजारें व जनावरें पुरविल्याबद्दल योग्य तो मोबदला देण्यांत येतो.

(२) हृया शेतीमधले मालकीनिदर्शक बांध काढून जमिनीची सतत कसवणूक केलेली असते. जमिनीची खाजगी मालकी मान्य केलेली असते व त्याबद्दल खंड दिला जातो. जनावरें व अवजारें पुरविण्याबद्दल मोबदलाहि दिला जातो.

(३) या प्रकारांत सर्व जमीन, जनावरें व अवजारें सोसायटयांच्या सामाजिक मालमत्तेंत जमा केलेलीं असतात. उत्पादन सोसायटीच्या मालकीचें असतें. वैयक्तिक उत्पन्न प्रामुख्याने मजुरीच्या स्वरूपांत दिलें जातें, पण मालकीहक्कांचे दस्तऐवज रक्षण करून ठेवले जात असल्याने खंडरूपानेहि शेतकऱ्यास उत्पन्न मिळतें. अवजारें व जनावरें सोसायटीस पुरविल्याबद्दल शेतकरी सभासदांना भरपाईहि मिळते

(४) या प्रकारांत मात्र सामाजिक मालकीचें तत्त्व पूर्णत्वास नेण्यांत येतें. सभासदांस केवळ कामाबद्दल मजुरी मिळते. खंड, नफ्यांत हिस्सा, जनावरें व अवजारें पुरविल्याबद्दल भाडें वगैरे कांहीहि मिळत नाही.

या सर्व प्रकारांस संक्षेपांत दुसऱ्याहि नामोल्लेखाने सांगतां येतें— (१) सहकारी सुधार शेती (२) सहकारी कूळ शेती (३) संयुक्त सहकारी शेती व (४) सामुदायिक सहकारी शेती.

यावरून आपणांस कल्पना येते की, पहिल्या प्रकारांत जमीन सलग न करतां कांही शेतीविषयक कामापुरता सहकार मर्यादित असतो. पुढल्या प्रकारांत सहकाराचें तत्त्व वाढत जातें आणि शेवटच्या प्रकारांत खाजगी मालकी तत्त्वाचा लोप होतो व शेतकरी सोसायटीचा नोकर बनतो. अशा परिस्थितींत पहिल्या तीन प्रकारांपैकी कोणताहि एक प्रकार परिस्थितीनुरूप निवडून सहकारी शेतींत स्वेच्छेने सामील होण्यास सांगितलें तर बहुधा विरोध होणार नाही असें वाटतें.

( पुढील अंकीं चालू )

---


(पृष्ठ २० वरून)

आधारलेली 'विजेची नळी' (electric tube) तयार करण्यांत आली. रेडिओ, टेलिफोन, 'क्ष' किरण, विजेवर चालणारी संगीतांतील वाद्यें इत्यादि वस्तू हृया तत्त्वावरच आधारलेल्या आहेत. १८८९ मध्ये एडिसनने चित्रपट घेण्याचा कॅमेरा व प्रोजेक्टर तयार केला व त्यामुळेंच हल्लीची अवाढव्य चित्रपटसृष्टि अस्तित्वांत येऊं शकली.

एडिसनने ही मानवजातीची जी सेवा केली त्याचा गौरव करण्यासाठी अमेरिकेच्या कॉंग्रेसने एक सुवर्णपदक देऊन त्याचा सत्कार केला. 'नॅशनल अॅकेडमी ऑफ सायन्सेस' हृया संस्थेने त्याला आपले सन्मान्य सभासद करून घेतलें हृया शिवाय अनेक विद्यापीठांनी त्याला 'डॉक्टरेट' पदव्या बहाल केल्या. फ्रान्समध्येहि त्याचा सत्कार करण्यांत येऊन 'फ्रेंच लिजन ऑफ ऑनर' चा 'कमांडन्ट' हा किताब त्याला देण्यांत आला. इंग्लंडमधील 'सोसायटी ऑफ आर्टस्' हृया संस्थेने त्याला 'आल्बर्ट मेडल' देऊं केलें. जर्मनीमध्ये १९१४ सालीच 'रॅथनु मेडल' देऊन त्याच्या कार्याचा गौरव करण्यांत आला.

## औद्योगिक वटवृक्षाचा पसारा

असा हा थोर संशोधक १८ ऑक्टोबर १९३१ रोजी निधन पावला. मृत्युसमयीं सुमारे ११०० शोधांचीं 'पेटन्टस्' त्याचे जवळ होतीं. एडिसनने लावलेल्या मूलगामी शोधांमुळे अक्षरशः अब्जावधि रुपये भांडवलाचे कारखाने आज चालू आहेत. हृया उद्योग धंद्यांतून ४० लाख माणसांना रोजगार उपलब्ध झाला आहे. अशा तऱ्हेने हल्लीचें यांत्रिक युगाचें स्वप्न प्रत्यक्षांत आणण्याचे कामांत टॉमस अल्वा एडिसनने फार मोठा वांटा उचलला आहे हृया विषयीं दुमत होणें शक्य नाही.



(लेखांक दुसरा)

# एंजिनघर कसें असावें ?

जयाजी आबाजी वाघ


मेहुणबारा

शेतकऱ्याच्या अनेक साधनांपैकी ऑईल अँजिन हें महत्त्वाचें साधन आहे. नांगर, कुळव, मोट इत्यादि साधनांचा आपण वंशपरंपरागत वापर करीत आलेलों आहोंत. या साधनांचा वापर कसा करावा, त्यांची निगा कशी राखावी ही माहिती आपणांस असतेच. त्याचप्रमाणे हीं साधनें नादुरुस्त झाल्यास अगर मोडल्यास गांवांतल्या कारागिरांकडून म्हणजे लोहार, सुतार, चांभार ह्यांच्याकडून तीं दुरुस्त करून घेतां येतात, परंतु अँजिनच्या दुरुस्तीचें काम खेड्यांत होत नाही. अँजिन दुरुस्त करून घेण्यासाठी तें वर्कशॉप असलेल्या शहरांतून घेऊन जावें लागतें. खेड्यांतून शहरांत अँजिन दुरुस्तीसाठी नेणें म्हणजे मोठें जिकिरीचें काम आहे. अँजिन खोलून गाडींत चढवावयाचें, नेतांना त्याचे बारीक सारीक भाग काळजीपूर्वक संभाळून न्यायचे हें तर फार मोठें जबाबदारीचें काम. त्याचप्रमाणे दुरुस्तीनंतर परत आणतांनाहि हीच काळजी घ्यावी लागते. याशिवाय म्युनिसिपल टोलटॅक्स ५०–७५ रुपये आहेच. इतकेंहि करून वर्कशॉपमधून अँजिन वेळेवर व लवकर सुधारून मिळेलच असा भरवसा नाही. शेतीच्या इतर साधनांपेक्षा अँजिन हें कितीतरी पटीनें अधिक मूल्यवान आहे, म्हणून अशा साधनाची काटेकोरपणें स्वच्छता राखणें अत्यंत अवश्यक आहे, त्यामुळे आपले श्रम, पैसा व वेळ यांची बचत होते.

## अँजिनघर कसें असावें

मानवाचें आरोग्य मुख्यत: भरपूर, मोकळी आणि स्वच्छ हवा यावरच अधिक अवलंबून असतें. आपणास निर्जीव वाटणाऱ्या अँजिनचेंहि आरोग्य (भवितव्य) याच मूलभूत गोष्टींवर अवलंबून आहे. अँजिन व्यवस्थित चालण्यासाठी मोकळ्या, स्वच्छ हवेचा भरपूर पुरवठा होणें ही अँजिनच्या दृष्टीनें अत्यंत गरजेची बाब आहे. त्याचप्रमाणे अँजिनची किरकोळ दुरुस्ती, तेलपाणी अगर फिटिंग करतांना त्यांतला बारीकसारीक भाग व्यवस्थित दिसावा म्हणून अँजिनघरांत भरपूर प्रकाश असणें जरूर आहे. अँजिनघरांत भरपूर प्रकाश व भरपूर हवा खेळावी म्हणून अँजिनघराला खिडक्या पाहिजेतच. अँजिनघराचें दार हें अरुंद व कमी उंचीचें असणें हें आपणास नेहमी घातक असतें. कारण आपण नेहमी घाईगर्दींतच अँजिनघरांत जा-ये करतों. बुटक्या व अरुंद दारामुळे आपल्या डोक्याला अगर कपाळाला दुखापत होण्याचा संभव असतो. नवीन माणसाला तर तें हमखास लागतेंच, म्हणून दार सहा फूट उंच व अँजिनच्या मानानें रुंद असलें पाहिजे. अँजिनघराचा दरवाजा पट्ट्याकडील बाजूस असणें फारच धोक्याचें असतें. जुना झाल्यामुळे, जास्त तंग झाल्यामुळे अथवा अन्य कारणामुळे पट्टा तुटतो. चालू अँजिनचा पट्टा तुटून माणसाला लागणें फारच वाईट. पट्ट्याच्या बाजूला दार असलें तर अशा अपघाताची भीति असते. त्याचप्रमाणे दार अँजिनच्यासमोर व अगदी जवळ तर मुळीच असूं नये. कारण घाईघाईत आपण स्वत: अगर एखादें लहान मूल खेळतां खेळतांच आंत शिरल्याबरोबर अँजिनवरच आदळतें. नेमके याच वेळीं अँजिन चालू असेल तर काय प्रसंग ओढवेल याची कल्पनाच केलेली बरी ! तेलाची टाकी, हत्यारें ठेवण्यासाठी केलेलें कपाट अगर

खोकें किंवा इतर साहित्य पट्ट्याकडील बाजूस केव्हांहि ठेवूं नये. अंजिनघराचा सर्वसाधारण आराखडा (प्लॅन) खालील-प्रमाणे असल्यास बहुतेक सर्व नियमांचें पालन केल्यासारखें होईल.





## ऑंजिनघराची स्वच्छता


अंजिनघर जास्तींतजास्त स्वच्छ ठेवणें म्हणजे अंजिनचें आयुष्यच वाढविणें असें म्हणतां येईल. अंजिनघर न झाडल्याने साठणारी धूळ, बाहेरून वाऱ्याने येणारी धूळ यामुळे अंजिनचें होणारें नुकसान आपल्या लक्षांत येत नाही. धुळीनं अंजिनचें जेवढें नुकसान होतें तितकें कशानेहि होत नाही धूळ ही अंजिनला क्षयाच्या जंतूंप्रमाणे हळूहळू झिजवीत असते आणि शेवटीं अंजिनच्या नाशाला धूळच कारणीभूत होते. अंजिनवर धूलीकण बसतात. हे कण खरबरीत असतात. त्यामुळे अंजिनच्या भागांचें जास्त घर्षण होतें. अंजिन 'ओपन टाईप' असल्यास अंजिनच्या आंतल्या भागांतसुद्धा ही धूळ जाते. मेन बेरिंगला तेलाचा पुरवठा होण्यासाठी अंजिन-मधील ऑईलरिंगला जें छिद्र असतें तें धुळीमुळे बंद होण्याची शक्यता असते. छिद्र बंद झालें की, बेअरिंगला लुब्रिकेटींग तेल मिळत नाही व तेल न मिळाल्यामुळे बेअरिंग गरम होऊन वितळतें अन् अंजिनचें व आपलेंहि नुकसान होतें. त्याचप्रमाणे अंजिन चालू असतांना व्हाल्व्हची नेहमी उघडझाप चालू असते त्या वेळीं हे धूलिकण हेडमध्ये जाण्याचा व व्हाल्व्हसीटवर बसण्याचा संभव असतो. व्हाल्व्हसीटवर धूलिकण बसले तर व्हाल्व्ह नीट काम देत नाही.


# शा. गोवर्धनदास मोहनदास

## जुना कापड बाजार, अहमदनगर




आमचेकडे ऑईल व डिझेल आडवी–उभी रुपा, जवाहर, विजय, डीलक्स, भारत स्वस्तिक, गुजरात इत्यादि एंजिनें हजर स्टॉकमध्ये मिळतील.



D. P. F. पंप, डनलॉप पट्टे व व्हीबेल्टस्, होजपाईप, डीपवेल पंप प्लंजर व मशीनला लागणारे सर्व प्रकारचे स्पेअर पार्ट्स त्याचप्रमाणे पेन्ट्स वगैरे इमारतीस लागणारे हार्डवेअर सामानहि हजर स्टॉकमध्ये मिळेल.

पुष्कळ ठिकाणीं अेंजिनघर खूपच ऐसपैस असतें. त्याच घरांत शेतीचा माल, शेतीचीं अवजारें ठेवलेलीं असतात. इतरहि अडगळ ठेवण्यास अेंजिनघराचा उपयोग केला जातो. त्यामुळें अेंजिनघरांत नेहमीच घाण राहाते. शिवाय इतर लोकांचा अेंजिनघराशीं जास्त संबंध येतो, येणें–जाणें वाढतें. त्यामुळें देखील अेंजिनघर घाण होण्यास मदत होते. यासाठी अेंजिनघर अत्यंत आटोपशीर असावें. इतर सामान–अडगळ ठेवण्यासाठी अेंजिनघराचा उययोग करूं नये. तेथें फक्त हत्यारांचें कपाट व तेलाची टाकी एवढेंच सामान असावें. खालील तळाला फरशी असली तर उत्तमच. फरशी नसल्यास तळ चांगला मजबूत असावा. आठवड्यांतून २–३ वेळां शेणाने सारवून घ्यावा. याच पद्धतीने भिंतींचीहि काळजी घ्यावी. भिंती गिलावा असलेल्या सारवलेल्या असाव्यात. कांही ठिकाणीं अेंजिनघरांतच 'अेक्झॉस्ट पाईप' असतो. त्यामुळे सर्व धूर (एक्झॉस्ट) अेंजिनघरांत होतो. सर्व घरच धुरकट वातावरणाने भरलेलें रहातें. अेंजिन काळें होतें, भिंती काळ्या होतात. अेंजिनघरांतली हवा अशुद्ध होते. त्यामुळें स्वच्छतेच्या मुख्य तत्त्वालाच काळोखी फासल्यासारखें होतें. शिवाय आपण स्वत: जेव्हां अेंजिनघरांत जातों तेव्हा हा धूर श्वासोच्छ्वासाबरोबर आपल्या शरीरांतहि जातोच. त्यामुळे आपलेंहि आरोग्य बिघडण्याचा संभव असतो. पाईप घरांतच असल्याने गडबडींत आपला हात अगर पाय पाईपला लागून भाजतो. यासाठी प्रत्येकाने 'एक्झास्ट पाईप' घराच्या बाहेरच ठेवावा.

ज्याप्रमाणे अेंजिनघर आंतून स्वच्छ ठेवणें महत्त्वाचें आहे त्याचप्रमाणें घराबाहेरची आजूबाजूची जागादेखील स्वच्छ ठेवणें तितकेंच जरुरीचें आहे. त्यामुळे आजूबाजूची धूळ, केरकचरा उडून घरांत येत नाही. घराच्या भोवती बाग असल्यास फारच उत्तम. त्यामुळे धूळ राहत नाही व स्वच्छ हवेचा पुरवठाहि होतोच.

**पुढील अंकीं**

अेंजिन बसविणें (फौंडेशन) हा शेतकऱ्याच्या दृष्टीने खर्चाचा प्रश्न आहे. शहरगांवांतून यासाठी खास माणूस (मेकॅनिक) आणावा लागतो, परंतु शेतकऱ्याने स्वत: या विषयांत लक्ष घातलें तर गांवांतील गवंड्यांकडून अगदी कमी खर्चांत तो फौंडेशन तयार करून घेऊं शकतो. पुढील अंकांत फौंडेशनची संपूर्ण आराखडा देण्यांत येईल.

शेतकरीबंधूंनी आपला अंक राखून ठेवण्याची आजच काळजी घ्यावी.

APHALI

# आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. अहमदनगर

( संस्थापक : स्व. वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे )

शास्त्रशुद्ध पद्धतीने औषधें बनविणारा

## भारतांतील प्रगतशील कारखाना

★ नेहमी 'आफालि.' चींच गुणकारी औषधें वापरा ★

# प्रेमा तुझा रंग कसा

सर्व सामान्य प्रेक्षक लेखक आणि दिग्दर्शक यांनी एकत्र येऊन केलेली एक मनमोकळी चर्चा.

या अंकासाठी निवडलेले प्रा' वसंत कानेटकर यांचें "प्रेमा तुझा रंग कसा" हें नाटक महाराष्ट्र नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी तीन संस्थांनी निवडलें होतें. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं त्याचे प्रयोग चालू आहेतच. अंतीम स्पर्धेत नाट्यलेखनाचें पहिलें पारितोषिक याच नाटकाला मिळालें आहे. उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून श्री. भालबा केळकर यांना दुसरें पारितोषिक मिळालें. यावरून या नाटकाची लोकप्रियता ध्यानांत येते.

या नाटकांत बल्लाळ या मानसशास्त्राच्या प्राध्यापकाच्या घरांतील वातावरण, तसेंच त्याच्या बब्बड या मुलीचें बाजीराव या फोळसेवाल्यावरील प्रेम, बच्चू या मुलाचीं नवींनवीं प्रेमप्रकरणें इ. गोष्टी दाखविल्या आहेत. या साऱ्या गोष्टी तुमच्याआमच्या घरांत घडणाऱ्या अगदी स्वाभाविक आहेत असेंहि लेखकानें प्रस्तावनेंत म्हटलें आहे आणि अशा गोष्टी खरोखरच आमच्या घरांत घडतात का याचा विचार केला तर नाटकादद्दल पुढील आक्षेप मनापुढे येतात.

(१) नाटकांत दाखविलेली मुलगा, बाप, मुलगी हीं नातीं आमच्या समाजांत इतकीं मनमोकळीं आढळतात का? ही परदेशी नाट्याची नक्कल वाटते. (२) या नाटकांतून प्रेमाचे नवे रंग दाखविण्याचा लेखकाचा मानस आहे असें वाटतें. पण हीं अशीं प्रेमप्रकरणें आजवर अनेक वेळां वाङ्मयांतून मांडलेलीं दिसतात. (३) नाटकांत सुशिल बच्चूवर एक मानसिक ट्रीटमेंट करते असा उल्लेख आहे, पण ती काय प्रकारची आहे तें अस्पष्ट आहे. ही गोष्ट ट्रीटमेंट या प्रकारची टिंगल आहे का? (४) बब्बड ही मूर्ख अव्यहारी वाटते. बाजाची कांहींहि माहिती नसतांना त्याला ती ट्रंकभर पत्रें कशी लिहील? कॉलेजांत शिकणारी मुलगी इतकी अजागळ कशी? लग्नानंतरच्या आयुष्यांत बब्बड एक जुन्या चालीची गृहिणी वाटते. तिचा पहिल्या अंकांतील अचरटपणा त्यामुळे विसंगत वाटतो. (५) प्रेमांत दरवेळीं आपटी खाऊन पुन्हा दुसऱ्या मिनिटाला प्रेम सुरू करणारे बच्चू व्यवहारांत किती आहेत? (६) नाटकांत हंशे निर्माण व्हावेत यासाठी प्रा. बल्लाळ आणि प्रियंवदाबाई यांना त्यांच्या स्थानापासून भ्रष्ट केलें आहे. व्याह्यासमोर नाक घासणारे पतिपत्नी व्यवहारांत किती आहेत? (७) पहिल्या अंकांत बब्बडच्या लग्नाला जबर विरोध असतांना तिच्या लग्नाचें सबळ कारण पुढील अंकांतून दिलेलें नाही. (८) नाटकाच्या अखेरीच्या भरतवाक्यांतून लेखकाला जें कांहीं सांगावयाचें आहे तें तो पुन्हा एकदा सांगतो. याचाच अर्थ लेखकाला जें कांहीं सांगावयाचें आहे तें सांगितलें गेलें आहे किंवा काय याबाबत तो साशंक आहे. म्हणूनच त्याला अखेरीस पुन्हा एकद "थांबा अजून संपलें नाही" असें ओरडून तेंच ऐकवावें लागतें. (९) जगांतील प्रत्येक माणूस प्रेम करणारच असें या भरतवाक्यांतून वाटतें, म्हणजेच नाटक हें प्रेम करणाऱ्या विशिष्ट गटापुरतें मर्यादित राहातें. त्याचें स्वरूप सर्वकष होत नाही. (१०) प्रेमाचें चिरंतनत्व सांगणारे निळूभाऊ आणि बल्लाळ यांच्या तोंडचे भाषणवजा उतारे काढून घेतले तर इतर नाटकांतून तें सिद्ध होईल का?

या प्रश्नावरील नाटकाचे लेखक श्री. वसंत कानिटकर आणि दिग्दर्शक प्रा. भालबा केळकर यांचेकडून आलेली पत्रोत्तरें पुढे दिलीं आहेत.

**प्रिय संपादक,**

**सप्रेम नमस्कार वि. वि.**

तुमचें आरोपपत्र मिळालें. उत्तरें देण्यासाठी पिंजऱ्यांत उभें राहण्यापूर्वी एक खुलासा जरूर केला पाहिजे. कलाकृतीवरल्या आक्षेपांना (विशेषतः टीकाकारांच्या) उत्तरें देऊं नयेत, असा दंडक मीं फार पूर्वीपासून स्वतःला घालून दिला आहे. त्यांत कोणताहि 'शिष्टपणा' चा भाग नसून, ('प्रेमा तुझा रंग कसा?' या नाटकाच्या निवेदनांत 'देवांचे मनोराज्य' या नाटकाचा उल्लेख करीत असतांना मी म्हटल्याप्रमाणें—) केवळ... 'उत्तर-प्रत्युत्तरांनें वाद करण्याची हौस भागली तरी रसिकतेला आवाहन करतां येत नाही...' याच एका सत्याची जाणीव आहे. टीकाकारांच्यापेक्षा वाचक मला आवडतात. कारण ते अविद्वान् असले तरी रसिक असतात, सरळ मनाचे असतात आणि माझे स्नेही श्री. ग. दि. यांच्या भाषेंत सांगायचें तर ते 'मतें देतात आणि मारहि' देतात. वाचक प्रेक्षकांकडून मी पाठ थोपटूनहि घेतली आहे आणि रट्टेहि खाल्ले आहेत. या आपुलकीच्या संबंधामुळेच मी केवळ अपवाद म्हणून 'ईश्वरसाक्ष' खरीं उत्तरें देण्यासाठी पिंजऱ्यांत उभा राहत आहें.

बल्लाळ—बब्बड—बच्चू या पिता पुत्र-पुत्री संबंधांतील खेळकरपणांत तुम्हाला 'खोटेपणा' 'कृत्रिमपणा' आणि 'परदेशीयपणा' वाटतो, हा तुमचा आरोप 'खरेंच खरा' आहे का, तें तुम्हीं स्वतःच बारकाईने शोधावें. खानदानी पांढरपेशा घरांत बाप मुलांशीं कसे वागतात याचें एक चित्र मीं 'वेड्याचं घर उन्हांत' मधील दादासाहेबांच्या रूपानें वाचक-प्रेक्षकांसमोर ठेवलें नाही काय? बल्लाळ हा दुसऱ्या प्रकारचा बाप आहे. तो 'तसा' कां आहे तें ओघांतच नंतर मी सांगेन, पण असे बाप पुण्या—मुंबईकडे थोड्या उघड्या डोळ्यांनीं पाहिलें तर

तुम्हाला आता हवे तेवढे दिसूं शकतील. घटकेला माझ्या डोळ्यापुढे किती तरी बल्लाळांचीं चित्रें भराभरा सरकत आहेत. एखादें नांव घेतलें तर लागलीच त्या व्यक्तीवरूनच मीं 'बल्लाळ' उभा केला असा निष्कर्ष काढण्याचा वाचकांना मोह होईल. कल्पित व्यक्तिचित्र हें अनेक मुशींतून घडत असतें; तें कोणाचेंहि छायाचित्र नसतें–हा कलानिर्मितीतला सिद्धान्त माझे प्रिय वाचक आणि प्रेक्षक मनाशीं बाळगणार असतील, तर त्यांच्या खातरजमेसाठीं मी एकच उल्लेख करूं इच्छितों. खेळकर, समंजस, मुलाशीं मित्रभावनेने वागणारा बाप तुम्हाला पहावयाचा असेल तर पुण्यांतल्याच सुप्रसिद्ध लेखिका आणि समाजकार्यकर्त्या श्रीमती शकुंतलाबाई परांजपे यांच्या घरीं तुम्ही जा आणि त्यांना विचारा की "तुमचे अप्पा कसे आहेत ?" हें एक केवळ उदाहरण आहे, छायाचित्र नव्हे, हें कटाक्षाने लक्षांत घ्यावें आणि 'परदेशीयपणा'बद्दलच म्हणाल तर, 'पुत्र सोळा वर्षांचा झाला म्हणजे पित्याने त्याच्याशीं मित्रत्वाने वागावें' असा उपदेश करणारे आमचे स्मृतिकार भारतांतच घडले होते नव्हे काय ?

### प्रेमाचे विविध रंग

तीस-चाळीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतील मध्यमवर्गीयांत प्रेमविवाह रूढ होऊं लागले. ती पिढी आता वृद्ध झाली. त्यानंतरच्या पिढींतलीं चित्रें 'प्रेमा तुझा०' मधे मांडण्याचा प्रयत्न आहे. माणसें प्रेमांत कशीं पडतात, पहिल्या स्पर्शाने बेहोशी आल्यावर तीं कोणती भाषा वापरतात, कसें आचरण करतात, पुढे विवाहोत्तर कालांत त्यांच्या प्रणयाचे रंग कसे ओघळतात, मग कलहाच्या आणि स्वभावाचे कंगोरे घासण्याच्या पर्वाला कशी सुरुवात होते, कालान्तरानें प्रेमिकांतून पतिपत्नी आणि पतिपत्नींतून मातापिता निर्माण होत असतांना 'प्रेम' या शब्दाचे अर्थच कसे बदलतात— हें सर्वांच्याच अनुभवाचें म्हणून सनातन सत्य आहे. त्यांत 'नवीन' कांही नाही. ('नवें कांही असलेंच पाहिजे काय ?') पण ज्यांत 'नवें नाही' तिथे माणसें वृद्ध झालीं की, आपला भूतकाळ विसरतात; स्वतः आईबापांच्या इच्छेविरुद्ध प्रेमविवाह करणारे स्त्री-पुरुष आईबापांच्या भूमिकेवर उभे राहतात, तेव्हा जुन्याच आवेशाने नव्या पिढीला विरोध करूं लागतात. मग असला बाप मुलाला 'घरांतून हकलून देण्याची' भाषा बोलतो आणि असली आई मुलीला 'जीव देण्याची' धमकी देऊं लागते. असें 'खरेंच घडतें' तर तो शोकात्मिकेचा विषय होता, पण पुढें वर्ष-सहा महिन्याने पहावें तों उभयता आजोबा आजी लाडक्या नातवाचें वा नातीचें कौतुक करण्यांत इतके दंग दिसतात (त्याबरोबर जावयाचेंहि आणि सुनेचेंदेखील) की 'हींच का तीं माणसें ?' असा परिचितांना प्रश्न पडावा ? प्राध्यापकाच्या पेशांत असले अनेक प्रेमिक आणि त्यांचे आई-वडील जेव्हा मी उघड्या डोळ्याने पाहूं लागलों तेव्हा त्यांतील Comedy मला दिसूं लागली व या नाटकाचा जन्म झाला.

ही कॉमेडी केवळ आईवडिलांची नाही. तितकीच ती 'प्रेमांत पडणाऱ्या' तरुणतरुणींचीदेखील आहे. बब्बड-बाजा अव्यवहारी व मूर्ख आहेत हा तुमचा निष्कर्ष अचुक आहे. प्रेमांत पडणाऱ्या तरुण तरुणींच्या वयाला 'गढे पंचवीशी असें नांव' कां देतात हें मी तुम्हाला सांगायला हवें काय ? सौभद्रांतला 'घाली सारें तूप मिठांतच्नि दुधीं लिंबू पिळलें' असें वर्तन करणारा, पदोपदी रुक्मिणी, कृष्ण आणि नारद यांच्या चेष्टेचा विषय बनणारा अर्जुन कसा आहे ? अण्णांचा ब्रह्मचारी कसा आहे ? मित्रहो, सत्रा वर्षांची कन्या आणि विशींतले चिरंजीव 'पिसाट प्रेमांत' सापडतात तेव्हा ती मोठी 'सूज्ञ, परिपक्व आणि शहाणीं' असतात–असें का तुम्हाला वाटतें ? 'प्रेमांत पडणाऱ्यांना सगळें जगच मूर्ख वाटतें हा भाग सोडून द्या. कांही अपवादहि वगळा; आणि कॉलिजकुमार आणि कुमारींचें अंतरंग जरा डोळसपणें न्याहाळा, म्हणजे घरोघरीं नव्हे तरी दोन घराआड तरी हीच बब्बड आणि हाच बाजा राजरोसपणें वावरतांना तुम्हाला दिसून येईल. 'बाजीगावची कांहीहि माहिती नसतांना त्याच्यावर प्रेम करणारी, त्याला ट्रंकभर पत्रें लिहिणारी बब्बड या व्यवहारी जगांत...' तुम्हाला पाहायची आहे काय ? तर मग मित्रहो, कृष्णा हाथीसिंग यांचें With no Regrets हें पुस्तक उघडा आणि कृष्णाबाईंनी आपल्या प्रेमविवाहाची ही कहाणी सांगितली आहे ती वाचा. सूज्ञास अधिक लिहिणें नलगे !

पंचविशीतलें प्रेम हा प्रहसनाचा विषय आहे, तर परिपक्व दशेंतील प्रेम हा काव्याचा विषय आहे. म्हणूनच 'प्रेमा तुझा रंग कसा' हें नाटक प्रहसनाचें रूप धारण करून सुरू होतें आणि काव्यरूप धारण करून शेवटीं मावळतें. आरंभीची बब्बड आणि बाजा म्हणजेच परिणीतावस्थेंतील बल्लाळ आणि प्रियंवदा. याची जाण बल्लाळला

र. नं. ७१२२ ] जय सहकार [ स्थापना १३-४-१९३२

शेतकऱ्यांच्या मालाची कसोशीने विक्री करून देणें,
शेतोपयोगी माल, पेण्ड, रासायनिक खतें,
एंजिन्स व त्यांचे स्पेअर पार्टस् पुरविणें
इ. कार्यें करणारा .....

**गोदावरी प्रवरा कॅनॉल**

**★ सहकारी खरेदी–विक्री संघ लि. ★**

• कोपरगांव •

शाखा :– श्रीरामपूर * संगमनेर * राहुरी
डेपो :– पुणतांबा * कोल्हार * राहाता

★ उभारलेलें भांडवल ३,००,००० ★ वसूल भांडवल १,६१,५१५ ★ सरकारचें परत फेडीचें २५,००० ★ गंगाजळी २,६६,९५० ★ खेळतें भांडवल २८,१४६५९

चेअरमन — के. बी. रोहमारे
व्हा. चेअरमन — व्ही. डी. भोईटे

– मॅनेजर –
द. के. देशमुख

आहे. कारण तो 'तत्त्वज्ञ' आहे, 'रसिक', आहे पण 'अलिप्त' आहे. प्रियंवदा ही बोलून चालून सामान्य स्त्री. तिला ही 'जाण' येत नाही, हा तिच्या दुःखाचा आणि इतरेजनांच्या विनोदाचा भाग आहे. पतीसमोर प्रियंवदा ही प्रेयसी आहे, तर मुलांच्यापुढे ती आई आहे. पहिल्या पिढींतल्या प्रेमविवाहांतून निर्माण झालेली 'प्रियंवदा' ही एक मनोवृत्ती आहे, ती एक समस्या आहे. वयानें वाढलेल्या, पण मनाने तारुण्याला कवटाळून बसलेल्या, म्हातारपणीं तरुण दिसण्यासाठी सर्व नट्टापट्टा सायासाने करणाऱ्या आणि मुलांचें मनोगत मात्र न उमजणाऱ्या या प्रियंवदा —' प्रिय वाचक, पुण्या-मुंबईला माझ्या संगे आलांत तर मी शेकड्यानें तुम्हाला दाखवून देईन.'

**' बच्चू '—मध्यमवर्गीय प्रश्नचिन्ह !**

'देव आनंद, दिलीपकुमार' आणि तत्सदृश चित्रपटांतील नायक पाहून आणि कथा कादंबऱ्या वाचून प्रेम करणारा, तसल्या प्रेमाचें तत्त्वज्ञान बनविणारा बच्चू हा आजच्या मध्यमवर्गीयांच्या संस्कृतींतलें एक प्रश्नचिन्ह आहे. प्रिय वाचक, तुमचें वय काय आहे आणि तुमचा व्यवसाय कोणता आहे तें मला ठाऊक नाही, पण असले रोमीयो 'बच्चू' कॉलेजांत दिसतात की नाही हा प्रश्न तुम्ही एकाद्या प्राध्यापकाला पुसाल तर तो तुम्हाला माझ्याच बाजूने साक्ष देईल याची मला खात्री वाटते. बच्चू ही बब्बडच्या नाण्याची दुसरी बाजू आहे, तर सुशील ही तिसरी बाजू आहे. स्वतःवर प्रेम करणारीं माणसें कळत न कळत आपल्या प्रेयसीला व प्रियकराला आपल्या सुखाचें वा करमणुकीचें साधन कशीं करतात, दुसऱ्यांच्या भावनांशीं अनेक गोंडस नांवें घेऊन तीं कशीं खेळतात व पर्यायानें स्वतःच्याच दुःखाला तीं कशीं कारणीभूत होतात हें सुशीलमध्ये चित्रित करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. बब्बड, बच्चू, बाजा, प्रियंवदा, सुशील आणि निळूभाऊ हीं सारींच पात्रें आपआपल्यापरी प्रीतीचा शोध करीत आहेत—पण कमी-अधिक प्रमाणांत तीं आपआपल्या संसारांत गुंगतलेलीं म्हणजे Involved आहेत. बल्लाळ एकटाच तटस्थ आहे, अलिप्त आहे. म्हणून त्यालाच प्रीतीचें सर्वंकश रूप दिसतें, समजतें आणि प्रकट करतां येतें.

**तत्त्वज्ञान जगणारा 'बल्लाळ'**

म्हणून अर्थातच या नाटकांत बल्लाळला एक असाधारण महत्त्व प्राप्त होणें अटळ आहे. बल्लाळ हा नुसता तत्त्वज्ञ नाही, नुसता पढिक पंडित नाही—तो 'तत्त्वज्ञान जगणारा' आहे. खरा 'जीवननंदवादी' आहे. त्याहीपेक्षा तो आदर्श पति आहे, तसाच, आदर्श पिता आणि आदर्श गुरु आहे. प्रत्येकाशीं वागण्याची त्याची तऱ्हा वेगळी आहे. To understand all is to forgive all. असें मानणारा तो आहे. बब्बडच्या प्रेमाला तो विरोध करीत नाही—कारण अशा विरोधांतून कांहीहि निष्पन्न होत नाही हें स्वानुभवाने त्याला ठाऊक आहे. बब्बड-बाजीराव यांचें भांडण तो खेळकरपणें मिटवून त्यांतील पोकळपणा तो स्पष्ट करतो. सुशीलशीं बोलतांना तिसऱ्या अंकांत तो गंभीर होतो, कारण तिची समस्याहि गंभीरच आहे. अखेर प्रियंवदेशीं गतजीवनाबद्दल बोलतांना त्यांतील कडू गोड-आठवणींशीं समरस होतांना त्याची काव्यशीलता उचंबळून येते— कारण प्रीतीचा तो प्रत्यय काव्यात्मकच आहे.

शेवटी एकच मुद्दा सांगून लांबलेलें पत्र मी पुरें करतों. रंगभूमीवरले सगळे संकेत झुगारून शेवटीं बल्लाळ लोकांपुढें प्रकट होतो आणि या नाटकांतलें भरतवाक्य बोलतो. मानवी जीवनांतल्या कांहीं थोर प्रत्ययाप्रमाणे प्रेमप्रत्यय हादेखील नवा नाही आणि जुनाहि नाही. प्रत्येक पिढीत, प्रत्येक व्यक्तिजीवनांत त्याचा उन्मेष नवा आहे. 'जुने' आपण होतों; प्रत्यय नव्हे. सबब नाटकाला म्हणूनच आरंभीची नवी नांदी व शेवटचे 'भरतवाक्य यांची हेतुपुरस्सर झालर दिलेली आहे. 'नवी नांदी' आणि 'भरतवाक्य' यांच्या चौकटींतच हें नाटक न्याहाळावें तरच त्यांतील मर्म गवसेल, हें दर्शवण्याचा लेखकाचा त्यांतील हेतु अगदी स्पष्ट आहे.

**उणेपणाची जाणीव**

पण प्रिय संपादक —आणि वाचक-प्रेक्षक हो, तुम्ही इतक्या आपुलकीनें पुसलेंत म्हणून हें सगळें 'सांगितलें.' मात्र हें सांगतांना मी थोडा अवघडल्यासारखीं झालों आहे. अशासाठी की, हें सगळें 'न सांगतां' 'समजलें' पाहिजे, न दाखवतां 'व्यक्त' झालें पाहिजे रंगसौंदर्य आणि गंधसौन्दर्य हा चर्चेचा वा काथ्याकूट करण्याचा क विषय आहे? कलाकृतीचा सौंदर्यास्वाददेखील याच कोटींतला आहे हें सगळें मला 'सांगावें लागलें' यांतच माझ्या कलाकृतींत कोठेतरी उणेपणा असला पाहिजे; माझें बळ कोठे तरी कमी पडलें असलें पाहिजे, पण अखेर हेंहि खरेंच आहे की, जें वाचकांना-प्रेक्षकांना 'आवडतें' त्याची दाद ते सहस्त्रमुखाने देतात आणि जे त्यांना 'नावडते' त्याला ते मारून झोडून पिटाळून लावतात अनेक उणीवा असलेलें हें माझें नाटक तुम्हाला मूलतः कोठेतरी आवडलें आहे, रुचलें आहे आणि पटलें आहे म्हणूनच ना तुम्हीं गर्दी केलीत? दाद दिलीत? ज्याला तुम्हीं 'नाक मुरडलेंत' तें मी मनांत उमजलों आहे आणि ज्याबद्दल तुम्हीं दाद दिलीत तें मी कृतज्ञतेने मिरवीत आहे.

वसंत कानेटकर

शेतीच्या विकासासाठी जास्तींत जास्त पाण्याची बचत करून बागाईत पिकाला भरपूर व मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी......

गोदावरी इंडस्ट्रिज वर्क्स

प्रायव्हेट लिमिटेडचे

☆ सिमेंट पाइप्स् ☆

सदैव वापरा

उत्पादक :

गोदावरी इंडस्ट्रिज वर्क्स प्रा. लि. कोपरगांव

फोन] जि. अहमदनगर [ १४

# प्रा. भालबा केळकर

जीवनाचें वास्तव स्वरूप कलात्मक रीतीनें रंगभूमीवर सादर केलें जातें तेव्हा त्याला नाटकाचें स्वरूप प्राप्त होतें. वास्तवाचें जसेंच्या तसें स्वरूप रसहीन ठरून तें प्रेक्षकांच्या मनाला जाऊन भिडत नाही. कारण त्यांत संकेंद्रित परिणामकारक आविष्काराची जरुरी असते. प्रस्तावनेंत प्रेक्षकांना उद्देशून ह्या नाटकाचें कथानक तुमच्या आमच्या घरांतील आहे असें जें लेखकानें म्हटलें आहे त्याचा अर्थ इतकाच की, यांतील प्रसंग आणि पात्रें हीं तुमच्या आमच्या घरांतील व्यक्ति प्रसंगाची पुसटतीं छायाचित्रें आहेत. व्यवहारांतील त्या त्या धर्तीच्या व्यक्तिरेखांचीं कांहीं वैशिष्ठ्यें संकलित करून तशा व्यक्तिरेखांचें सकेंद्रित स्वरूप नाटकांतील पात्रांच्या द्वारें उभें केलें जातें व म्हणून नाटकांतील व्यक्तिरेखा प्रातिनिधिक असते. वाचक किंवा प्रेक्षकांना नाटकांतील व्यक्तिरेखांमध्ये आपली कांहीना कांही वैशिष्ट्यें दिसतात व त्यांच्याबद्दल आत्मीयता निर्माण होते बल्लाळ, बब्बड, बच्चू हीं नाटकांतील सारीं पात्रें समाजांतील असंख्य व्यक्तींचे गुणावगुण घेऊन सकेंद्रितरित्या उभीं आहेत. प्रश्नांतील असे बच्चू, बबड समाजांत किती आढळतात यामध्येच समाजांत ते असें कांहीं प्रमाणांत तरी आहेत, अशी कबुलीच आहे.

बाप आणि मुलगा, मुलगी हीं नातीं आमच्या समाजांत इतकीं मनमोकळीं दिसत नाहीत, यांतहि तीं त्या धर्तीवर मनमोकळीं दिसूं लागलीं आहेत; अशी अप्रत्यक्ष कबुलीच आहे. आजच्या समाजांत, मुलगा मुलगी, ही बापाकडे बाप म्हणून पाहत नाहींत; त्याचेबद्दलचा आदर अथवा भीति तीं दूर ठेवूं लागलीं आहेत अशी एक तक्रार आहे. म्हणजेच एक अतिरिक्त मनमोकळें नातें निर्माण होऊं लागलें आहे. बापाशीं कोणत्याहि विषयावर मनमोकळी, मनमुराद चर्चा करण्याकडे मुलांचा कल झुकूं लागला आहे. ही सनातन समाजाची एक डोकेंदुखीच आहे.

बल्लाळचें बच्चूवर आणि बब्बडवर पूर्ण लक्ष आहे बल्लाळला हें पूर्ण उमगलें आहे. की बब्बड आता विरोधाच्या पलीकडे गेली आहे आणि निळूभाऊंच्या बाजाशीं तिचा विवाह अटळ आहे म्हणूनच निसर्गतःच घडणाऱ्या गोष्टीला बांध घालणें व्यर्थ आहे हें तो जाणतो. " म्हणजे कोपऱ्यावरचे निळूभाऊ गोरे काय ?" या प्रश्नांतच त्यांची माहिती त्याला आहे हें कळतें, आणि निळूभाऊ व बाजाची भेट झाल्यावरच तो लग्नाला संमती देतो ही गोष्ट त्याच्या मनमोकळ्या, सावध आणि तत्वज्ञ स्वभावास योग्य आहे, म्हणूनच त्यांच्या लग्नाला त्याचा विरोध असण्याचें कांहीच कारण नव्हतें बच्चूवर सुशिलेचें मुळीच प्रेम नाही हें त्याला तावडतोब उमगलें. ती त्याला वेगळा मान ा आहे. आणि त्याला जवळ येऊं देणार नाहीं, हें तो जाणतो. फक्त बच्चूला हें स्वानुभवानेच कळावें एवढ्यासाठीं त्याला तिच्या प्रेमासाठीं प्रेरणा दिल्यासारखें भासवतो. बच्चूला आपण कोणत्याहि परिस्थितींत आवरूं शकूं असा त्याला आत्मविश्वास आहे.

सुशीलेची ट्रीटमेंट ही ट्रीटमेंटची टिंगलच आहे. तिचा तो खेळ आहे, तिच्या वाक्यांतूनच हें स्पष्ट होतें.

बब्बडला मूर्ख, अव्यवहारी ठरवून त्या प्रश्नांतच खऱ्या प्रेमाची व्याख्या दिली आहे. खरें उत्कट प्रेम असीम असलें. व्यवहाराच्या पलीकडचें असतें. व्यवहारी जगाला मात्र तें मूर्ख वाटतें. जेव्हा व्यक्तीच्या आर्थिक स्थितीची, प्रतिष्ठेची, शिक्षणाची चौकशी करावीशी वाटेल तेव्हा तो व्यवहार होईल–खरें प्रेम आंधळें असतें याचें बब्बड प्रातिनिधिक स्वरूप आहे. जगांत अशी बब्बड अशक्य नाही, फक्त सर्रास दिसत नाही. प्रेम हें फार्समधून सुरू होतें म्हणून फार्सिकल वाटतें. उत्कट प्रेम नसेल तर प्रेमाचा वरचा गहिरा रंग उडून जातो व मग खटके उडतात, पण बब्बड निसर्गाच्या आव्हानाला प्रत्युत्तर देते व म्हणून ती सहवासांतून निर्माण होणाऱ्या प्रेमाचे रंग संसारांत खुबीनें भरूं लागली आहे. नवऱ्याला तर तिनें जिंकलें आहे. पण पुढे सासूसासऱ्यांनाहि वश केलें आहे. म्हणजेच उत्कट प्रेमाला व्यवहाराची सुरेख झालर दिली आहे. याचाच अर्थ ती पूर्ण समंजस, शहाणी आहे. प्रेमाच्या मदनबाधेच्या रूपाला ती संसारात समंजसपणें नेटक्या सुबक चौकटींत बसवते. पुढे निर्गुण, निराकार, दिव्य प्रेमाची वाटचाल करूं लागते व त्यासाठी तिनें संसारांतील सारें कसब पणाला लावलें आहे. बाजीराव व बब्बड हें या प्रेमाच्या रंगांतील यशस्वी युगुल आहे. प्रेम हें साध्य आहे साधन नव्हे, हें त्यांना प्रतीत होतें आणि बल्लाळ प्रियंवदाबाई या यशस्वी युगुलाच्या लोभनीय छायेसमोर हें नवें युगुल उभें राहून प्रेमलिप्त जीवनाची प्रतीती देत आहे.

(पान ३२ कॉलम २ पहा)

र. नं. १२३२] विना सहकार नहि उद्धार [र. ता. ८-११-१९१६

शेतकऱ्यांना शेती अवजारें पुरविणें, रासायनिक व कृत्रिम खतें, कीडनाशक औषधें पुरविणें, शेतकऱ्यांच्या मालाची ने–आण करण्यासाठी ट्रक्स पुरविणें, तसेंच बागाईतदारांना एंजिन्स, स्पेअर पार्टस व मशिनरी तेलें पुरविणारी 'अ' वर्गातील. . . . .

**पोहेगांव विविध कार्यकारी**

**सहकारी सोसायटी लि.**

सभासदसंख्या १८४ · शेअर भांडवल २०,८९७० · सभासद ठेव ९३,३१० · रिझर्व व इतर फंड १०,६७२१ · खेळतें भांडवल १४,४०,९१८ · इतर संस्थेंत गुंतविलेलें भांडवल १,१४,४९२ · एकूण उलाढाल ७५,००००० 

चेअरमन — माधवराव बी. शिंदे

व्हा. चेअरमन — त्र्यं. दे. वाके

सेक्रेटरी — वि. ता. सांगळे

# ★ एम्. सी. सी. चा भारत-दौरा ★

## एक ओझरता दृष्टिक्षेप

विद्याधर

"आम्ही या दौऱ्यांत अत्यंत आकर्षक व आक्रमक खेळ खेळूं" असें इंग्लंडचे संघनायक टेड डेक्स्टर यांनी भारत दौऱ्याला सुरुवात होण्यापूर्वी जाहीर केलें होतें. मुंबई येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यांत नाणेंफेक जिंकून त्यांनी सुरुवात तर चांगली केली. त्यांनी मुंबईची विकेट फलंदाजांना अनुकूल आहे हें पाहून फलंदाजी स्वीकारली यांत कांही नवल नव्हतें. त्यांच्या आघाडीच्या फलंदाजांनी धावांचा डोंगर रचला. बॅरिंग्टनने नाबाद १५१ धावा काढल्या. दौऱ्यांतील हें त्यांचें लागोपाठ दुसरें शतक होतें. पहिलें लाहोरला पाकिस्तान संघाविरुद्ध काढलें होतें. इंग्लंडने आपला पहिला डाव आठ गडी बाद ५०० धावांवर घोषित केला. इंग्लंड संघ खरोखरच मातब्बर ठरणार असें दिसूं लागलें. सगळयांत यशस्वी गोलंदाज-भारताकडून-रांजणे ठरला. त्याने ७६ धावांत ४ गडी बाद केले. भारताचा पहिला डाव ३९० धावांवर संपला. दुराणीने उत्कृष्ट टोलेबाजी करून ७१ धावा केल्या व बोर्डेने (६९ धावा) त्याला चांगली साथ दिली. जयसिंहा व मांजरेकर यांनी प्रत्येकी अर्धशतक पुरें केलें.

इंग्लंडने दुसरा डाव परत ५ गडी बाद १८४ वर थांबविला. भारताला २४५ मिनिटांत २९५ धावा करावयाच्या होत्या, परंतु शक्य असतांनासुद्धा भारत तेवढ्या धावा करू शकला नाही. भारताच्या ५ गडी बाद १८० धावा होऊन सामना अनिर्णित राहिला. कॉन्ट्रॅक्टर दुसऱ्या डावांत लौकर बाद झाल्याने खेळाला कलाटणी मिळाली. या सबंध दौऱ्यांत कॉन्ट्रॅक्टर फलंदाजींत अत्यंत अपयशी ठरला.

आणि याच सामन्यांत कॉन्ट्रॅक्टरला कप्तानपद व्यवस्थितपणें हाताळतां येत नाही हेंहि सिद्ध झालें होतें. रांजणेला अधिक गोलंदाजी देण्याऐवजी त्यानें देसाईवरच अधिक भर दिला. देसाईनेदेखील यावेळीं त्याच्या चाहत्यांची चांगलीच निराशा केली.

### लेगस्पिन गोलंदाजीचा प्रभाव

कानपूरच्या दुसऱ्या सामन्यांतून रांजणेला वगळलें गेलें. भारताने पहिल्या डावांत आठ गडी बाद ४६७ धावा केल्या. त्यांत मांजरेकर ९६ व **उम्रीगर** नाबाद १४६ अशा धावा होत्या. दिलीप सरदेसाई व **विजिवर** यांनी कसोटी सामन्यांत प्रथमच प्रवेश करूनदेखील चांगला खेळ केला, परंतु निवडसमितीचा लहरीपणा पुढील कसोटी सामन्यांतून अनुभवाला आला. सरदेसाईला उरलेल्या एकाहि सामन्यांत संधि दिली गेली नाही. दरवेळीं त्याला १२ वा ठेवण्यांत येई. कारण? कारण त्याचें उत्कृष्ट क्षेत्ररक्षण! इंग्लंडचा पहिला डाव २४४ धावांत आटोपला. गुप्तेने ६१ धावांत ५ गडी बाद केले इंग्लंड संघाला इतक्या कमी धावांत बाद केलें ही गोष्ट भारताला निश्चित अभिमानास्पद होती. परंतु इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत तेच भारतीय गोलंदाज निष्प्रभ ठरले. इंग्लंडचे अवघे पांच गडी बाद झाले. आणि त्यांतील दोघे धावबाद! आणि धावा ४९७ डेक्स्टरचें नाबाद शतक (१४६), बॅरिंग्टन धावबाद १७२ व पुलर ११९ या प्रमुख धावा होत्या. सामना अनिर्णित राहीला. या सामन्यामुळे एक मुख्य गोष्ट कळून आली, ती म्हणजे पाहुणे संघाला "लेगस्पिन" गोलंदाजी अजिबात खेळतां येत नाही. पुढील सामन्यांत ही गोष्ट विचारांत घेणें आवश्यक होतें आणि त्यांतच कप्तानाच्या चाणाक्षपणाची कसोटी होती.

यानंतरचा दिल्लीचा तिसरा सामनाहि अनिर्णित राहिला, परंतु तो शेवटचे दोन दिवस पाऊस पडल्यामुळेच! मात्र या सामन्यांतील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे भारतातर्फे मांजरेकरने एक विक्रम प्रस्थापित केला. इंग्लंडविरुद्ध भारताने खेळलेल्या सामन्यांत आजपर्यंत अधिक वैयक्तिक धावा काढण्याचा मान विनू मनकडला लॉर्डस् मैदानावर १८४ धावा काढल्यामुळे मिळाला होता. दिल्लीतील या सामन्यांत मांजरेकरने ४४४ मिनिटें (नाबाद) खेळून १८९ धावा केल्या व तो मान मनकडकडून हिरावून घेतला. जयसिंहानेदेखील १२९ धावा करून कसोटी सामन्यांतील आपलें पहिलें वहिलें शतक झळकविलें. भारताचा पहिला डाव ४६६ धावांवर संपला. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ३ गडी बाद २५६ धावा असतांनाच सतत पावसामुळें खेळांत व्यत्यय आला व सामना अनिर्णित राहिला. इंग्लंडच्या या डावांतही बॅरिंग्टनच्या नाबाद ११३ धावा होत्या. त्याचें कसोटी सामन्यांतील हें लागोपाठ चौथें शतक होतें. कॉन्ट्रॅक्टरने या सामन्यांत लागोपाठ दुसऱ्या वेळेस नाणेंफेक जिंकली. पतौडीच्या नवाबाला प्रथमच कसोटी सामन्यांत खेळण्याची संधि देण्यांत आली, परंतु तो १३ धावा काढून बाद झाला.

## उम्रीगरचें कप्तानपद

कलकत्त्याच्या चौथ्या कसोटी सामन्यांत दिल्लीच्या विजय मेहरा या आघाडीच्या फलंदाजाला संधि देण्यांत आली. त्यानेहि हाताचें बोट दुखावलें असतांनासुद्धा ६२ धावा करून आपली निवड योग्य ठरविली. कॉन्ट्रॅक्टरने याहि सामन्यांत पुन्हा एकदां नाणेंफेक जिंकून अर्धा अधिक गड भारताला सर करून दिला. विकेट फिरकी गोलंदाजांना अनुकूल होणार असल्याकारणानें भारतानें प्रथम फलंदाजी स्वीकारली व ३८० धावा केल्या. पतौडीच्या नवाबानें सर्वांत अधिक म्हणजे ६४ धावा केल्या. इंग्लंडचा पहिला डाव २१२ धावांत आटोपला. त्यांत रिचर्डसन ६२ व डेक्स्टर ५७ याच काय त्या अधिक धावा होत्या. भारताचा दुसरा डाव २५१ धावांत संपला. त्यांत बोर्डेने सर्वांत अधिक म्हणजे ६१ धावा केल्या. अॅलनला ९५ धावांत ४ व लॉकला १११ धावांत ४ बळी मिळाले. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत सर्वगडी बाद २३३ धावा झाल्या. त्यांत डेक्स्टर ६२, रिचर्डसन ४२ व पारफिट ४६ या नांव घेण्याजोग्या धावा होत्या. भारतातर्फे देसाईला ३२ धावांत २, रांजणेला ३१ धावांत २, दुराणीला ६६ धावांत ३ व उम्रीगरला ४६ धावांत २ असे बळी मिळाले. कॉन्ट्रॅक्टरला दुखापत झाल्यामुळे उम्रीगरने कप्तानपद स्वीकारलें व भारताला १८७ धावांचा दणदणीत विजय मिळवून दिला.

मद्रासच्या पांचव्या व शेवटच्या सामन्यांत कॉन्ट्रॅक्टरने ओळीने चौथ्यांदा नाणेंफेक जिंकली. सुरुवातीपासूनच या सामन्याचा रागरंग औरच होता. आतापर्यंत अपयशी ठरलेल्या कॉन्ट्रॅक्टरने ८६ धावा काढून आपली जुनी चमक दाखविली. पतौडीने कसोटी सामन्यांतील आपलें पहिलें शतक झळकविलें (१०३) नाडकर्णी आणि इंजिनिअरन आठव्या विकेटकरितां १०१ धावांची भागीदारी केली. (नाडकर्णी ६३ व इंजिनीअर ६५.) भारताचा पहिला डाव ४७५ मिनिटांनी ४२८ धावा होऊन संपला. या दौऱ्यांतील आतापर्यंतच्या याच सर्वांत जलद धावा होत्या. इंग्लंडतर्फे अॅडनने ११६ धावांत ३ गडी बाद केले. इंग्लंडचा डाव ३७५ मिनिटांत २८१ धावा होऊन संपला. माईक स्मिथ आतापर्यंत अपयशी ठरला होता; परंतु त्यानेहि दौऱ्यांतील सर्वांत अधिक म्हणजे ७३ धावा केल्या. भारतातर्फे दुराणीने १०६ धावांत ६ गडी बाद केले व बोर्डेने ५८ धावात दोन गडी बाद केले. भारताचा दुसरा डाव १९८ धावांत आटोपला. त्यांत मांजरेकरने ८५ धावा केल्या. लॉकने ६५ धावांत ६ गडी बाद केले.

खेळाचा शेवट आता अगदी उघड होता. दुराणी व बोर्डेने आपलें काम चोख बजावलें. इंग्लंडचा डाव २०९ धावांत संपला. दुराणीने ४ व बोर्डेने ३ गडी बाद केले. बॅरिंग्टन ४८, नाईट ३३ व पारफिट ३३ या त्यांच्या जास्त धावा!

### तिसऱ्यांदा 'रबर' जिंकलें

पुन्हा भारताने हा सामना जिंकून इंग्लंडविरुद्ध पहिल्यांदा व क्रिकेट इतिहासांत तिसऱ्यांदा रबर जिंकलें. पहिलें लाला अमरनाथने ५४ सालीं पाकिस्तानविरुद्ध व दुसरें गुलाम अहमदने ५६ सालीं न्यूझीलंडविरुद्ध आणि हें तिसरें कॉन्ट्रॅक्टरने!

या सबंध दौऱ्यांत एक गोष्ट दिसून आली की, इंग्लंड संघाचा जेवढा बाऊ करण्यांत आला तेवढा तो संघ मुळीच चांगला नव्हता. दुसरें असें की, इंग्लंडने समाविष्ट केलेले नवीन सर्व खेळाडू अजून नीट यशस्वी झालेले नाहींत. या उलट आम्ही हाताळलेले आमचे नवोदित खेळाडू—रांजणे, इंजिनीअर, मेहरा, पतौडी, दुराणी कल्पनेबाहेर यशस्वी झाले व त्याच जोडीला आमचे जुने खेळाडू 'फॉर्म' मध्ये येऊन आमची मान त्यांनी ताठ ठेवली.

कलकत्त्याच्या सामन्यावरून उम्रीगर ज्या प्रकारचा कप्तान आहे त्या प्रकारचा कप्तान कॉन्ट्रॅक्टर मुळीच नाही हें पुन्हा एकदा सिद्ध झालें. सामना जिंकावयाचा झाल्यास त्याला उम्रीगरसारख्या धडाडीच्या कप्तानाची व युक्त्या प्रयुक्त्यांचीच जरुरी आहे.

### बढाईखोर इंग्लंड संघ

एम्. सी. सी. चा संघ भारताच्या दौऱ्यावर येण्याआधीं इंग्लंडमधील "डेली मेल" आणि डेली मिरर या आणि अन्य वृत्तपत्रांनी इंग्लंडच्या संघाची अफाट स्तुतिस्तोत्रें गायिलीं होतीं. भारतासारख्या सामान्य क्रिकेटसंघाबरोबर पांच दिवसांची टेस्टमॅच हवीच कशाला? आम्ही त्यांच्याबरोबर तीन दिवस जरी खेळलों तरी आमचें नैपुण्य आम्ही सिद्ध करून रबर सहज जिंकून आणूं!" अशा आशयाचे उद्‌गार काढण्यांत आले. इंग्लंडच्या निवड समितीने संघातील खेळाडूंचीं नांवें जाहीर केलीं तेव्हा यांतील निम्म्याहून अधिक खेळाडू द्वितीय श्रेणीचे आहेत असेंहि सांगून टाकलें होतें. मे ट्रमन् स्टॅथॅम आणि कौड्रि त्या प्रथम श्रेणीचे खेळाडूंनी भारताच्या दौऱ्यावर येण्यास नकार दिला. कांही प्रथम श्रेणीचे आणि कांही द्वितीय श्रेणीचे खेळाडू भारतांत धाडण्यांत आले. भारतामध्यें घबराट निर्माण झाली. यामध्यें भर म्हणून कीं काय ऑस्ट्रेलियाचा संघनायक रिची बेनो यानेहि इंग्लंडच्या खेळाडूंची स्तुति केली होती.

आणि नुकताच हा दौरा संपवून इंग्लंड संघ भारतांतून निघून गेला आहे. आणि रबर नक्की जिंकण्याच्या बढाया मारणाऱ्या संघाला लाजेने खालीं मान घालून जावे लागले आहे. भारताने त्यांना चांगलाच धडा शिकविला आहे भारताने जागतिक क्रिकेट क्षेत्रांत आपलें अेक विशिष्ट स्थान निर्माण केलें आहे.

### षट्‌कारांची रेलचेल

षट्‌कार! जो आम्ही आजपर्यंत नुसता ऐकत होतों; परंतु प्रत्यक्षांत मात्र पाहयला मिळणें कठीण होता, त्याची या दौऱ्यांत अगदी रेलचेल झाली. मुंबईला पुलर आणि दुराणी, कानपूरला बॅरिंग्टन आणि डेक्स्टर, दिल्लीला जयसिंहा, कलकत्त्याला, डेव्हिड स्मिथ, रांजणे आणि देसाई मद्रासला जयसिंहा, कॉन्ट्रॅक्टर, पतौडी (२) माइकस्मिथ व डेव्हिड स्मिथ (२) असे एकूण या दौऱ्यावरील कसोटी सामन्यांत १५ षटकार मारले गेले.

सर्व सामन्यांतील धाव फलकाकडे एक नजर ाकली तर असें दिसून येईल की, इंग्लंड संघांतून पुलर, बॅरिंग्टन व डेक्स्टर यांना वगळल्यास बाकी शून्य राहते. शेवटच्या दोन सामन्यांत पुलर न खेळल्याने त्यांची आघाडी कमकुवत ठरली आणि नवीन आघाडीच्या फलंदाजांनी सुरुवात चांगली न केल्याने शेवटीं धावा कमी मिळाल्या. या अखेरच्या दोन्ही सामन्यांत पुलर खेळला असता तर कदाचित् इंग्लंडची एवढी घसरगुंडी झाली नसती. अभेद्य भिंत वाटणारा बॅरिंग्टनदेखील वाळूचा ढिगारा ठरला. शेवटच्या चार डावांत त्याला दुराणीने दोन वेळां बोर्डेने एकदा व नाडकर्णीने एकदा लवकरांत लवकर बाद करून तो लेगस्पिनला घाबरणारा आहे हेंच सिद्ध केलें. ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना सळो की पळो करून सोडणारा डेक्स्टरदेखील येथे तितकासा यशस्वी झाला नाही.

हाच इंग्लंड संघ जर बेनोच्या म्हणण्याप्रमाणे पुढच्या वर्षी ऑस्ट्रेलियाला जाणार असेल तर त्याचा पांचहि सामन्यांत पराभव करून 'अॅशेस' टिकविणें ऑस्ट्रेलियाला सहज शक्य आहे. इंग्लंडचे द्रुतगती गोलंदाज व्हाईट व नाऊन यांचा प्रभावच पडला नाही. त्या मानाने आमचे देसाई व रांजणेच अधिक उठून दिसले. आमचे फिरकी गोलंदाजसुद्धां त्यांच्या फिरकी गोलंदाजांपेक्षा अधिक यशस्वी ठरलेले आहेत.

एकंदरीत् पाहतां भारतीय क्रिकेटला भविष्यकाळ उज्ज्वल दिसत आहे. आता त्याला फक्त सुयोग्य पुढाऱ्याची आणि धडाडीच्या चाणाक्ष नेत्याची जरुरी आहे.

—o—


र.नं. २३१३३/ जय सहकार / र ता. २५-३-१९५५

शेतकऱ्यांना शेतीअवजारें, रासायनिक खतें व कीडनाशक औषधें पुरविणें, बागाईतदारांना एंजिन्स, स्पेअर पार्टस व मशिनरी तेलें पुरविणारी 'अ' वर्गातील......

**पोहेगांव खूर्द विविध कार्यकारी**

**सहकारी सोसायटी लि.**

● सभासदसंख्या १२९ ● शेअर भांडवल १,८५,४८० ● सभासद ठेव ९,९२८ ● इतर फंड ११,४३५ ● खेळतें भांडवल ८,३३,३०७ ● एकूण उलाढाल ८,३३,३०७ ●

चेअरमन ★ व्हा. चेअरमन

बाळकृष्ण कोंडाजी रोहमारे — दादा शहाजी रोहमारे

सेक्रेटरी

गो. दा. रत्ने


( पान २९वरून )

**प्रा. भालबा केळकर**

बच्चु हा प्रेम चाचपडत आहे आणि म्हणूनच खड ाळ प्रदेशांतील आंधळ्याप्रमाणे पडला तर पुन्हा उठून मार्ग शोधतो हे डचणी कळल्या तर डोळस माणूस पुन्हा प्रयत्न करीतच नाही. आंधळ्याप्रमाणें दरवेळीं बच्चू मला हत्ती सांपडला असें ओरडतो पण खरा हत्ती त्याला कधीच सापडत नाही. बच्चु हा केवळ आंधळ्याप्रमाणे आहे. त्याला प्रेम कधीच सापडत नाही.

बल्लाळचें वर्तन त्याच्या प्रतिष्ठेला न शोभणारें आहे, हा आरोप प्रतिष्ठेच्या खोटया कल्पनेचें द्योतक आहे. बल्लाळ हा खोटया प्रतिष्ठेला मानत नाही. त्याने तत्त्वज्ञान पचविलें आहे. म्हणूनच तो मनमोकळा आहे. विनोदी आहे. त्याचा जगाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन आत्मनिष्ठेच्या अहंकाराने दूषित नाही. तो खरा ज्ञानी आहे, म्हणून ज्ञानाचें ढोंग करीत नाही. प्राध्यापक आहे म्हणजे खरा प्राध्यापक आहे. विचारी आहे. खूप वाचन केलेला आहे हें दाखविण्यासाठी प्राध्यापक आहे या त्याच्या खोटया प्रतिष्ठेच्या भावनाच गळून पडल्या आहेत.

प्रियंवदाबाई मात्र त्याच्या मानाने उथळ आहे, पण त्यांचें नवऱ्यावर खरें प्रेम आहे. त्याची काळजी घेणें हेंच तिचें जीवन आहे. बब्बडच्या लग्नाला विरोध केवळ तिचा अहंकार दुखावला, आपली परवानगी घेतली नाही. एवढयासाठी आहे. अखेरीस पुढे वरवरचें अहंकाराचें कवच गळून पडून तीच जावयाचें कौतुक करूं लागते.

तिसऱ्या अंकांत बल्लाळ सुशीलेला प्रेमाचें तत्त्वज्ञान एवढयासाठी सांगतो की बच्चु तें जाणूं शकणार नाही, बब्बड त्याच्या पार गेली आहे व सुशील या दोन्हीच्या सीमारेषेवर आहे व तिच्यावर त्याचें मुलीसारखे प्रेम आहे व तिचें चांगलें व्हावें या दृष्टीने तिला हें सारे सांगतो.

शेवटच्या भरतवाक्यांत हें चाललेलें सर्व अनादि अनंत आहे; असें सुचवून प्रत्येकाने जरा खोलवर विचार केला, डोळसपणें बघितलं तर यांतून निर्माण होणारीं कितीतरी तथाकथित दुःखे दूर होतील असें सूचकतेने सांगतो व यांतच माझ्या मतें या नाटकाचें प्रेक्षकांच्या पर्यंत जाण्याचें यश समावलेलें आहे.

★ ★ ★


सुबक, घाटदार व उत्तम झिलईचीं पितळी भांडीं तयार करणारे .....

**तुकाराम न. कुंभकर्ण**

★ मेटल वर्क्स ★

● डिंगर आळी, यार्दी वाडा, नासिक. ●



## लोकप्रिय नट कुशल दिग्दर्शक

# राजाभाऊ परांजपे

लेखक—शरद तळवलकर

*वीस-एकवीस वर्षें राजाभाऊंचें मला-जवळून जवळून पाहणाऱ्या एका कलावंताने आपल्या 'पथप्रदर्शकाचा' घडविलेला हा परिचय..*

१९३८ सालच्या जुलै महिन्यांतले दिवस होते. उन्हाळा संपून वर्षाकाळाचे मेघ पुण्यभूमीवर गर्दी करूं लागले होते. कॉलेजचें वातावरण रंगीबेरंगी होऊं लागलें होतें. याच वेळीं शालेय जीवन संपवून शिक्षण, कला का कारकुनी या संभ्रमांत मी असतांना माझे आतेभाऊ श्री. सदूभाऊ ठकार हे मला एका नाटक कंपनींत नेण्यासाठी आले. कलाक्षेत्रांत प्रवेश मिळतो आहे म्हणून मीहि उत्साहाने त्यांचेबरोबर गेलों. नटवर्य श्री. केशवराव दाते यांनी 'नाट्य-विकास' नांवाची एक नाट्यसंस्था पुण्यांत स्थापन केली होती. श्री. केशवराव दात्यांचे नाटक कंपनींत प्रवेश मिळतो आहे हा आनंद कांही आगळा होता. मी तेथे गेलों. श्री. शं. गो. साठे यांचें 'छापील संसार' हें नाटक कंपनीनें घेतलें होतें. तालमीसाठी नटवर्ग हळूहळू जमत होता. नाटक कंपनीच्या अपरिचित वातावरणाने मी कांहीसा गांगरून गेलों होतों. इतक्यांत एक व्यक्ति तेथे आली. श्री. दात्यांचे शेजारी येऊन बसली श्री. दात्यांनी माझें नांव त्या व्यक्तीला सांगितलें व ते म्हणाले, "हा मुलगा आपल्या कंपनींत आला आहे. नाटक कंपनींतला नाही, नवीनच आहे" श्री. दात्यांनी दिलेली माहिती ऐकल्यावर ती व्यक्ति म्हणाली, "नवीन आहे ना, मग अवश्य ठेवून घ्या." मला खूपच धीर आला. मीं कुतूहलाने त्या व्यक्तीकडे पाहिलें. एक पांढरा शुभ्र शर्ट, परीटघडीचा पायजमा व वूलनचा कोट हा त्या व्यक्तीचा पेहेराव होता, बोलतांना चमकणारे भावपूर्ण डोळे पाहून नाट्य व्यवसायांतील ही व्यक्ति कोण असावी याचा मनाशीं मी विचार करूं लागलों. इतक्यांत श्री. केशवराव दात्यांनी त्या व्यक्तीची मला ओळख करून दिली व सांगितलें, "हे राजाभाऊ परांजपे बरं का."

### 'नवीन आहे; अवश्य ठेवा'

अशा रीतीने २०-२१ वर्षांपूर्वी राजाभाऊंचा व माझा परिचय झाला. 'नवीन आहे मग राहूं दे' या त्यांच्या वाक्याचा अर्थ मी मनाशी सारखा लावत होतों. पण मला उत्तर सापडेना. तो स्पष्ट विचारण्याइतका मोकळेपणा आमच्या परिचयांत आला नव्हता 'छापील संसार' रंगभूमीवर आलें त्याच्या दुसऱ्या दिवशीं त्याचा अर्थ मला कळला. तो प्रसंग असा. श्री. दाते यांच्या गैरहजेरीत श्री. राजाभाऊच आमच्या तालमी घेत होते. नायिकेची भूमिका करणाऱ्या बाई नवीन होत्या. आठ दिवसांवर नाटकाची तारीख आली होती. बाई नवीन असल्यामुळे सर्वच साशंक होतें, पण आठव्या दिवशीं झालेल्या नाटकांत त्या बाईनी उत्कृष्ट काम केलें. नाटकाच्या दुसरे दिवशीं कंपनीच्या बिऱ्हाडीं आम्ही सर्व जमलों होतों. त्या वेळीं मीं राजाभाऊंना "नवीन आहे, मग आवश्य ठेवा" या त्यांच्या वाक्याचा अर्थ विचारला. त्या वेळीं त्यांनी सांगितलें की, "काम करणारा अगदी नवीन असला म्हणजे आमच्या विचाराप्रमाणे आमच्या पद्धतीने त्याच्याकडून भूमिका बसवून घेतां येते. पूर्वीचे कांही संस्कार असले म्हणजे शिकणारा व शिकवणारा यांचें एकमेकांशीं तादात्म्य होऊं शकत नाही. शाळेंत पुस्ती काढतांना पहिल्या शिक्षकाने दिलेलें

अक्षरांचें वळणच जीवनांत कायम राहतें व त्या शिक्षकालाहि ती अभिमानाची गोष्ट वाटते."

२० वर्षांपूर्वीची त्यांची ही विचारसरणी आजहि कायम आहे. त्या वेळीं त्यांच्या अभिनयाचे धडे मी गिरवूं लागलों होतों. आजहि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांना शिकवतांना तोच उत्साह कायम आहे. राजा गोसावी, रमेश देव, जयश्री गडकर, चित्रा, रेखा, सीमा, स्मिता, चंद्रकांत गोखले आणि नवतारका' ललिता देसाई वगैरे कलावंतांचें यश ही राजाभाऊंच्या दिग्दर्शनाची देणगी आहे व या कलावंतांचें हें यश पाहिलें म्हणजे मग "नवीन आहे, मग आवश्य घ्या" या त्यांच्या वाक्याचा अन्वयार्थ पूर्णपणें लागतो.

प्रत्येक भूमिकेचा सर्वांगीण विचार करून ती कलावंताच्याकडून करून घ्यायची ही त्यांची कलाक्षेत्रांत उतरल्यापासूनची तळमळ आहे. त्यांनी शिकवून तयार केलेल्या कलावंताच्या लोकप्रियतेला हीच त्यांची तळमळ कारणीभूत झाली आहे. चित्रसृष्टींत एक कलावंत म्हणून भूमिका करीत असतांना राजाभाऊंना ही तळमळ मनांतील एका कप्प्यांत दडवून ठेवावी लागली. तिला खरा वाव मिळाला तो दिग्दर्शक झाल्यावरच. परंतु ते स्वस्थ बसले नाहीत. कलावंत म्हणून त्यांनी ज्या भूमिका केल्या त्या याच तळमळीने अभ्यासपूर्ण केल्यामुळे प्रत्येक भूमिकेवर त्यांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची छाप आहे. त्यांच्या प्रत्येक भूमिकेंत ही तळमळ स्पष्ट दिसते व त्यामुळेच सूनबाई, जशासतसें वगैरे चित्रपटांतील त्यांच्या भूमिका अजरामर झाल्या.


भारत सरकारकडून रजिस्टर केलेले

## पांढरे डाग

१९३६ पासून प्रसिद्ध व हजारोंनी प्रशंसापत्रें पाठविलेलें शरीरावरील पांढऱ्या कोडाचें अजब गुणकारी औषध.

किंमत ५ रु. पो. ख. १। रु.

**माहितीपत्रक मोफत मागवा.**

**दमा, श्वास** रोगावर अनुभविक गुणकारी औषध किं. ५ रु. पो. ख. १। रु.

कोणत्याहि रोग्यानें प्रकृतिमान कळविल्यास त्यावर गुणकारी औषधें पाठवूं.

सूचना:- निंदक व धोकेबाजांपासून सावध राहावें.

वैद्य—के. आर. बोरकर, आयुर्वेद भवन मु.पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)


### जबर आत्मविश्वास

दिग्दर्शक झाल्यावर त्यांच्या या तळमळीला खरा वाव मिळाला. आपल्या भूमिकेचा अभ्यास करण्याची शक्ति प्रत्येक कलावंताच्यामध्ये असतेच असें नाही, परंतु राजाभाऊंचा त्या भूमिकेचा सर्वांगीण विचार पूर्ण झालेला असतो. कलावंताच्याकडून एखादी भूमिका मी करून घेईनच या त्यांच्या आत्मविश्वासाचा जन्महि याच तळमळींतून झालेला आहे. त्यांच्या शिकवण्याला कलावंताच्या कर्तृत्वाची जोड मिळाली की, कोणतीहि भूमिका ते रजतपटावर साकार करून दाखवतात. या बाबतींत एक फार मजेदार गोष्ट घडून आली. "ऊन पाऊस" या चित्रपटांत आपल्याबरोबर वृद्ध पत्नीची भूमिका करण्यासाठी राजाभाऊंनी सुमती गुप्ते यांची निवड केली. भूमिका अत्यंत कठीण. सुमतीबाईंचें वय व भूमिकेंतील स्त्रीचें वय यांत खूप अंतर, इतक्या वयस्कर बाईची भूमिका त्यांनी पूर्वी केलेली नव्हती. थोडक्यांत सर्वच गोष्टी प्रतिकूल. फक्त सुमतीबाईंचें कर्तृत्व तेवढेंच अनूकल. दोन दिवस चित्रपटाचें शूटिंग झाल्यावर ती भूमिका करतां येईल का, याबद्दल सुमतीबाईंना स्वतःलाच शंका वाटूं लागली व त्यांनी राजाभाऊंना स्पष्ट सांगितलें, "राजाभाऊ, ही भूमिका मला जमणार नाही, तुम्ही दुसऱ्या बाईला आणा. मला बिलकुल वाईट वाटणार नाही." वास्तविक कलावंताने स्वतःच असें सांगितल्यावर दिग्दर्शकाने दुसऱ्या बाईची त्या भूमिकेसाठी योजना केली असती, परंतु राजाभाऊंचा आत्मविश्वास जबर होता. त्यांनी सुमतीबाईंना सांगितलें, "ही भूमिका मी तुमच्याकडून करून घेणार. ती यशस्वी झाली नाही तर मी स्वतः पुन्हा तोंडाला रंग लावणार नाहीं." सुमतीबाईंचा नाइलाज झाला. मात्र राजाभाऊंच्या आत्मविश्वासाला त्यांनी आपल्या कष्टाची भरपूर जोड दिली. ज्या दिवशीं "ऊनपाऊस" हा चित्रपट सुमतीबाईंनी प्रथम पहिला त्या वेळीं त्या स्वतः गोंधळून गेल्या होत्या. आपणच ही भूमिका केली या वस्तुस्थितीवर त्यांचा स्वतःचा विश्वास बसेना. अखेर त्यांनीं राजाभाऊंना विचारलें. 'राजाभाऊ, या वृद्ध बाईची भूमिका मींच केली आहे का हो?' राजाभाऊंनी फक्त स्मित हास्य केलें. सीमा सराफ या अभिनेत्रीची 'सुवासिनी' या चित्रपटांतील भूमिका यशस्वी व्हायला हाच त्यांचा आत्मविश्वास कारणीभूत आहे. त्यांच्या आत्मविश्वासाचा लाभ ज्यांना ज्यांना मिळाला ते कलावंत आज कीर्तीच्या शिखरावर आहेत. राजाभाऊ प्रेमळ पित्याप्रमाणे त्यांच्या यशाकडे कौतुकाने पाहत आहेत.

### 'ऊनपाऊस'मधील मास्तर

त्यांच्या दिग्दर्शनांतील व भूमिकेंतील एक वैशिष्ट्य म्हणजे स्वाभाविकता. स्वतःची भूमिका करतांना किंवा दुसऱ्याकडून एखादी भूमिका करून घेतांना, त्या कथेंतील त्या भूमिकेचें स्थान काय आहे याबद्दलचा त्यांचा विचार परिपूर्ण झालेला असतो. मग त्या स्थानानुसार त्या भूमिकेचा स्वभाव, हावभाव जितके स्वाभाविक दिसतील तितके दाखविण्याची ते शिकस्त करतात व ते त्या भूमिकेशीं एकरूप होतात. त्यामुळे राजाभाऊंनी केलेली ती भूमिका आपण पहात नसून त्या नांवाची एखादी व्यक्तीच आपण पहात आहोंत अशीच प्रेक्षकांची समजूत होते. पेडगांवचे शहाणे मधील डॉ. शहाणे, ऊनपाऊसमधील मास्तर, पुढचं पाऊलमधील मामा चिपळूणकर, जगाच्या पाठीवर मधला सखाराम, येवढेंच काय, पण जशास तसें मधील पिठाची गिरणीवाला वगैरे त्यांच्या भूमिका ज्यांनी पाहिल्या ते सर्व माझ्याशीं खात्रीने सहमत होतील. त्यांच्या भूमिकेंतील एकरूपतेबद्दल एक गमतीदार सत्यकथा येथे नमूद करणें आवश्यक आहे. सुप्रसिद्ध नट शाहू मोडक हे "ऊनपाऊस" चित्रपट पाहत होते. चित्रपट संपल्यावर त्यांनी सांगितलें की "म्हाताऱ्या मास्तरांचे पैशाच्या अभावी झालेले मानसिक हाल पाहून क्षणभर मला असें वाटलें की, शंभर रुपयाची नोट म्हाताऱ्याला नेऊन द्यावी" एका श्रेष्ठ नटाची ही मनस्थिति होणें हेंच राजाभाऊंच्या भूमिकेंतील स्वाभाविकपणाच्या यशाचें द्योतक आहे. स्वतःच्या व इतरांच्या भूमिकेंतील व प्रसंगांतील वास्तवता,

यामुळे त्यांचे चित्रपट ही एक यांत्रिक कलाकृति न वाटतां एखाद्या घरांत राहाणाऱ्या एखाद्या कुटुंबाच्या संसारांत घडणारीं दृश्येंच आपण त्या घरांच्या खिडकींतून पाहतों आहोंत अशी प्रेक्षकांची समजूत होते, हें त्यांचें वैशिष्टय आहे.

**अवलोकन, अभ्यास, आविष्कार**

पंचवीस वर्षांपूर्वीपासून त्यांचा चित्रपट-व्यवसायाशीं संबंध आहे. कै. बाबूराव पेंटर, श्री. भालजी पेंढारकर यांचा प्रत्यक्ष व कै. विनायक यांचा अप्रत्यक्ष लाभ त्यांना मिळाला आहे, परंतु कोणत्याहि एका विशिष्ट सांप्रदायाचा (school चा) त्यांच्यावर त्यानी परिणाम होऊंन दिला नाही. आपल्या अभिनयाचा त्यांनीं एक स्वतंत्र साप्रदाय निर्माण केला. या संप्रदायांतील शिष्यवर्ग मात्र फार मोठा आहे. त्यांनीं स्वतः भूमिका करतांना मात्र कोणाचें अंधानुकरण केलें नाही. अवलोकन, अभ्यास व आविष्कार या त्यांच्या गुणत्रयीवरच त्यांनी आपलें यशोमंदिर उभारलें आहे. जीवनांत उघडया डोळयांनी अवलोकन करावयाचें, त्याचा अभ्यास करावयाचा व आपल्या अभिनयाच्या जोरावर त्याचा आविष्कार करावयाचा हें त्यांच्या गुणत्रयीचें स्पष्टीकरण आहे. या त्यांच्या गुणत्रयीनुसार त्यांनी स्वतःच्या भूमिका केल्या व इतरांच्याकडून करून घेतल्या. पिठाच्या गिरणींत काम करतांना पिठापासून डोळयाचा बचाव करण्यासाठी पापण्यांची उघडझाप करणारा पिठाच्या गिरणींतला नोकर त्यांनी जीवनांत पाहिला, त्याचा अभ्यास केला व 'जशासतसें' मध्यें आपल्या अभिनयाने त्याचा आविष्कार करून लोकांच्यापुढे ठेवला.

**लहान भूमिकाहि 'वैशिष्टयपूर्ण'**

त्यांच्या दिग्दर्शनाचें आणखी एक वैशिष्टय म्हणजे मोठया भूमिकांप्रमाणे लहान भूमिकाहीं ते तितक्याच बारकाव्यासह कलावंतांच्याकडून करून घेतात व त्यामुळे मोठयाप्रमाणे त्यांच्या चित्रपटांतील लहान भूमिकाहीं लोकांच्या लक्षांत राहतात. उदाहरणार्थ, 'गंगेत घोडं न्हालं' मधील ऑफीस बॉय 'जगाच्या पाठीवर' मधील 'कपाउंडर 'आधी कळस मग पाया' मधील खाणावळीच' डबा आणणारा 'नोकर' त्या लहान भूमिकांच्या कथेंतील स्थानानुसार ते त्यांना निरनिराळया लकबी देतात. मात्र या लहान भूमिका कथानकाला सोडून बाहेर जाणार नाहीत किंवा मोठया भूमिकांना मारक होणार नाहीत याची ते खबरदारी घेतात. त्यामुळे लहान-मोठया सर्व भूमिकांची गुंफण हि स्वाभाविक वाटून प्रत्येक भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहते. या त्यांच्या गुणामुळेच नवे कलावंत लहान भूमिका त्यांच्या चित्रपटांतून मिळविण्या साठी उत्सुक असतात.

**विनोद हा आत्मा**

राजाभाऊंनी चित्रपटांतून विनोदी भूमिकाहि केल्या व गंभीर भूमिकाहि केल्या आहेत, मग त्यांचा आत्मा विनोद का कारुण्य- असा प्रश्न प्रेक्षकांच्या पुढे पडतो. परंतु माझ्या मतें त्यांचा आत्मा विनोद हाच आहे.


र.नं. २००१३ — जय सहकार — र. ता. २१-९-१९५५

माल तारणावर कर्ज देणें, शेतकऱ्यांच्या मालाची बाजारांत जास्तीत जास्त दराने कमीत कमी खर्चात विक्री करून देणें, तसेंच सभासदांना पेंड, मिश्रखतें, एंजिन्स, स्पेअर पार्टस् व सर्व तऱ्हेची तेलें पुरविणारा...

## राहुरी तालुका सहकारी
## खरेदी-विक्री संघ लि.

**राहुरी, जि. अहमदनगर**

★ सभासदसंख्या २६० ★ शेअर भांडवल ३२,६८० ★ रिझर्व व इतर फंड ३,०१८ ★ इतर संस्थेंत गुंतविलेलें भांडवल ६,१६७ ★ खेळतें भांडवल २,५२,५१२ ★ एकूण उलाढाल ७,७७,४५०

चेअरमन: बी. बी. तनपुरे | व्हा. चेअरमन: के. बी. हार्दे

सेक्रेटरी: व्ही. बी. धाडगे



र. नं. ५५७१ — जय सहकार — र. ता. २१-५-१९३७

शेतकी अवजारें पुरविणें, पेंड, मिश्रखतें पुरवून शेतकऱ्यांची उन्नति साधणारी 'ब' वर्गांतील....

## राहाता ग्रुप मल्टिपरपज
## सोसायटी लि. राहाता

**ता. कोपरगांव**

★ सभासदसंख्या ३४६ ★ शेअर भांडवल २८,१३० ★ रिझर्व व इतर फंड २२,२०५ ★ खेळतें भांडवल ७२,७८४ ★ एकूण उलाढाल १,८९,२७०

चेअरमन: रंगनाथ भाऊराव बोठे | व्हा. चेअरमन: बाबा भाऊराव महे

सेक्रेटरी: टी. जी. नेहे

**सोसायटीचें स्वस्त धान्याचें दुकान**

प्रत्येक गोष्टीकडे तटस्थतेने पाहून त्यांतील विनोद ते निवडतात व हळुवारपणें प्रेक्षकांच्या पुढे मांडतात. दुःखी जीवसुद्धा आपल्या दुःखी मनावर फुंकर घालण्यासाठी विनोदाचा अवलंब करतो. त्याप्रमाणे त्यांच्या करुण व गंभीर भूमिकांतील विनोद पाहत असतांना प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आलेलें असतें व जिवणींत हंसूं उमटलेलें असतें. मात्र पडद्यावरील तो प्रसंग डोळ्यापुढून गेल्यावर प्रेक्षक गोंधळून आजूबाजूला बघतो की, मी हसलों हें कोणीं पाहिलें नाहीना! मात्र त्यांच्या विनोदांत अतिरिक्तता, उच्छृंखलपणा कोठेंच आढळत नाही. हळुवारपणा हेंच त्यांच्या विनोदाचें वैशिष्टच आहे.

दिग्दर्शक म्हणून त्यांची जरब फार असते. शूटिंग चालू असतांना ते स्वतः भरपूर हास्यविनोद करतात, पण त्यांत कोठेहि बाष्कळपणा अगर बिभत्सपणा नसतो. एखाद्यानें तो करण्याचा प्रयत्न केल्यास ते त्याला जामतात. तसेंच शूटिंग चालू असतांना ते स्वतःच्या चित्रपटाचें असो अगर दुसऱ्या निर्मात्याचें असो—तें संपेपर्यंत चोवीस तास त्यांच्या डोक्यांत तो एकच विषय असतो. स्वतःप्रमाणे इतरांनीहि शूटिंगच्या ठरलेल्या कार्यक्रमाबद्दल जागरूक राहावें असा त्यांचा आग्रह असतो. त्यांच्या कार्यक्रमामध्ये आमच्या इतरत्र दिलेल्या तारखेने व्यत्यय आल्यास ते अतिशय रागावतात, परंतु त्या रागावण्यामध्ये पित्याची प्रेमळता लपलेली असते. आमच्या चुकीमुळे राजाभाऊ रागावले तरी त्यांचा तो राग फार काळ टिकत नाही. ते हाडाचे कलावंत असल्यामुळें शूटिंग करतांना आम्ही एखादा चांगला प्रसंग वठवला की, त्यांचा राग जातो व क्षणापूर्वी रागावलेले राजाभाऊ व्यवस्थापकाला बोलावून सांगतात."ते राजेश्री जेवले का बघा, नाहीतर त्याची कांही खाण्याची व्यवस्था करा."

त्यांच्या अनेक चित्रपटांचे साजरे झालेले रजतमहोत्सव हे त्यांच्या लोकप्रियतेचे द्योतक आहेत, परंतु 'जगाच्या पाठीवर' या बोलपटांतील सखारामाच्या भूमिकेबद्दल जनतेने त्यांची १९६० सालचे नायक म्हणूक फाळके गौरव चिन्हासाठी केलेली निवड हें राजाभाऊंच्या लोकप्रियतेबद्दल लोकांनी दिलेलें केलेलें लेखी शिक्कामोर्तब आहे. आज २०-२१ वर्षें त्यांचें कलाजीवन जवळून पाहाणाऱ्या त्यांच्या संप्रदयांतील मी एक सामान्य कलावंत आहें मलाहि या प्रसंगीं त्यांचें अभिनंदन करण्यास आनंद वाटतो.

—०—

# मी सुतार होतों

लेखक—दि. बा. मोकाशी

एके दिवशीं सकाळीं माझे एक मित्र आमच्याकडे आले नि तावातावाने म्हणाले,—

"आपल्या लोकांची कधी प्रगति होणार नाही."

मीं विचारलं,—

"झालं तरी काय?"

"आपण कुणाला काम द्यावं तर त्याची त्याला पर्वा नसते. आळस इतका भरलाय् आपल्यांत!"

मी पुन्हा विचारलं,—

"पण झालं काय तें तरी सांगा."

"काय व्हायचं! नेहमीचीच कथा! आमच्या घरांत भिंतीचा वीतभर चुना उडालाय्-प्लॅस्टर म्हणतात तें गेलंय्. अगदी वाईट दिसतं तें. रंग लावून घ्यायचाय् खोलीला, पण तें प्लॅस्टरिंग केल्याशिवाय रंगहि लावतां येत नाही. म्हणून गवंड्याकडे गेलों. आज नाही, गेले आठ दिवस खेपा मारतोंय् मी. दर वेळेला येतों म्हणतो नि येत नाही. मला याचा राग येतो. यायचं नाही ना, मग सरळ नाही म्हणावं! छप्पन गवंडी पडले आहेत."

"मग दुसरा गवंडी कां नाही पाहिलांत?"

"खरं सांगूं. दुसरा पाहिला तोही तसाच. येतो येतो करतो नि येत नाही. उपाशी मरतील हे, पण काम करणार नाहीत आपल्या लोकांचं हेंच चुकतं. अमेरिकेंत किंवा इंग्लंडमध्ये असं कुणी वागला तर टिकायचा नाही. उगीच ते आज स्पुटनिक उडवताहेत?"

मी हसलों.

त्यांनी विचारलं,—

"हसतां कां?"

"पतंग उडवावा तसं तुम्ही स्पुटनिक उडवलंत."

"त्यांना पतंग उडवण्यासारखंच झालाय तें. आम्हाला पतंगहि नीट उडवतां येत नाही."

"गवंड्याला तुम्ही काय सांगितलंत?"

"काय सांगायचं? प्लॅस्टर उडलंय् वितभर; दोन मिनिटांचं काम आहे. थापी, ओंजळभर चुना नि मूठभर सिमेंट घे नि चल."

"पैशाचं सांगितलंत का?"

"त्यांत पैसे असे किती लागणार? आठ आणे, रुपया. पैसे दिल्याशिवाय काम होतं का हल्ली? अच्छा! मी येतों. बघतों आला तर तो!"

हा प्रसंग नंतर मी विसरून गेलों. त्यानंतर आठ एक दिवस झाले असतील. मी कामावरून येतांच बायको म्हणाली,—

"आधी सुताराकडे जाऊन ती दाराची अडकवणी नीट बसवून घ्या पाहूं."

मीं विचारलं,—

"अग! घरांत आल्याबरोबर हल्ला करण्याजोगं आहे का हें काम?"

"आहे म्हणूनच सांगितलं. आज मुलीचे दात पडत होते."

आमची छोटी बेबी दरवाजांतून बाहेर जाऊं नये म्हणून दाराला एक अडकवणी लावली आहे. दरवाजाच्या चौकटीला अडकवणीच्या फळीच्या जाडीएवढी फट ठेऊन गुडघाभर उंच अशा दोन दोन रिफा प्रत्येक बाजूला मारल्या आहेत. त्या रिफांच्या फटींत अडकवणीची फळी वरून सरकवून टाकतां येते. मला एक-दोनदा ही फळी रिफांतून

# अद्यापि संसार...

*मी सुतार होतों*

*सत्वयुक्त आहार 'टोमॅटो'*

*बुद्धिबळाच्या पटावर*

निसटणार म्हणून बायकोनं सूचनाहि दिली होती. तेव्हा हें काम उद्यावर लोटतां येणार नाही. हें जाणून मी तसाच बाहेर पडलों.

सुताराला मीं सगळी हकीगत सांगून म्हटलं,

"तुम्ही चार रुंद रिफा, चार खिळे नि हातोडी घेऊन चला. दोन मिनिटांचं काम आहे."

सुतार म्हणाला,--

"तुम्ही पुढे व्हा, मी आलोंच."

"लक्षांत आलंय् ना कामाचं स्वरूप ?"

"हो हो ! व्हा पुढं तुम्ही."

मी पुढे होऊन घरीं आलों, पण सुतार त्या दिवशीं आला नाही. त्या दिवशीं तर नाहीच, पण रोज एक अशा पांच दिवस खेपा घालूनहि तो प्रसन्न झाला नाही आणि शेवटीं एके दिवशीं जें होऊं नये तें झालें. बायकोची भीति खरी ठरली. आमची मुलगी अडकवणीला रेलून धरून उभी असतां अडकवणी रिफांतून बाहेर आली नि ती पुढच्या पायऱ्यांवरून गटांगळ्या खात अंगणांत पडली. दोन टेंगळं आलीं. चार ठिकाणीं खरचटलं नि तिला दात आलेलेच नसल्यानं पडले नाहीत.

बायकोपुढे बराच वेळ मान वर करायची हिंमत न झाल्याने ती मुलीला उगे करीत असतां मी अडकवणी कां निसटते याचा अभ्यास करूं लागलों. अडकवणी एकदा रिफांतून सरकवून लोटून पाहिली.

अडकवणीची रुंदी रिफांच्या जाडीहून किंचितच जास्त होती. त्यामुळंच ती निसटत होती. झटकन् माझ्या मनांत कल्पना आली की, दाराच्या चौकटीच्या रिफा अधिक जाड्या लावणं काय नि अडकवणीला एक बोटभर (अर्धा इंच) रुंदीची रिफ मारणं सारखंच. चार रिफा काढून दुसऱ्या चार रिफा लावण्यापेक्षा एक रिफ लावून काम होईल.

लगेच मीं शिवणाचा टेप घेऊन अडकवणीची उंची घेतली व जाडी (अर्धा इंच) घेतली. मग घरांतल्या एका देवदारी खोक्याची फळी बाहेर काढली व तिची अर्धा इंच रिफ काढण्याचें ठरवलें, पण मग लक्षांत आलं की, करवत कुठे आहे? निदान कोयता आहे का? म्हणून बायकोला विचारलं, पण हल्ली पूर्वीसारखीं लाकडं फोडावीं लागत नाहीत, आयती बंबफोड मिळते, तेव्हा कोयता लागतो कशाला? त्यामुळं घरीं कोयताहि नव्हता.

शेवटीं ती फळी घेऊन सुताराकडे गेलों नि तिची रिफ काढून आणली, मग लक्षांत आलं की, रिफ ठोकायला चुका (खिळे) हव्यात. जुन्या पत्र्याच्या डब्यांत बायकोनं चुका शोधल्या, पण भिंतीचे वाकडे झालेले मोठाले खिळे रिफेला उपयोगी नाहीत. पुन्हा बाजारांत जाऊन चुका घेऊन आलों.

चुका ठोकायला बसलों नि हातोडा मागितला. हातोड्याचं सर्व काम घरी बत्त्यानं होतं हें जाणून बायकोनं बत्ता आणून दिला. अडकवणी उभी धरून त्यावर रीफ ठेवून त्यावर चूक धरली नि बत्ता उचलूं लागलों तर अडकवणी न झेपून आडवी पडली. दुसऱ्या वेळेस अडकवणी, रीफ, चूक गच्च धरलं नि बत्ता मारला तो बोटावर बसला. बत्त्याच्या वेदना कमी होताहेत तों बायको येऊन म्हणाली,—

"सापडलं ना बोट ? सुताराला बोलावून आणायचं चांगलं."

मीं चिडून म्हटलं,--

"अंबारी धाडायची काय त्याला आता ? त्यापेक्षा जरा पुढे होऊन ही अडकवणी नीट सरळ धर. वाकडी करशील."

मीं वाकडी करशील म्हटलं नि तसंच झालं माझं दुसरं बोट बत्त्याखाली आलं. कारण नेमका बत्त्याचा घाव नि बायकोची शिंक यांची वेळ एकच आली.

तीन चुका अशा रितीनं मारून मी अडकवणी उचलली नि दारांत सरकवली नि त्याकडे कौतुकानं पाहात म्हटलं,—

"आत्ता हत्तींनी धडक देऊन पाहावी."

मीं पुन्हा पुन्हा अडकवणी वर काढून आपलं हस्तकौशल्य पाहूं लागलों. तसतसं त्यांतलं सौंदर्य मला अधिकाधिक दिसूं लागलं. मी गुंग असतां पूर्वी आलेला मित्र पुन्हा आला. मीं विचारलं,--

"काय ? आला का गवंडी ?"

"आत्ता ठरलंय आमचं. मीं हात धरून आणायचं त्याला"

मीं अडकवणी गोंजारीत म्हटलं,

"हें पहा ! आपलीं हीं कामं आपणच करायला हवींत."

"आम्हीं करायचं तरी काय काय ?"

"पंचवीस खेपा गवंड्याकडे झाल्या. या वेळेपर्यंत एका बंगल्याचं प्लॅस्टर तुम्हीं केलं असतं."

"तें आमचं काम नाही."

"आता असं म्हणून चालणार नाही. आपलीं हीं एवढालीं कामं ! धंदेवाल्यांना त्यांत गम्य कसं असणार ? त्यांनी इथे यायचं–पहायचं–मग सामान आणायचं, त्यांना परवडत नाही तें. आपण असे किती दिवस पैसे देणार त्यांना ? "

"तसं सांगावं त्यांनी."

"संकोच वाटतो. पण आज ना उद्या ते सांगतीलच की, हीं लहान कामें ज्यांचीं त्यांनीच यापुढे केलीं पाहिजेत. मी पहा ! ही अडकवणी निसटत होती. एक रिफ बनवली नि झक्क ठोकली."

ते पुढे होऊन म्हणाले,

"तुम्ही केलंत हें ? "

"म्हणजे ! संशय आहे का ? मला आवड आहे ती !"

(पान ३८ वर)

सत्त्वयुक्त आहार

# ‘सी’ व्हिटामिन भरपूर असलेला ‘टोमॅटो’

सौ. कुमुदीनी रानडे

टोमॅटो ही फळभाजी हल्ली इतकी लोकप्रिय झाली आहे की, एके काळीं टोमॅटो हा आपल्याकडे निषिद्ध समजला जात असे हें कोणाला आता सांगूनसुद्धा खरं वाटणार नाही. टोमॅटोला पूर्वी बेलवांगे असेंहि म्हणत. हल्ली त्याचा प्रसार फार झाल्याने शेतकरीहि त्याची फार मोठ्या प्रमाणावर लागवड करतात.

टोमॅटो मूळचा दक्षिण अमेरिकेंतील पेरू या देशाचा रहिवासी. टोमॅटोची आयात हिंदुस्थानांत प्रथम सतराव्या शतकांत झाली आणि नंतर त्याचा प्रसार सबंध देशभर फार झपाट्याने झाला. महाराष्ट्रांत टोमॅटोची सर्वांत जास्त लागवड नाशिक जिल्ह्यांत होते. टोमॅटोला चांगली निचरा होणारी अशी तांबडी किंवा काळसर जमीन लागते. पाऊस मात्र २० ते ८० इंचापर्यंत कितीहि चालतो. चांगलें शणखत घालून तयार केलेल्या वाफ्यांत बीं पेरतात. रोपें तीन ते चार आठवड्यांचीं झालीं की, तीन तीन फूट अंतरावर दोन दोन रोपें एकत्र लावतात. हें लावण्याचें काम वर्षांतून तीन वेळां करतात. जून, ऑक्टोबर व फेब्रुवारी. साधारणपणें रोपें लावल्यापासून अडीच ते तीन महिन्यांत फळें येतात. जूनमध्ये लावलेल्या रोपांना इतर हंगामांपेक्षा फळें जास्त येतात.

टॉमॅटो चवीलाच चांगला असतो असें नाही तर त्यांत आपल्या शरीराला उपयुक्त अशीं अनेक द्रव्यें आहेत. टॉमॅटोमध्ये सर्वांत जास्त व्हिटॅमिन कोणतें असेल तर तें ‘सी’ हें होय. ह्या सी व्हिटॅमिनच्या अभावी हिरड्या सुजून रक्त येतें व स्कर्व्ही नांवाचा रोग जडतो. शरीराच्या इतर भागांतूनहि रक्तस्राव होतात. सांधे दुखूं लागून अशक्तपणा येतो. आजारीपणांत रोगाविरुद्ध लढण्याची शक्ति टिकून राहण्यासाठी या व्हिटॅमिनची आवश्यकता आहे. असें हें ‘सी’ व्हिटॅमिन टोमॅटोत भरपूर असतें.– सी व्हिटॅमिनच्या खालोखाल ‘अ’ हें व्हिटॅमिन टोमॅटोंत असतें. शरीराची वाढ होण्यास व झालेली झीज भरून काढण्यास या व्हिटॅमिनची आवश्यकता असते. त्वचेचे व डोळ्यांचे रोगहि या व्हिटॅमिनच्या अभावी होतात-असा हा व्हिटॅमिनयुक्त टोमॅटो आपल्या शरीरांत अत्यंत उपयुक्त आहे.

टोमॅटो विकत घेतांना नेहमी ताजीं, टणक व वजनाने जड असतील अशींच फळें घ्यावीत. जास्त झालेल्या टोमॅटोंत व्हिटॅमिनचा अंश कमी असतो. टोमॅटोची कोशिंबीर, रस्सा आपण नेहमीच करतों. त्यापेक्षा थोडे वेगळे प्रकार खाली दिले आहेत.

### टोमॅटोची शीर

साहित्य–टोमॅटो १ शेर, कांदे अर्धा शेर, १ नारळ, आल्याचें १ कुडें, थोडी कोथिंबीर, कढिलिंब, १ चहाचा चमचा हळद, चवीपुरतें मीठ व साखर, ५–६ हिरव्या मिरच्या.

(पान ४० वर)

(पान ३७ वरून)

“रीफ कापलीत कशी नि ठोकलीत कशी ?”

हात्तिच्या ! बत्त्यानं झक्क ठोकतां येते.”

हे म्हणतां म्हणतां दोन्ही काळीं निळीं बोटं मागे नेलीं नि पुढे म्हणालों,

“तुमचंच बघा ! एक थापी, पावशेर सिमेंट, नि मूठभर चुना घेऊन या ! एका डब्यांत चुना कालवा, त्यांत थोडं सीमेंट घाला, थोडं प्लॅस्टरिंगसाठी ठेवा. पांच मिनिटांचं काम.”

झटकन् उठत ते म्हणाले, “तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे आत्ताच आणतों सगळं.”

मी अंगणांत त्यांना निरोप द्यायला गेलों. परततांना मीं घरांत काय काय हत्यारं आणायला हवींत याची यादीच करीत आलों. १) करवत २) पटाशी ३) हातोडा ४) पक्कड ५) कानस ६) कटर

या यादीच्या नादांत बायकोनं दरवाजाला अडकवणी दसवल्याचं माझ्या ध्यानांत आलं नाही. मी जोरानं दरवाजांतून आंत येऊं लागलों. माझ्या दोन्ही गुडघ्यांचा थोडा नेट अडकवणीला लागला नि स्वत:ला सावरण्यापूर्वीच अडकवणीसह मी जमिनीवर कोसळलों.

बायको धावत बाहेर आली नि समोरचं दृश्य पाहत म्हणाली,—


“तरी म्हटलं तुम्हाला, सुतार आणा.”

पण खरा मेकॅनिक काम बिघडल्यावर तें कां बिघडलें हें पाहतों. पळून जात नाही. मीं झटकन् उठून अडकवणी नि निसटलेली नवी रीफ पाहिली. मीं ठोकलेले खिळे साफ एका कडेंतून नि तेसुद्धा तिरपे ठोकले गेले होते. ते निरखीत मीं बायकोला म्हटलं,—

“ही बघ ! इथं चूक झाली. म्हणून हत्यारं पाहिजेत घरांत. तुझ्या बत्त्यामुळे हा घोटाळा. जियलं हत्यार तिथं हवं. इथं हातोडा हवा. मी आत्ता घेऊन येतों नि झक्क रीफ ठोकून देतों-अशी भक्कम की हत्तीनं टक्कर द्यावी नि परतावं.

—०—

खिळा ठोकणं ही सुद्धा कला आहे. खिळा ठोकायच्या जागेवर खिळा नेहमी काटकोनांत उभा धरावा व जसजसे ठोके माराल तसतसा तो काटकोनांत सरळ आंत जातोय हें पाहावें. सराईत माणूस खिळा ठोकतांना बोटांकडे पाहात नाही. तसा तो डोक्याकडेहि पाहात नाही. खिळा बरोबर उभा जात आहे की नाही, एवढेंच तो पाहातो. परंतु सुरुवातीला खिळ्याचें डोक्याकडे पाहाणें उत्तम. खिळा धरलेलीं बोटें खिळ्याच्या लांबीच्या मध्यावर धरावीं व उरलेलें मोकळें बोट वर येऊन हातोड्याखाली येत नाही हेंहि पाहावें. बत्त्याने खिळा ठोकण्यापेक्षा हातोडी वापरावी. जेथले हत्यार तेथे वापरण्यांत सोय व सुखहि असतें.



# बुद्धिबळाच्या पटावर

श्रीकृष्ण साखळकर

लेखांक–पांचवा

---

आज थोडें विषयांतर ! खरे पाहतां आपण ठरवल्याप्रमाणे बुद्धीबळाच्या आठ तत्वांचा विचार करायचा, पण मी तें काम पुढील महीन्यापासून अंगावर घ्यायचें ठरवीत आहें. कारण ज्ञान आणि माहिती या दोन उद्देशांनी हें सदर वापरण्याचा माझा हेतु आहे. या महिन्याला माहितीसाठीं त्याचा उपयोग करण्याचें मीं योजिलें आहे.

मी आज लिहिणार आहे चौथ्या अखिल भारतीय सामन्याबद्दल. हे सामने नुकतेच हैद्राबाद येथे पार पडले. या सामन्याचें वैशिष्टच म्हणून जर कांही सांगावयाचें झालें तर तरुण खेळाडूंनी मिळविलेल्या स्पृहणीय यशाबद्दल लिहिणें जरुर आहे.

मद्रासचा अेरन (Aaron) (२६) भारताचा 'इंटर नॅशनल मास्टर'– पहिला आला. तो पहिला येणार हें गृहीतच धरून चालणें भाग होतें. कारण त्याचा खेळ तो...त्या निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय सामन्यांत गेल्या दोन वर्षांत खेळतो आहे, त्यामुळें बराच चांगला होणें क्रमप्राप्तच होतें, पण माझ्या मतें या सामन्यांत एरन म्हणावा तेवढा चांगला खेळला नाहीं. सामने जिंकले खरे पण त्याबद्दल थोडेंफार त्याचें अनुकल नशीबच कारण आहे. महंमद इसाक (गुजराथ), नवाब अली (मुंबई), सप्रे (मुंबई) व म्हैसकर (सांगली) या खेळाडूंबरोबरच्या डावांत त्याची निश्चित पंचाइत झाली होती व तो हे चारही डाव न हरतां त्यांतले दोन जिंकून व दोन बरोबरीवर तोडून पहिला आला ह्याचें श्रेय त्याच्या कसबाला देणें कठीण आहे. एरन हा भारताचा श्रेष्ठ खेळाडू आहे, पण हैद्राबादच्या सामन्यांत त्यानी त्याच्या चहात्यांची निराशा केली आहे. दुर्दैव हेंच कीं, अेरनचा 'पराजय त्याच्या विजयांत साठवलेला आहे. त्यामुळें त्याला त्या 'पराजया' ची जाणीव न होणें फारच वाईट. अेरनने अजून जरूर अभ्यास करायला हवा आहे. मेहेनत घ्यायला हवी आहे.

मी यावेळीं पहिल्यांदाच अखिल भारतीय सामन्यांत खेळलों पहिल्या सामन्याच्या वेळीं मी खेळाडू नव्हतों व दुसऱ्या व तिसऱ्या सामन्यांत खेळायचें या ना त्या कारणाने मला शक्य झालें नाही. या चौथ्या सामन्यांत मुंबईतर्फे मला खेळायची संधि मिळाली व मी (२७) अेरनच्या मागे अर्ध्या गुणाने दुसरा आलों. माझें हें यश बऱ्याच जणांना अनपेक्षित होतें, कारण मला बुद्धिबळाचा खेळाडू म्हणून नव्हे, तर बुद्धिबळाचा अभ्यासू ( Theonist ) म्हणूनच जास्त लोक ओळखतात. 'टाईम्स' दैनिकाचे बुद्धिबळाचे संपादक 'रामजी' मी हैद्राबादला जाण्यापूर्वी कांहींशा विनोदानें व थोडयाशा तिखटपणाने मला म्हणाले होते. "Sakhalkar yon are a writer and correspandent first, player afleruads " आणि गंमत अशी की, अजूनहि ते आपलें मत कायमच आहे, असें मला सांगतात.

आजपर्यंत खेळलेल्या वेगवेगळ्या सामन्यांचा विचार करतां मी हैद्राबादचे डाव फार चांगले खेळलों असें म्हणावें लागेल, परंतु आंतरराष्ट्रीय खेळाच्या दर्जाचा त्यांत एकहि डाव झाला नाही. हें मला कबूल केलें पाहिजे. येत्या ऑक्टोबरमध्ये बल्गेरियाला बुद्धिबळाच्या जागतिक सांघिक सामन्यासाठी भारताचे चार खेळाडू खेळतील व भारताच्या संघांत माझा समावेश होईलहि, पण त्या सामन्यांसाठी अजून मला बराच अभ्यास केला पाहिजे.

मुंबईचा फरुक अल्ली (२४) हैद्राबादला तिसरा आला. त्याचा डाव वेताचाच आहे, शिवाय एरनप्रमाणे त्यालाहि नशिबाने हात दिला, परंतु जर त्याने अजूनहि बुद्धिबळाच्या पुस्तकांचा अभ्यास करायची तयारी दर्शवली तर तो एक चांगल्यापैकी खेळाडू होईल.

हैद्राबादचा महंमद हसन (३२) चौथा आला. तो मोठा तडाखेबंद खेळणारा आहे, पण त्याचा खेळाचा अभ्यास लंगडा आहे. त्यानेसुद्धा पुस्तकांचा आश्रय घेणें जरूर आहे. नाही तर आंतराष्ट्रीय सामन्यांत भारतासाठी भरीव कामगिरी करणें त्याला अशक्य आहे.

रामचंद्र सप्रे (मुंबई) (४६) पांचवे आले ते एके काळचे उत्कृष्ट खेळाडू, पण आतां त्यांचा म्हणावा तसा प्रभाव मुळीच पडत नाही. त्यांचा खेळ हैद्राबादला बराच कमी पडला. महमद हसनने त्यांच्यावर केलेला डाव म्हणजे नामुश्कीचाच प्रसंग. जर सप्रे यापुढचे यांच दर्जाचे डाव खेळणार असतील, तर त्यांनी निवृत्तीचा विचार करावा हें चांगलें, कारण त्याने त्यांच्या आजपर्यंतच्या कर्तबगार खेळाच्या स्मृति तरी टिकून राहतील.

रमेश सेठ (मुंबई) (२६) हा खरें पाहतां फार चांगला खेळाडू. तो बक्षिसांत जरूर यायला हवा होता, पण कांही कारणाने त्याचा खेळ निकृष्ट झाला व तो बक्षीसाबाहेर पडला. त्याला निराशा होण्याचें कारण नाही. अजून त्याला खूप बुद्धिबळ खेळावयाचें आहे.

अझिय अली अलवि (२३) ह्या हैद्राबादच्या तरुण खेळाडूने चांगलीच तडफ दाखवली. त्याचा पुस्तकांचा अभ्यासपण चांगला आहे. त्याला कमी आहे तो फक्त अनुभव. सामने खेळून खेळूत तो जरूर पुढे येईल.

★

( पान ३७ वरून )

# ' सी ' व्हिटॅमिन भरपूर असलेला टोमॅटो

कृति–टोमॅटो व कांदे दोन्हीहि अगदी बारीक चिरावेत. नारळ खरवडून त्यांत थोडें ऊन पाणी घालून प्रथम त्याचें दाट दूध काढावें. नंतर त्याच चोथ्यांत आणखी पाणी घालून पातळ दूध काढावें. नारळाचे पातळ दुधांत हळद, मीठ, साखर, कोथिंबीर घालावी. पातेल्यांत तूप तापत ठेवून. तूप तापल्यावर त्यांत आल्याचे तुकडे कढिलिंब व वाटलेल्या हिरव्या मिरच्यांचें तिखट घालावें. नंतर त्यांत चिरलेला कांदा टाकून लालसर परतावा. त्यानंतर त्यांत टोमॅटो टाकावे व जरा परतून टोमॅटो मऊ झाल्यावर त्यांत नारळाचें पातळ दूध घालावें. टोमॅटो चांगले शिजले की, त्यांत नारळाचें जाड दूध घालून एक उकळी आल्यावर खाली उतरून ठेवावें.

### टोमॅटोचा जॅम

साहित्य–टोमॅटो १ शेर, लिंबाचा रस १॥ औंस साखर पाऊण शेर.

कृति–संपूर्णपणें पिकलेलीं, परंतु जरा टणक व विनकिडलेलीं अशीं फळें धुवून त्यांच्या देठाजवळचा भाग चाकूने काढून टाकावा. नंतर फळें एका फडक्यांत अथवा तारेच्या जाळयांत घालून तीं उकळत्या पाण्यांत ३ ते ५ मिनिटेपर्यंत ठेवावींत व लगेच थंड पाण्यांत बुडवावींत म्हणजे त्यावरील साल काढणें सोपें जातें. टोमॅटोवरील साल काढून आंतील गराचे चाकूने बारीक तुकडे करावे आणि त्यांत लिंबाचा रस घालून ते उकळण्याकरितां ठेवावे. ते खदखदूं लागतांच त्यांत साखर घालावी व मिश्रण पुन्हा उकळावें. वरील मिश्रण चमच्याने वारंवार हलविण्याची काळजी घ्यावी. गर साधारण घट्ट होतांच जॅम तयार झाला असें समजावें, हा जॅम दोन ते तीन आठवडे सहज टिकतो.

### टोमॅटोमधील अंडीं

साहित्य–अंडीं १ डझन, कांदे पाऊण शेर, टोमॅटो अर्धा शेर, अर्ध्या नाराळाचें दाट दूध, लाल तीखट, मीठ व हिंग.

कृति–कांदा अगदी बारीक चिरावा. टोमॅटोवर उकळतें पाणी ओतून, त्यांचीं सालें काढून त्यांच्या बारीक फोडी कराव्या. रुंद तोंडाच्या पातेलींत तीन डाव तूप घालावें. तूप गरम झाल्यावर त्यांत चिरलेला कांदा टाकून तो चांगला परतावा. कांदा मऊ शिजल्यावर त्यांत लाल तिखट, मीठ व हिंग घालावा. चिरलेले टोमॅटो कांद्यावर टाकावे व झाकण् न ठेवतां परतावे. टोमॅटो शिजल्यावर पातेलें खाली घेऊन टोमॅटोचा थर पातेलीच्या बुडाशीं सारखा पसरावा व ह्या थरामध्ये अंडीं फोडून ओतण्याकरतां बारा खड्डे करावे. एकेक अंडें फोडून प्रत्येक खळग्यांत हलक्या हाताने ओतावें. अंड्यांतील पिवळें तसेंच सबंध राहील याची खबरदारी घ्यावी. नंतर पिवळा बलक न झ.कतां हलक्या हाताने नारळाचें दूध घालावें. घट्ट झाकण ठेवून खालीवर निखारा घालून पातेली शेगडीवर ठेवावी. अंडीं शिजून घट्ट झाल्यावर पातेलें खाली उतरावें.


र. नं. २०६२० ] विना सहकार नही उद्धार [ र. ता. १९-३-१९५१

सोसायटीच्या सभासदांना कर्ज देणें, खतें, पेण्ड व सल्फेट पुरविणें, शेतकऱ्यांना नवें एंजिन, स्पेअर पार्टस व त्यासाठी लागणारी तेलें पुरविणें, शेतीसाठी उपयुक्त अवजारें, स्प्रे पंप व नांगरटीसाठी ट्रॅक्टर भाड्याने देणें इत्यादि कार्यें करण्याची ' ब ' वर्गातील....


## शिर्डी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.

### मु. पो. शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर

● सभासदसंख्या २४७ ★ शेअर भांडवल १,४५,८८० ★ रिझर्व व इतर फंड २०,०७० ★ सरकारी शेअर्स १०,००० ★ ट्रॅक्टर शेअर्स १४,१०० ★ इतर संस्थेत गुंतविलेलें भांडवल ३६३,६७ ★ खेळतें भांडवल ९,४३,१७३ ★ गांवांतील उसाचें क्षेत्र १३५० एकर ★ सोसायटीच्या १४० सभासदांनी गणेश सहकारी साखर कारखान्याचें प्रत्येकी १०००० रु. प्रमाणें ३०३ शेअर्स खरेदी केलेलें आहेत.

फोन { राजाराम तात्याजी कोते (पाटील) (चेअरमन) एकनाथ हणमंतराव शेळके (व्हा. चेअरमन) — बी. बी. बाकलीवाल (मॅनेजर) डी. एस. तेलोरे (सेक्रेटरी) } नंबर ३.

# आपण 'सुशिक्षित' व 'प्रगतिशील' शेतकरी आहांत काय?



## मग 'माणूस' मधून क्रमशः प्रसिद्ध होत असलेली,

एका 'प्रगतिशील' शेतकऱ्याने स्वानुभवाने लिहिलेली,
शेतकरी समाजाला नव्या शास्त्रीय दृष्टीचा
लाभ घडविणारी,
'आपलें एंजिन' ही लेखमाला आपण वाचलीच पाहिजे.

★ पुढील अंकांत 'फौंडेशन' संबंधी सविस्तर व सचित्र माहिती ★

**'माणूस' चे वर्गणीदार होऊन आपला अंक नियमितपणें राखून ठेवा.**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर : मुद्रणस्थळ– साधना प्रेस, ४३०-३१ शनवार पेठ, पुणें २
प्रकाशन स्थळ : राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव पेठ, पुणें ०